# हल्ला करणारे पाक क्षेपणास्त्र हवेतच उडवले


• पुणे, शुक्रवार, ९ मे २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 160 • वर्ष ४ थे, अंक १६० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com *Beyond The News*




## सीमा सील, क्षेपणास्त्रे सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जयपूर :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये केलेल्या अचूक क्षेपणास्त्र हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी, राजस्थान आणि पंजाब या सीमावर्ती राज्यांमध्ये सतर्कता बाळगण्यात आली आहे. पाकिस्तानकडून होणाऱ्या कोणत्याही वाढत्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी स्थानिक प्रशासन सज्ज असल्याने सर्व पोलिस कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत आणि सार्वजनिक मेळाव्यांवर बंदी घालण्यात आली आहे.

पाकिस्तानशी १,०३७ किमी लांबीची सीमा असलेल्या राजस्थानमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. सीमा पूर्णपणे सील करण्यात आली आहे आणि सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास गोळीबार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राजस्थानमधील अधिकाऱ्यांनी सीमेजवळ राहत नसलेल्यांसाठी हालचालींवरही बंदी घातली आहे.

भारतीय हवाई दल हाय अलर्टवर आहे. पश्चिम क्षेत्रातील आकाशात » पान ७ वर

## आत्तापर्यंत १०० दहशतवाद्यांचा खातमा

**जम्मू-काश्मिरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यानी केलेल्या हल्ल्याचा सूड म्हणून केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. यात १०० दहशतवाद्यांचा खात्मा केल्याची माहिती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सर्वपक्षीय बैठकीत दिली. दरम्यान, या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी ऑपरेशन सिंदूर अद्याप सुरू आहे, असे स्पष्ट केले.**

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी ठिकाणांवर केलेल्या कारवाईनंतर केंद्र सरकारने गुरुवारी सर्वपक्षीय बैठक बोलावून विविध राजकीय पक्षांना या कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीर (पीओके) मधील नऊ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले करून त्यांचा पूर्ण नायनाट केला, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सर्व पक्षांच्या प्रतिनिधींना बुधवारी सकाळी झालेल्या सैनिकी कारवाईची माहिती देण्यात आली. केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी नंतर पत्रकारांशी बोलताना याची माहिती दिली. रिजिजू म्हणाले, "सर्व नेत्यांनी परिपक्वता दाखवत सरकारला पाठिंबा दिला आहे. सर्वपक्षीय बैठक ही एकजुटीचे प्रतिक ठरली. सर्व पक्षांनी ऑपरेशन सिंदूरसाठी भारतीय सशस्त्र दलांचे अभिनंदन केले आणि या कारवाईस पाठिंबा दिला." त्यांनी यावेळी हेही स्पष्ट केले की, ऑपरेशन » पान ७ वर

# पाकचे लॉन्चर्स नेस्तनाबूत

## लाहोरमधील एअर डिफेन्स सिस्टीम उडवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरनंतर चिडलेल्या पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा डावा आखला होता. मात्र भारताच्या सतर्क सैन्याने त्यांचा हा डाव उधळून लावला आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील अनेक शहरातील रडार यंत्रणावर हल्ला करते ते उद्धवस्त केले आहेत. त्यात पाकिस्तानी रडार यंत्रणेचे मोठे नुकसान झाल्याचे सुत्रांकडून समजत आहेत. हे हल्ले भारताने ड्रोनच्या माध्यमातून केले. लाहोरमधील रडार यंत्रणाही भारतीय लष्कराने उद्धवस्त केले आहे. पाकिस्तानने बुधवारी रात्री भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून उत्तर आणि पश्चिम भारतातील अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज यांसारख्या अनेक लष्करी तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण पाकिस्तानचे हे हल्ले भारताने निष्फळ केले.

पाकिस्तानने जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा, बारामुल्ला, उरी, पूंछ, मेंढर आणि राजौरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवर मोठ्या प्रमाणात गोळीबार सुरू ठेवला आहे. पाकिस्तानी गोळीबारात तीन महिला आणि पाच मुलांसह सोळा निरपराध लोकांचा बळी ही गेला आहे. पाकिस्तान गोळीबारासह तोफांचा ही मारा सीमेवर करत आहेत. बुधवारी रात्री, भारतीय हवाई दलाच्या एस-४०० सुदर्शन चक्र हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीने, भारताच्या दिशेने पाकिस्तानने सोडलेल्या मिसाईलवर गोळीबार केला. या कारवाईत मिसाईल निष्प्रभ करण्यात आले आहे.

## 'सुदर्शन'ने पाकला रोखले

नवी दिल्ली : भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे हताश झालेल्या पाकिस्तानने बुधवारी रात्री जम्मू-काश्मीरपासून गुजरातपर्यंत किमान १५ शहरांमधील लष्करी तळांना क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हे हल्ले पूर्णपणे हाणून पाडले. इतकंच नाही तर प्रत्युत्तरादाखल लाहोरची हवाई संरक्षण यंत्रणाही उद्ध्वस्त करण्यात आली. विशेष म्हणजे २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू करत दहशतवादाविरोधात मोठं युद्ध छेडलं आहे. भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले आहेत. या दरम्यान १०० हून अधिक दहशतवादी ठार झाल्याची माहिती आहे. त्याचबरोबर ही कारवाई अजूनही सुरूच आहे.

भारताच्या या कारवाईनंतरही दहशतवादाला आश्रय देणारा पाकिस्तान आपल्या कारवायांपासून मागे हटत नसून सीमेवर जोरदार गोळीबाराबरोबरच अनेक ठिकाणी क्षेपणास्त्र » पान ७ वर

## कंदहारचा मास्टरमाईंड अझहरचा खात्मा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये एक मोठा दहशतवादी मारला गेला. भारतीय सैन्याने कंदहार अपहरणाचा सूत्रधार रऊफ अझहरला ठार केले. तो एका क्षेपणास्त्र हल्ल्यात मारला गेल्याचे सांगण्यात येत आहे. ऑपरेशन सिंदूरमधील ही मोठी कारवाई मानली जात आहे.

अब्दुल रऊफ अझहर हा जैश-ए-मोहम्मदचा मोठा दहशतवादी होता. आयसी-८१४ विमानाच्या अपहरणात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. तो या अपहरणाचा सूत्रधार होता. भारतीय सैन्याने



पाकिस्तान आणि पीओकेमधील बहावलपूर आणि मुरीदके येथील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला केला होता. यामध्ये भारतीय लष्करासह हवाई दलानेही महत्त्वाची भूमिका बजावली. पाकिस्तानने स्वतः कबूल केले » पान ७ वर

## कुपवाडमध्ये गोळीबार; सैन्याकडून प्रत्युत्तर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरनंतरही पाकिस्तानकडून नापाक कृत्य सुरू असून, पाकिस्तानकडून वारंवार उकसवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पाकिस्तानने ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या दिवशीही जम्मू-काश्मीरमधील काही भागात गोळीबार केला. पाकिस्तानने कुपवाडा जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवर सीमेपार गोळीबार केला आहे. कुपवाडामधील करनाह भागात गोळीबार करण्यात आल्याची माहिती आहे. भारतीय सैन्यानेही याचं सडेतोड उत्तर दिलं आहे. » पान ७ वर

## पुण्यातून सीमावर्ती राज्यातील उड्डाणे रद्द



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानमधील शहरांवर 'एअर स्ट्राइक' केल्यानंतर देशातील सीमेजवळ असलेले विमानतळ प्रवासी वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पाच शहरांसाठीची विमानसेवा बुधवारी रद्द करण्यात आली आहे. या विमानांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तिकिटाची रक्कम परत किंवा पर्यायी मार्ग निवडण्याची सुविधा देण्यात आली आहे.

पुणे विमानतळावरून अमृतसर, राजकोट, जोधरूर, किशनगड, चंडीगड शहरांसाठी थेट विमान सेवा सुरू आहे. या शहरांसाठीच्या विमान सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद आहे. भारतीय लष्कराने बुधवारी पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' राबविल्यानंतर या पाच शहरांमधील विमानतळ प्रवासी वाहतुकीसाठी बुधवारी सकाळपासून १० मे पर्यंत बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

जम्मू-काश्मीर, अमृतसरसह » पान ७ वर

### पुण्यातून ही उड्डाणे रद्द

- पुणे - अमृतसर
- पुणे - चंडीगड
- पुणे - किशनगड
- पुणे - राजकोट
- पुणे - जोधपूर

## सिंदूरला आंतरराष्ट्रीय प्रतिसाद

नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देत भारतानं पाकिस्तान आणि पाकिस्तान अधिकृत काश्मीर मधील ९ दहशतवादी तळांवर लक्षियत हवाई हल्ले केले. भारतीय संरक्षण मंत्रालयानं 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केल्याची पुष्टी केली असून, हे हल्ले केंद्रित आणि मोजके असल्याचं म्हटलं आहे. यामध्ये कोणत्याही पाकिस्तानी लष्करी तळाला लक्ष्य केलं गेलं नाही. पहलगाम हल्ल्यात २६ भारतीय नागरिक आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाला होता.

आतंकी ठिकाणांवर हवाई हल्ले पाकिस्तानी लष्करानं पुष्टी केली की, भारतीय मिसाईल हल्ल्यांनी मुजफ्फराबाद, कोटली आणि बहावलपूरच्या अहमद ईस्ट भागाला लक्ष्य केलं. इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स (DG ISPR) चे महासंचालक लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी संताप व्यक्त करत सांगितलं की, भारताने बहावलपूरच्या अहमद ईस्ट भागात, कोटली आणि मुजफ्फराबाद येथे तीन ठिकाणांवर हवाई हल्ले केले.

अमेरिका: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या कारवाईवर प्रतिक्रिया देताना म्हटलं, "भूतकाळातील अनुभवांवरून मला माहित होतं की भारत नक्कीच काहीतरी करेल. मी याबद्दल ओव्हल » पान ७ वर



## पाकचा ड्रोन मिसाईल हल्ला उधळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात भारताने'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई केल्यानंतर, पाकिस्तानं भारतातील १५ लष्करी ठिकाणांना लक्ष्य करत ड्रोन आणि मिसाइल हल्ल्याचा प्रयत्न केला. मात्र भारताने वेळेत प्रत्युत्तर देत हा हल्ला अपयशी ठरवला आणि लाहोरमधील पाकिस्तानच्या हवाई संरक्षण प्रणालीला निष्क्रिय केले.

भारत सरकारने दिलेल्या निवेदनानुसार, ७ आणि ८ मे च्या रात्री पाकिस्तानने अवंतीपूरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, भुज, लुधियाना यांसह १५ ठिकाणी » पान ७ वर

### रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम उद्ध्वस्त

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला. यानंतर, भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील ९ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव तीव्र झाला आहे. पाकिस्तानने भारतातील १५ शहरांवर क्षेपणास्त्र हल्ले केले, परंतु भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतच पाकिस्तानी क्षेपणास्त्र हल्ले हाणून पाडले. आता भारताने पाकिस्तानच्या रावळपिंडी स्टेडियमवर हल्ला करून ते स्टेडियम उद्ध्वस्त केले आहे.

## पुन्हा कुरापती काढाल तर... भारताची रोखठोक भूमिका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताननं भारताच्या सैनिकी ठिकाणांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला होता. परराष्ट्र मंत्रालयाच्या गुरुवारी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये याबाबतची सर्व माहिती देण्यात आली. या पत्रकार परिषदेला कर्नल सौफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री उपस्थित होते.

त्यांनी या पत्रकार परिषदेमध्ये सांगितलं की, भारतीय सैन्यांच्या ठिकाणांवर हल्ला करण्याचा प्रयत्न पाकिस्ताननं केला होता. भारतानं त्याचं उत्तर दिलं आहे. भारताने पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टम नष्ट केली आहे. कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितलं की, आम्ही सैनिकी ठिकाणांना लक्ष्य केले नाही. आम्ही पाकिस्तानला यापूर्वीच इशारा दिला होता. आम्ही पाकिस्तानचा हल्ला निष्फळ केला. त्यानंतर पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टम नष्ट केली.

परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेतील ठळक मुद्दे

पाकिस्तानने भारताच्या सैनिकी ठिकाणांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हा हल्ला निष्क्रीय करण्यात आला. हल्ल्याचा मलबा जमा करण्यात आला आहे. पाकिस्ताननं हल्ला केल्याचा हा पुरावा आहे.

भारतीय सशस्त्र दलाने पाकिस्तानातील अनेक ठिकाणी हवाई » पान ७ वर



## सराईत नंदू नाईकच्या जुगार अड्ड्यावर छापा

**पुणे :** कारागृहातून सुटल्यानंतर पुन्हा एकदा जुगार, मटका अड्डा चालविणाऱ्या नंदू ऊर्फ नंदकुमार नाईक याच्या मटका अड्ड्यावर पोलिसांनी पुन्हा कारवाई करत नाईक व त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नंदू नाईक (वय ७०, रा. शाहू चौक, शुक्रवार पेठ), विजय रंगराव शिंदे (वय ६९, रा. शाहू चौक, शुक्रवार पेठ), शंकर सायन्ना मॅडम (वय ६५, रा. महात्मा फुले पेठ) यांच्यासह आणखी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिस नाईक आशिष चव्हाण यांनी खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नंदू नाईक याच्याविरुद्ध मटका, जुगार अड्डा चालविण्याचे ६५ गुन्हे दाखल आहेत. नाईक याने कारागृहातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा एकदा मटका अड्डा सुरू केला होता. याबाबतची माहिती मिळताच खडक पोलिसांनी तेथे छापा टाकला. त्यानंतर नाईक याच्यासह साथीदारांना ताब्यात घेण्यात आले.



## दोन पुस्तकांचा आज प्रकाशन सोहळा

**पुणे :** सृजनसंवाद प्रकाशनातर्फे प्रकाशित ज्येष्ठ कवयित्री अंजली कुलकर्णी लिखित 'असण्याचे सुंदर ओझे' आणि 'शाबूत राहो हे लव्हाळे' या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा शुक्रवार दिनांक ९ मे संध्याकाळी साडेपाच वाजता माधवराव पटवर्धन सभागृह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता रोजी आयोजित करण्यात आला आहे.

ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख भूषविणार आहेत. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे आणि कवी आणि सृजनसंवाद प्रकाशनाचे संपादक गीतेश शिंदे उपस्थित राहणार आहेत.

## वडकीत टेम्पोच्या धडकेत पादचारी तरुण ठार

**पुणे :** रात्रीच्या वेळी रस्ता ओलांडणाऱ्या तरुणाला भरधाव टेम्पोने धडक दिल्यानंतर गंभीर जखमी झाल्याने पादचारी तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना हडपसर - सासवड रस्त्यावरील वडकी नाला येथे रात्री अकराच्या सुमारास घडली. सूरज केशव बापमारे (वय २१, रा. वडकी), असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी महेश प्रकाशराव आगे (वय २९, रा. वडकी) यांनी फुरसुंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आगे यांच्या आत्याचा मुलगा सूरज हा वडकी नाला परिसरात रस्ता ओलांडत होता, त्या वेळी भरधाव टेम्पोने सूरजला धडक दिली. गंभीर जखमी झालेल्या सूरजला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारांपूर्वीच सूरजचा मृत्यू झाला. टेम्पोचालकाचा पोलिस शोध घेत आहेत.

## 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील नालेसफाई करा : डॉ. म्हसे

**पुणे :** पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील नाले आणि ओढ्यांची तातडीने साफसफाई करावी, असा आदेश आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी प्रशासनाला दिला.

मॉन्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने डॉ. म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. या वेळी अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, दक्षता अधिकारी अमोल तांबे, विकास परवानगी विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, सह आयुक्त हिम्मत खराडे व डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, सह महानियोजनकार श्वेता पाटील उपस्थित होते.

मॉन्सूनपूर्व रस्त्यांची कामे आणि दुरुस्ती तातडीने करत मोकळ्या जागांवर टाकलेला राडारोडा न उचलणाऱ्या जागा मालकांवर कारवाई करावी, पूर, दरड कोसळण्याच्या घटना विचारात घेता आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवावी, नालेसफाई तातडीने करत नाल्यांच्या प्रवाहातील अडथळे दूर करण्याचे काम हाती घ्यावे, अशा सूचनाही म्हसे यांनी केल्या.

## नवीन वीजजोडण्यांना प्राधान्य द्या : सुनिल काकडे

**पुणे :** 'वीजबिलांची थकबाकी वाढण्यास पुन्हा सुरुवात झाली आहे. त्यामुळे थकीत वीजबिलांच्या वसुलीला वेग द्यावा. तसेच नवीन वीजजोडण्या देण्यासह नाव बदलण्याच्या अर्जांवर कार्यवाही करण्याचा वेग आणखी वाढवावा," अशा सूचना पुणे परिमंडलाचे नवनियुक्त मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी दिले. महावितरणच्या पुणे परिमंडलाची आढावा बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये काकडे यांनी या सूचना दिल्या. यावेळी अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, युवराज जरग, ज्ञानदेव पडळकर, संजीव नेहेते उपस्थित होते. पुणे परिमंडलात लघुदाब वर्गवारीमधील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडे गेल्या मार्चमध्ये ६९ कोटी रुपयांची थकबाकी होती. त्यापैकी २२ कोटी ५४ लाख रुपयांच्या थकीत बिलांचा भरणा ग्राहकांनी केला आहे. ४१ हजार ७९१ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. उर्वरित ४६ कोटी रुपयांची थकबाकी वसुलीसह ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यास आणखी वेग द्यावा, असेही काकडे म्हणाले.

# गुडलक कॅफे व वैशालीवर अतिक्रमणचा हातोडा..!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील प्रसिद्ध गुडकल कॅफे आणि वैशालीवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेकडून गुडलक कॅफेवरील अतिक्रमण हटवण्यात आले आहे. यादरम्यान गुडलक कॅफेजवळ मोठी गर्दी जमा झाली होती.

पुण्यातील गुडलक कॅफे याची ओळख काही वेगळीच आहे. त्यातील प्रत्येक खवय्येच्या तोंडावर याच कॅफेचे नाव तुम्हाला अनेक वेळेला अनुभवायला मिळाला असेल. कॉलेजच्या तरुणाईपासून ते अगदी ज्येष्ठ नागरिकांपर्यंत या कॅफेची ख्याती काही औरच आहे. गुडलक कॅफेमध्ये मिळणारा बन मस्का आणि इराणी चहासाठी केवळ पुणेकरच नाही, तर आसपासच्या शहरांतूनही अनेकजण खास पुण्यात येतात. परंतु प्रसिद्धी आणि अनधिकृत बांधकाम या निराळ्या गोष्टी असल्याचे प्रशासनाने सांगितले. यामुळे गुडलक कॅफेचा अर्धा भाग अनधिकृत असल्याने महापालिकेने हातोडा चालवला.

पुणे मनपाकडून फर्ग्युसन रस्ता, जेएम आणि डेक्कन परिसरातील अनधिकृत बांधकामावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. अनधिकृत ठिकाणांवर मनपाने जेसीबी फिरवला आहे. आज पुण्यातील प्रसिद्ध गुडलक कॅफेवर कारवाई करण्यात आली असून त्यापाठोपाठ वैशाली रेस्टॉरंटवरही कारवाई करण्यात आली आहे. वैशाली रेस्टॉरंटचा बाहेरील परिसर अनधिकृत असल्याने पालिकेने जेसीबी चालवला आहे.

गुडलक कॅफेचा बाहेरील भाग, जिथं टेबल लावण्यात आली आहेत, तसंच पत्रे लावलेली रचना अनधिकृत असल्याने त्यावर कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. कॅफेकडून साइड मार्जिनच्या नियमांचंही उल्लंघन करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे याचे अनधिकृत बांधकाम पाडण्यात आल्याची माहिती आहे.

या कारवाईमुळे बुधवारी संध्याकाळी या ठिकाणी आलेल्या ग्राहकांची मोठी गैरसोय झाली. महापालिकेने आधीच संबंधित व्यावसायिकांना नोटीस बजावल्या होत्या, मात्र कारवाईसाठी वेळ न घेतल्याने थेट जेसीबीद्वारे अतिक्रमण हटवण्यात आले.





> "सार्वजनिक ठिकाणांवर केलेल्या कोणत्याही अनधिकृत अतिक्रमणावर कारवाई अनिवार्य आहे. प्रसिद्धता पाहून सूट दिली जाणार नाही. शहरात सार्वजनिक वाहतुकीस अडथळा होतो आहे आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ही मोहीम राबवण्यात आली आहे."
> **- पालिका अधिकारी**



## लोकमान्य कल्चरलतर्फे आज 'ज्याचा त्याचा विठ्ठल' कार्यक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी आणि लोकमान्य कल्चरल फाउंडेशनच्या वतीने 'ज्याचा त्याचा विठ्ठल' हा कार्यक्रम शुक्रवारी (दि. ९) सायंकाळी साडेसात वाजता समवसरण या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेच्या खुल्या रंगमंचावर सादर होणार आहे. संगीत-चित्र-नाट्य अभिवाचनाचा अनोखा मेळ असलेला, भक्ती आणि आत्मभानाच्या दिशेने नेणारा 'ज्याचा त्याचा विठ्ठल' हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असणार आहे.

फाउंडेशनतर्फे या कार्यक्रमासाठी मर्यादित प्रवेशिका उपलब्ध करून दिल्या जाणार असून त्या लोकमान्य सोसायटीच्या सातारा रस्ता, नवी पेठ, नारायण पेठ, कर्वेनगर आणि सेनापती बापट रस्ता या शाखांमध्ये उपलब्ध असणार आहेत. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर हा कार्यक्रम असून ग्राहक-सभासद व रसिक प्रेक्षकांनी प्रवेशिका संबंधित शाखांमधून घ्याव्यात, असे आवाहन फाउंडेशनने केले आहे.

# 'लालपरीला' अखेर 'शहाणपण'...!

### एसटी स्थानकांत आता 'तिसरा डोळा': आओ जाओ घर तुम्हारा बंद

शहरातील एसटीची बसस्थानके ही तळीरामांचा आणि गर्दुल्यांचा अड्डा बनली होती, त्याशिवाय डोक्यावर निवारा असू अथवा नसो याठिकाणी रात्रभर 'आसरा' घेत असलेल्या अवलियांची संख्या काही कमी नव्हती. त्यामुळे महिला आणि तरुणींना याठिकाणाहून जाताना असुरक्षितपणे जावे लागत होते, तरीही महामंडळाचे अधिकारी आणि पोलीस प्रशासनही मूग गिळून गप्प असल्याने त्यांचे चांगलेच फावले होते. मात्र; दीड ते दोन महिन्यांपूर्वी स्वारगेट बसस्थानकात बसमध्ये तरुणीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेनंतर प्रशासनाला जाग आहे. हे 'शहाणपण' सुचताना बसस्थानकावर कडेकोट बंदोबस्त ठेवण्याचा निर्णय महामंडळाने घेतला असून त्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

> पुणे विभागातील सर्व बसस्थानकांवर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सुरक्षारक्षक, सीसीटीव्ही अन् हायमॉस्ट दिवे आणि बॅरिकेड्स लावण्यात येणार आहे. शिवाय दोन शिफ्टमध्ये महिला सुरक्षारक्षक ड्यूटीवर नेमण्यात येणार आहे. प्रवाशांना सुरक्षित प्रवास देण्यासाठी एसटी प्रशासन कटिबद्ध आहे.
> **-अरुण सिया,** विभाग प्रमुख




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वर्दळ असणाऱ्या स्वारगेट, शिवाजीनगर आणि वल्लभनगर या आगारात सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षारक्षक आणि हायमास्ट दिव्यांची संख्या आता जास्त असणार आहे. स्वारगेट बसस्थानकात तरुणीवर झालेल्या बलात्कार घटनेनंतर पुणे एसटी विभागातील सर्व स्थानकांत सुरक्षा यंत्रणा वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ३०० सीसीटीव्ही कॅमेरे, २६२ पुरुष आणि महिला सुरक्षारक्षक, हायमास्ट दिवे आणि बॅरिकेड्स लावण्यात येणार आहे.

स्वारगेट प्रकरणानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पुणे विभागातील १४ आगारांतर्गत येणाऱ्या ४२ स्थानकांचे सुरक्षा ऑडिट करण्यात आले होते. यामध्ये सर्व स्थानकांवर सुरक्षारक्षक, सुरक्षा भिंत, सीसीटीव्ही कॅमेरे आणि पुरेशी प्रकाश व्यवस्था या गोष्टींची कमतरता आढळून आली होती. यातून धडा घेत भविष्यात अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी एसटी प्रशासनाकडून वरिष्ठांकडे सुरक्षा मजबूत करण्यासाठी तपशिलासह एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयास पाठविण्यात आला होता. पुणे विभागात ही घटना घडल्यामुळे त्यांनी तातडीने पुणे विभागातील १४ आगारांतर्गत येणाऱ्या ४२ बसस्थानकांचे सुरक्षा ऑडिट करण्यात आले होते. त्यांनतर सुरक्षेच्या दृष्टीने कमतरता असणाऱ्या गोष्टींवर भर देण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे आता सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षारक्षक आणि हायमास्ट दिवे आणि सुरक्षा भिंत बांधण्यात येणार आहे. यामध्ये पुणे विभागातील प्रत्येक बसस्थानकात प्रामुख्याने प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा रक्षक, सुरक्षा भिंत आहे का? या चार गोष्टी तपासण्यात आल्या. परंतु, बहुतांश स्थानकावर या गोष्टींचा अभाव असल्याचे दिसून आले. त्यामुळे सुरक्षा ऑडिटमध्ये या सर्व गोष्टी तेथे असाव्यात, अशी शिफारस केली.

प्रवास करणाऱ्या महिलांच जास्त आहेत. बसस्थानकात कोणत्याही प्रकारच्या अडचण येऊ नये, यासाठी सर्व बसस्थानकांत महिला सुरक्षा नेमण्यात येणार आहे. शिवाय या सुरक्षारक्षक दोन शिफ्टमध्ये कामावर असणार आहेत. तसेच ज्या बसस्थानकात सीमा भिंत नाही, त्याठिकाणी सीमा भिंत बांधण्यात येणार आहे.

**अशी असणार 'नजर'...!**

- ३०० सीसीटीव्ही कॅमेरे
- २६२ पुरुष आणि महिला सुरक्षारक्षक
- दोन शिफ्टमधे चालणार काम
- हायमास्ट दिवे आणि बॅरिकेड्स
- बसस्थानकांना सीमा भिंत
- ठराविक कालावधीत सुरक्षा ऑडिट सक्तीचे

## धोकादायक फांद्यांची छाटणी करा : जठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या वर्षी पावसाळयाच्या काळात वडगावशेरी, खराडी आणि चंदननगर भागात महापालिका प्रशासनाने पावसाळापूर्व कामे न केल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले. या दुरावस्थेला महापालिकेचे अधिकारीच जबाबदार आहेत, असा आरोप ठाकरे गटाच्या युवा सेनेचे शहर उप प्रमुख शिवप्रसाद जठार यांनी केला. गेल्या वर्षीचा अनुभव लक्षात घेऊन या परिसरातील झाडांच्या फांद्यांची छाटणी करावी आणि नालेसफाई करावी अशी मागणीही त्यांनी केली.

यासंदर्भात जठार यांनी महापालिकेच्या नगर रस्ता वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयात निवेदन दिले असून या निवेदनाद्वारे ही मागणी करण्यात आली आहे. या निवेदनात जठार यांनी म्हटले आहे की; प्रभाग क्रमांक ३, ४ आणि ५ या प्रभागात नालेसफाईची कामे झालेली नव्हती. त्यामुळे या परिसरातील रस्त्यावर आणि गल्लीबोळातील रस्त्यावर पाणी घुसले होते. हे पाणी नागरिकांच्या घरात घुसल्याने त्यांचा संसारच पाण्यात बुडाला होता, त्यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. गेल्या वर्षी झाडांच्या फांद्याची छाटणी न झाल्याने रस्त्याच्या मध्येच झाडे पडली होती, तसेच काही वाहनांवरही झाडाच्या फांद्या पडल्याने नागरिकांची सुरक्षाच धोक्यात आली होती. त्यामुळे गेल्या वर्षीचा हा अनुभव लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने यंदा तरी त्यातून धडा घेण्याची आवश्यकता आहे.





> गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेत प्रशासक असल्याने अधिकारी विकासकामे करण्यास टाळाटाळ करत आहेत, त्याचा त्रास या भागातील नागरिक आणि वाहनचालकांना होत आहे. त्याशिवाय झाडांच्या फांद्यांची छाटणी न झाल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे, त्यामुळे यापुढील कालावधीत असा हलगर्जीपणा कदापीही खपवून घेणार नाही.
> — **शिवप्रसाद जठार,** उप शहर प्रमुख, युवा सेना (ठाकरे गट)

## जयप्रकाश सोमाणी ऑफ आत्मनिर्भर पुरस्काराने सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुप्रिम कोर्टाचे अधिवक्ते व नानी पालखीवाला नॅशनल लॉ क्लब(NPNLC) चे अध्यक्ष जयप्रकाश बन्सीलाल सोमाणी यांना संपूर्ण भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वाढ आणि सक्षमीकरणात कायदेशीर आणि आयात निर्यात क्षेत्रात दिलेल्या मौल्यवान योगदानाबद्दल एमएसएमई चॅम्पियन ऑफ आत्मनिर्भर भारत हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. नुकत्याच नवी दिल्लीतील हॉटेल हॉलिडे इन येथे झालेल्या एमएसएमई (मायक्रो ,स्मॉल मिडीयम ओन्ड एन्टरप्राईज) भारत समिट २०२५ च्या वेळी हा पुरस्कार स्वयंमच्या संस्थापक आणि अध्यक्षा सुश्री स्मिनू जिंदाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.या वेळी सोमाणी म्हणाले "भारत सरकारचा हा उपक्रम चांगला आहे.भारतीय अर्थकारणामध्ये या विभागाचा ४० ते ६० टक्के वाटा आहे.अशा संस्थेबरोबर २० वर्षे काम करण्याची संधी मिळाल्याने मी खूप समाधानी आहे. नानी पालखीवाला नॅशनल लॉ क्लबचे १६ विभाग असून त्यांनी शंभर हून अधिक मोफत कायदेशीर सल्लागार शिबिरे भारतभर भरविली आहेत."

जयप्रकाश सोमाणी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध केस कायद्यांवर ६० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर विविध कायदेशीर विषयांवर असंख्य मोफत व्हिडिओ उपलब्ध आहेत.



**पुणे** सुप्रिम कोर्टाचे अधिवक्ते व नानी पालखीवाला नॅशनल लॉ क्लब(NPNLC) चे अध्यक्ष जयप्रकाश बन्सीलाल सोमाणी यांना संपूर्ण भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वाढ आणि सक्षमीकरणात कायदेशीर आणि आयात निर्यात क्षेत्रात दिलेल्या मौल्यवान योगदानाबद्दल एमएसएमई चॅम्पियन ऑफ आत्मनिर्भर भारत हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला.

# शास्त्रीय संगीताच्या रियाजामुळे बुद्धी विकास : पं.रोणू मजुमदार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "गुरु केवळ शैक्षणिक ज्ञान देत नाही, तर आयुष्याला दिशा देण्याचे काम करत असतो. आपल्यातील सर्वोत्तम गुण हेरून विद्यार्थ्यांना घडवण्याचे सामर्थ्य गुरुकडे असते. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुचे स्थान अलौकिक आहे. आपण समर्पित भावनेने काम करत राहावे, तसेच विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक गॅजेटस् पासून दूर राहून छंद जोपासावेत. बासरीप्रमाणे भारतीय शास्त्रीय संगीताच्या रियाजामुळे विद्यार्थ्यांचा बुद्धी विकास सहज शक्य होऊन सर्वांगीण विकास साधला जाऊ शकेल," असे मत ज्येष्ठ बासरीवादक पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांनी व्यक्त केले. भारतीय संगीत ही अध्यात्माची वाट आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुजुमदार बोलत होते. संगीत आणि गुरुकुल परंपरा यांचा संगम म्हणजे आपल्या संस्कृतीचे वैभव आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनतर्फे पंडित रोणू मजुमदार यांना 'सूर्यदत्त सूर्यभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिक्षण, कला, समाजसेवा आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो. गायिका आनंदी रोणू मजुमदार, शास्त्रीय गायिका सानिया पाटणकर आणि प्रसिद्ध आर्किटेक्ट सुजाता कोडग यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय स्त्रीशक्ती पुरस्कार' देण्यात आला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया व सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.पंडित मजुमदार यांनी बासरीवादन करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.



> "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी रंगमंचीय कला महत्वाच्या भूमिका निभावतात. नाटक, नृत्य, गायन आणि अभिनय यांसारख्या कलांमुळे केवळ सर्जनशीलता वाढत नाही, तर नेतृत्वगुण संवाद कौशल्य आणि निर्णयक्षमता सुधारते. रंगमंच हा शिक्षणाचा एक अविभाज्य भाग असायला हवा.
> **—प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया,** संस्थापक अध्यक्ष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन

# ‘बर्ड पार्क’ साठी हवी इच्छाशक्तीची ‘भरारी’...!

## खर्च साठ कोटींचा : काम मात्र संथ गतीने; दिरगांईचा पक्षी प्रेमींना फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राजीव गांधी प्राणिसंग्रहालयात समृद्ध पक्षीवैभव पुणेकरांना अनुभवता यावे, यासाठी बर्ड पार्कच्या कामाला गती मिळावी, अशी मागणी प्रशासनासह पालिकेकडे होत आहे. परंतु राजीव गांधी प्राणिसंग्रहालयातील प्रस्तावित 'बर्ड पार्क'चे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले आहे. अतिशय संथ गतीने सुरू असलेल्या कामांमुळे तब्बल साठ कोटी रुपये खर्चून उभारले जाणारे हे 'बर्ड पार्क' अद्याप कागदावरच अस्तित्वात असल्याचे दिसून येत आहे.

पुणे महानगरपालिकेने पुढाकार घेत, राजीव गांधी संग्रहालयाचा मास्टर प्लॅनमध्ये 2023 मध्ये सुधारणा करून, तो स्मार्ट मास्टर प्लॅन तयार केला. त्यानुसार येथे पक्षीप्रेमी आणि पर्यटकांसाठी देशी-विदेशी पक्षी पाहता यावेत, याकरिता 'बर्ड पार्क' उभारण्याचे नियोजन केले.

परंतु, गेल्या दोन वर्षांपासून पक्षिप्रेमी पुणेकरांच्या वाट्याला 'बर्ड पार्क'च्या बाबतीत वाट पाहवीच लागत आहे.पुणेकर ञ्च्बर्ड पार्क'च्या प्रतीक्षेत आहेत. 'बर्ड पार्क'च्या दिरंगाईमुळे विदेशी पक्षी पाहाण्याचे स्वप्न भंग होईल की काय, असा प्रश्न पुणेकरांना पडला आहे.





सद्य:स्थितीत प्राणिसंग्रहालयात केवळ मोर, घुबड आणि गिधाडे यांसारखे काही मोजकेच पक्षी पाहायला मिळतात. त्यामुळे लहान मुलांना विविधरंगी आणि आकर्षक देशी-विदेशी पक्षी दाखवण्याची इच्छा असणाऱ्या पालकांचा हिरमोड होत आहे. पुणेकरांची तुलना नेहमीच इतर शहरांमधील प्राणिसंग्रहालयांशी केली जाते.

म्हैसूरचे राजा चामराजेंद्र प्राणिसंग्रहालय आणि दिल्लीतील राष्ट्रीय प्राणिसंग्रहालय त्यांच्याकडे असलेले असंख्य विविध प्रकारचे प्राणी, पक्षी प्रजातींसाठी ओळखले जातात. या संग्रहालयांमध्ये देशीच नव्हे, तर अनेक दुर्मीळ विदेशी पक्षीही पाहायला मिळतात. राजीव गांधी प्राणिसंग्रहालयातही अशाच प्रकारची विविधता असावी, अशी अपेक्षा नागरिक प्रशासनाकडे व्यक्त करत आहेत.





### अशी आहे ‘बर्ड पार्क’ची संकल्पना



- कायद्यात सुधारणा करुन मास्टर प्लॅन तयार
- देशी आणि विदेशी पक्ष्यांच्या विविध प्रजाती
- साठ कोटी रुपयांचा खर्च
- ५९ विविध प्रकारचे देशी आणि विदेशी पक्षी
- तलावाच्या रमणीय परिसरात हे 'बर्ड पार्क' साकारणार

**हे आहेत देशी-विदेशी पक्षी: करकोच्याच्या जातीचा पेंटेड स्ट्रोक, व्हाइट नॅक्ड स्ट्रोक, व्हाइट्स इबिस, ग्लॉसी इबिस, स्पूनबिल, शेल्डक, पिन्टेल डक, स्पॉटबिल डक, ग्रे पेलिकन, हेडेड गुस, स्कॅलि मुनिआ**

यासंदर्भात महापालिका प्रशासनाने ‘मास्टर प्लॅन’ तयार केला असून त्याला अंतिमत: मंजूरीही देण्यात आली आहे, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी साठ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाला येत्या काही दिवसातच मूर्त स्वरुप देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे, त्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात येत आहे.

**-अशोक घोरपडे,** उद्यान अधीक्षक, पुणे मनपा

## शरद पवार यांची लेकीसाठी फिल्डींग



**पुणे :** राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुण्यातील मोदीबागमध्ये माध्यमांशी बोलताना सगळ्यांची विचारधारा एक आहे, शिंदेसोबत जे गेले ते आमच्यासोबत आले तर आश्चर्य वाटायला नको, याचा निर्णय सुप्रिया सुळे यांनी घ्यायचा आहे असं वक्तव्य केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. अशातच ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.शिंदेसोबत गेले ते पुन्हा आमच्यासोबत आले तर आश्चर्य वाटायला नको. याचा निर्णय अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांनी घ्यायचा आहे. असं शरद पवार म्हणाले आहेत. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांना फटका बसल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## नृत्यगुरु पं.मनीषा साठे यांचा न्यूझीलंडमध्ये 'नृत्य संवाद'

**पुणे :** नृत्यगुरु पं.मनीषा साठे यांच्या 'मनीषा नृत्यालय'च्या सुवर्ण महोत्सवानिमित्त 'शांभवीज् इंटरनॅशनल स्कुल ऑफ कथक' तर्फे न्यूझीलंडमध्ये 'नृत्य संवाद' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पं.मनीषा साठे आणि त्यांची कन्या शांभवी दांडेकर या दोघींच्या कथक नृत्याचे सादरीकरण या कार्यक्रमात होणार आहे.दि.१६ मे २०२५ रोजी ऑकलंड परफॉरमिंग आर्ट सेंटर(ऑकलंड) ,दि.२४ मे रोजी वेलिंग्टन,दि.२५ मे रोजी ख्राईस्टचर्च येथे हे कार्यक्रम होणार आहेत.कथक नृत्य क्षेत्रातील योगदानाबद्दल पं.मनीषा साठे यांचा सत्कारही न्यूझीलंडस्थित भारतीयांच्या वतीने करण्यात येणार आहे. 'मनीषा नृत्यालय'च्या सुवर्ण महोत्सवानिमित्त भारतात आणि परदेशात अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून हा त्यापैकी एक आहे.



## मराठी पत्रकार संघाच्या शहराध्यक्षपदी हेमंत जाधव

**पुणे :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शहर व जिल्हाध्यक्षपदी हेमंत पांडुरंग जाधव यांची निवड करण्यात आली आहे; संघाचे प्रदेशाध्यक्ष मनिष केत आणि संघटक संजय भोकरे यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले. अन्य कार्यकारिणी पुढीलप्रमाणे- उपाध्यक्ष: प्रणव प्रकाश पवार, सरचिटणिस: विकास भागवत माने, चिटणिस: संदिप नारायण शिंदे, सदस्य: संतोष सिताराम फुटक व सुभाष जगन्नाथ सुर्वे. पुणे शहर व जिल्ह्यातील यु ट्युब चॅनल्स, वेब न्युज पोर्टल, डिजिटल साप्ताहिके, पाक्षिके आदी क्षेत्रात काम करत असलेल्या मुक्त पत्रकारांचे संघटन या पत्रकार संघाच्या माध्यमातून केले जाणार आहे.





## रविंद्र गोलर लायन्स प्रेसिडेन्शियल अॅवॉर्डने सन्मानित

**पुणे :** लायन्स आंतरराष्ट्रीय संघटना डिस्ट्रिक्ट ३२३४ डी-२ च्या ७व्या वार्षिक अधिवेशनात लायन रविंद्र गोलर यांना लायन प्रेसिडेन्शियल अॅवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले. सध्या कॅबिनेट सचिव पदावर कार्यरत असलेल्या गोलर यांना वर्षभर विविध सामाजिक कार्यात केलेल्या सक्रिय सहभागाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

लायन्स क्लबचा सर्वोच्च मानला जाणारा हा प्रेसिडेन्शियल मेडल प्रांतपाल विजय सारडा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी राज मुछाल आणि मान्यवर उपस्थित होते.

रविंद्र गोलर म्हणाले, लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजातील विविध गरजू घटकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांची सेवा करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे. या पुरस्काराने पुढील सेवाकार्यासाठी नवी ऊर्जा मिळाली आहे. समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढली आहे आणि ती प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन. लायन्स क्लबने दिलेल्या संधीमुळे अनेक उपक्रम राबविता आले आणि लोकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवता आला. भविष्यातही अधिक व्यापक पातळीवर काम करण्याचा प्रयत्न राहील.

# बेशिस्तांचा होणार ‘कचरा’...!

## राडारोडा टाकल्यास थेट कारवाई : निर्वाणीचा इशारा

कचरा, राडारोडा अथवा घाण टाकण्यासाठी ‘पीएमआरडीएसह नगरपरिषदा आणि महापालिका प्रशासनाने सोयी सुविधा निर्माण केल्या आहेत. मात्र; हे वास्तव असतानाही मोकळया आणि सार्वजनिक जागेतही अस्ताव्यस्त कचरा टाकण्याचे प्रमाण वाढले असून नागरिकांची मानसिकता अद्यापही बदललेली नाही. त्यामुळे त्या परिसरात दुर्गंधी पसरत असून साथीच्या आजारात वाढ झाली आहे; विशेष म्हणजे याठिकाणी जनावरांचा अड्डा भरत असल्याने डासांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यातूनच रोगांना खतपाणी मिळत आहे, त्यामुळे त्यांच्यावर नियत्रंण ठेवण्यासाठी आता खुद्द ‘पीएमआरडीए’ ने पुढाकार घेतला असून या बेशिस्तपणाचा थेट ‘कचरा’ करण्यात येणार आहे.

मोकळया जागेत कचरा टाकण्यात येऊ नये यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली आहे, तरीही नागरिकांची मानसिकता अद्यापही बदललेली नाही ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे यापुढील कालावधीत अशा बेशिस्त नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही.

**-डॉ. योगेश म्हसे,** आयुक्त, पीएमआरडीए



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील नाल्यांच्या साफसफाईला गती देण्याची तसेच रस्त्यांची कामेही तातडीने करण्यात येणार असून, मोकळ्या जागांवर टाकलेला राडारोडा टाकणाऱ्यांवर आणि तो न उचलणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा व सूचना पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली आहे.

मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली आकुर्डी येथील कार्यालयात बैठक झाली. त्या वेळी संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून पीएमआरडीए यंत्रणेचा आढावा घेण्यात आला.पीएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंघला, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, विकास परवानगी विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, मुख्य अग्निशामक अधिकारी देवेंद्र पोटफोडे, सहआयुक्त हिंमत खराडे, सह आयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, सह महानियोजनकार श्वेता पाटील यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

मान्सूनपूर्व रस्त्यांची कामे, त्यांची दुरुस्ती तातडीने करत मोकळ्या जागांवर टाकलेला राडारोडा न उचलणाऱ्या संबंधित जागामालकांवर कारवाई करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. पीएमआरडीएच्या हद्दीत सर्रास राडारोडा टाकला जात आहे. त्यामुळे जागामालकांनी तो तातडीने काढून घ्यावा, अशी सूचनाही करण्यात आली. आपत्ती प्रतिसाद पथकाला पूर, दरड कोसळणे यासह अन्य संभाव्य आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्ज राहण्याची सूचना करण्यात आली. तसेच अर्बन ग्रोथ सेंटर भागातील नालेसफाई तातडीने करून नाल्यांच्या प्रवाहातील अडथळे दूर करण्यासंदर्भातही कार्यवाही करण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आल्याची माहिती डॉ. म्हसे यांनी दिली.

## वडगाव उड्डाणपूल : सिग्नलच्या वेळेत वाढ



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर आता वडगाव उड्डाणपूल चौकातील सिग्नलच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता या भागातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. सिंहगड रोडवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलावर झालेल्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

वडगाव उड्डाणपूल चौकातून धायरीकडे जाणाऱ्या सिग्नलच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे या भागातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे. या उड्डाणपुलावरून उतरणारी वाहने वडगाव उड्डाणपूल चौकातून धायरीकडे जातात. वडगाव चौकातील सिग्नलची वेळ पूर्वी ७० सेकंद होती. वेळ कमी मिळत असल्याने वाहनचालकांना चौक ओलांडणे शक्य होत नव्हते. त्यामुळे उड्डाणपुलावर कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले. यानंतर अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी या भागाची नुकतीच पाहणी केली. त्यानंतर वडगाव उड्डाणपूल चौकातील सिग्नलच्या वेळेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार वडगाव उड्डाणपूल चौकातून धायरीकडे जाणाऱ्या वाहनांसाठी आता १०० सेकंद देण्यात आले आहेत.

दरम्यान सिग्नलच्या वेळेत वाढ करण्यात आल्याने या भागातील वाहतूक सुरळीत झाली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## छायाचित्रकारांच्या नजरेतून जनजीवन; निसर्गाचे ‘प्रतिबिंब’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील हौशी, प्रतिभावान छायाचित्रकारांनी काढलेल्या वैविध्यपूर्ण छायाचित्रांमधून ग्रामीण जनजीवन आणि निसर्गाचा विलोभनीय आविष्कार पुणेकरांसमोर आज आला.

पुणे कॉटन कंपनी, देहम् नेचर क्युअर आणि कृतार्थ यांच्या संयुक्त विद्यमाने हौशी छायाचित्रकारांच्या ‘प्रतिबिंब’ या छायाचित्रांचे प्रदर्शन बालगंधर्व कला दालनात भरविण्यात आले असून प्रदर्शनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध पक्षी छायाचित्रकार डॉ. सुधीर हसमनीस आणि क्रिकेट विश्लेषक-समालोचक सुनंदन लेले यांच्या हस्ते झाले. देहम् नेचर क्युअरचे संचालक डॉ. सुजय लोढा, डॉ. कोमल लोढा, कृतार्थचे संचालक निलेश शुक्ला, दिपाली शुक्ला, उद्योजक निरंजन देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अमर अतितकर, अमेय वाळवेकर, ओंकार मुळगुंद, केदार दंडगे, विलास तोळसंकर, समीर अय्यर, विश्वेश बेहरे, अनंतप्रसाद देशपांडे, अमोद फडके आणि सागर मुथा यांची व्यन्यजीव, पक्षी, निसर्ग आणि ग्रामीण जनजीवन या विषयांवरील अनोखी छायाचित्रे प्रदर्शनात आहेत. प्रदर्शन दि.१० मे पर्यंत सकाळी १० ते रात्री ८ या वेळात सर्वांसाठी खुले आहे.



पुणे पुणे कॉटन कंपनी, देहम् नेचर क्युअर आणि कृतार्थ यांच्या संयुक्त विद्यमाने हौशी छायाचित्रकारांच्या ‘प्रतिबिंब’ या छायाचित्रांचे प्रदर्शन बालगंधर्व कला दालनात भरविण्यात आले आहे.



## फुले यांचे स्मारक पूर्णत्वास न्यावे : डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे :** "सामाजिक न्यायासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्मारक लवकर पूर्णत्वास न्यावे," असे निर्देश महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले आहे.

फुले स्मारकाचे काम सुरू असून, याबाबत आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी स्मारक समितीचे अध्यक्ष नीलेश गिरमे यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. गोऱ्हे यांनी स्मारक परिसराचे नियोजन, उभारणीसाठी लागणाऱ्या निधीच्या वापराची माहिती, समितीची रचना व कार्यपद्धती आणि त्याच्या सध्याच्या प्रगतीची चौकशी केली. स्मारकाचे परिसरातील मालक, भाडेकरू कुटुंबांना मोबदला, त्यांचे पुनर्वसन, जमीन अधिग्रहण, स्मारकाची डागडुजी, आवश्यक सोयीसुविधा, स्मारकाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था या सर्व विषयांबाबत संबंधित विभागांनी जबाबदारी वेळेत पार पाडावी, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

# थॅलेस्मियाग्रस्त मुलांसाठी गणेशभक्त करणार रक्तदान




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ‘बाप्पाचा कार्यकर्ता.. रक्तदाता उपक्रम’ हे आणखी एक विधायक कार्य हाती घेतले आहे. पुण्यातील एकवीस गणपती मंडळांचे कार्यकर्ते थॅलेस्मियाने ग्रस्त मुलांसाठी दर महिन्याला रक्तदान करणार आहेत.

जागतिक थॅलेस्मिया दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाचा शुभारंभ आज (दि. ८) ससून रुग्णालयात करण्यात आला. या उपक्रमाचे संयोजन पियूष शाह व स्वप्नील दळवी करणार आहेत.

या उपक्रमात साईनाथ मंडळ ट्रस्ट, बुधवार पेठ, सेवा मित्र मंडळ, शुक्रवार पेठ, अष्टविनायक मित्र मंडळ, नवी पेठ, श्री शनि मारुती बाल गणेश मंडळ, एरंडवणे, नवज्योत मित्र मंडळ ट्रस्ट, येरवडा, श्री पोटसुळ्या मारुती मंडळ, गणेश पेठ, एकता मित्र मंडळ, अरण्येश्वर, नवजवान मित्र मंडळ, गणेश पेठ, व्यवहार आळी चौक मित्र मंडळ, कसबा पेठ, वीर शिवराज मंडळ गुरुवार पेठ, संयुक्त मित्र मंडळ, सदाशिव पेठ नागनाथ पार चौक, नवग्रह मित्र मंडळ, कसबा पेठ, वीर हनुमान मित्र मंडळ, क्रांती चौक, बुधवार पेठ, सत्यवीर मित्र मंडळ, शिवदर्शन, श्री अष्टविनायक मित्र मंडळ, येरवडा, त्रिशुंड मयुरेश्वर विजय मंडळ ट्रस्ट, सोमवार पेठ, राष्ट्रीय साततोटी हौद मंडळ ट्रस्ट, कसबा पेठ, युवा वाद्य ढोल पथक, जनार्दन पवळे संघ, अखिल मोहन नगर मंडळ आणि विधायक मित्र मंडळे सहभागी झाली आहेत.

या मंडळांचे कार्यकर्ते दर महिन्याला ससून रुग्णालयात थॅलेस्मियाने ग्रस्त मुलांसाठी रक्तदान करणार आहेत. वर्षभरात साधारण 250 पेक्षा अधिक कार्यकर्ते रक्तदाते होणार आहेत. गणेश मंडळांच्या वतीने रक्तादन शिबिर आयोजित करण्यात येते त्यास ससून रुग्णालयातील रक्तपेढीला प्राधान्य देणार आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन पियूष शाह, शिरीष मोहिते, स्वप्नील दळवी, राहुल जाधव, अमित जाधव, कुणाल पवार, राकेश दाखवे, शंतनू पाटसकर, किरण सोनीवाल, आदित्य मारणे, हर्षद नवले, सचिन पवार, सुधीर ढमाले, अभिषेक मारणे यांनी केले. उपक्रमास ससून हॉस्पिटलचे डीन डॉ. एकनाथ पवार, अधीक्षक यल्लाप्पा जाधव, थॅलेस्मिया वॉर्डच्या डॉ. आरती किणीकर, स्टाफ विद्या सुपेकर यांचे सहकार्य लाभले.

# समस्या सोडवण्यासाठी अधिकारी रस्त्यावर

## कसबा मतदारसंघात प्रशासनाचा व्यापक पाहणी दौरा; आमदारही 'ऑनफिल्ड'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समस्या सोडवण्यासाठी नागरिकांना वारंवार सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात, ही आपल्या व्यवस्थेतील नेहमीची तक्रार. मात्र, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचल्यास अनेक समस्या तत्काळ सुटू शकतात, याचे उत्तम उदाहरण कसबा मतदारसंघात पाहायला मिळाले. आमदार हेमंत रासने यांच्या माध्यमातून नागरी समस्यांचा आढावा घेण्यासाठी एक व्यापक पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यात पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी यामध्ये सहभागी झाले होते.

रस्ते, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि विद्युतपुरवठा यांसारख्या महत्वाच्या विषयांवर अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून समस्यांचे तात्काळ निराकरण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. यावेळी पथविभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर, मलनिसारण मुख्य अभियंता संतोष तांदळे, अतिक्रमण विभागाचे संदीप





खलाटे, परिमंडल 5 चे उपआयुक्त सुनिल बल्लाळ, आकाश चिन्ह उपायुक्त ठोंबरे, भवानी पेठ क्षेत्रीय सहआयुक्त किसन दगडखेर, विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाचे सुहास जाधव, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता तरंग, भाजप कसबा मंडलाध्यक्ष अमित कंक, छगन बुलाखे, प्रशांत सुर्वे यांच्यासह कसबा मतदारसंघातील माजी नगरसेवक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. म्हणाले, "नागरिकांच्या तक्रारी केवळ कागदावर न राहता, प्रत्यक्ष जागेवर जाऊन त्यावर उपाययोजना करणे ही आमची प्राथमिकता आहे. अशा संयुक्त दौऱ्यामुळे समस्या समजून घेणे आणि तातडीने निर्णय घेणे शक्य होते. भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवले जातील. नालेसफाई तसेच ड्रेनेज संबंध देखील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण केली जातील"

### व्यापक मोहिम राबविणार: हेमंत रासने

● स्वच्छ सुंदर आणि विकसित कसबा अभियानांतर्गत कसब्यातील बहुतांश क्रॉनिक स्पॉट बंद करण्यात आले असून या ठिकाणी सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी प्रस्तावित दोन भुयारी मार्गांचा डीपीआर तयार करण्याचे काम देखील सुरू झाले आहे. रस्त्यावरील अनधिकृत फ्लेक्स, अतिक्रमण हटवण्यासाठी प्रशासनाने व्यापक मोहीम राबवण्याची सूचना यावेळी रासने यांनी केली आहे.



" गेली पाच महिन्यांपासून मतदारसंघात अधिकाऱ्यांसह पाहणी दौरा नियमितपणे करण्यात येत आहे. नागरिकांचे प्रश्न ऐकून घेणे आणि जागेवरच उपाययोजना करणे हा या दौऱ्याचा उद्देश आहे. प्रशासनाच्या सक्रिय सहभागामुळे बहुतांश समस्या तत्काळ निकाली काढण्यात आल्या असून, उर्वरित समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्यात येईल.

**-आमदार हेमंत रासने**

# पालिकेत ओबीसींना २७ टक्के आरक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेत १६६ पैकी ४५ जागा या ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षित असणार आहेत. महापालिकांसह मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घेण्याचे आदेश सर्वेच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे आता पुणे महापालिकेची निवडणूक आगामी चार महिन्यात होण्याची शक्यता आहे. तर यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) २७ टक्के आरक्षण असणार आहे.

याशिवाय अनुसूचित जातीसाठी २२, अनुसूचित जमातीसाठी २ तर खुल्या प्रवर्गासाठी ९७ जागा असणार आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित असल्याने ८३ महिलांना संधी मिळेल, यामध्ये ओबीसीतून २३, अनुसूचित जातीतून २२, अनूसुचित जमातीतून एक



आणि खुल्या प्रवर्गातील ४८ महिलांना संधी मिळणार आहे.

सर्वच पक्षाच्या मराठा समाजाच्या राजकीय कार्यकर्त्यांनी कुणबी प्रमाणपत्र मिळवून ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढविण्याची तयारी केली आहे. जर खुल्या प्रवर्गासाठी प्रभागात जागा उपलब्ध नसले तर ते ओबीसीतून निवडणूक लढवतील. तसेच खुल्या व अन्य सर्व प्रवर्गातील पुरुषांसाठी जागा उपलब्ध नसले तर ते त्याठिकाणी महिला आरक्षणाचा फायदा घेत हे राजकीय नेते त्यांची पत्नी किंवा आई, बहिण, वाहिनीसाठी पक्षाकडे उमेदवारी मागतील. तसेच पुणे महापालिकेत ३२ गावे समाविष्ट झाल्याने प्रभाग रचनेप्रमाणे आरक्षित प्रभागांचे चित्र २०१७ च्या तुलनेत वेगळे असणार आहे.

पुणे महापालिकेची निवडणूक २०२२ मध्ये न होऊ शकल्याने गेल्या तीन वर्षापासून महापालिका आयुक्तांच्या तथा प्रशासकाच्या नेतृत्वात कामकाज सुरु आहे. महाविकास आघाडीने मुंबईसह अन्य महापालिकांमधील नगरसेवकांची संख्या वाढवली होती. त्याविरोधात न्यायालयात याचिका दाखल झाली होती, त्याच प्रमाणे ओबीसीच्या आरक्षावरूनही याचिका दाखल झाल्या होत्या. यामध्ये बांठिया आयोगामुळे ओबीसीच्या राज्यभरात ३४ हजार जागा कमी होणार असल्याने वाद निर्माण झाला होता. अशा वेळी ओबीसींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळेल अशी भूमिका महायुती सरकारने घेतली होती.

दरम्यान ओबीसीचे आरक्षणच धोक्यात आल्याने राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. ओबीसींचे आरक्षण पूर्ववत झाल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ देणार नाही अशी भूमिका सर्वच राजकीय पक्षांनी घेतली होती. न्यायालयात हा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर १९९४ पासून ते २०२२ पर्यंत हे ओबीसींचे आरक्षण लागू होते ते कायम ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे २७ टक्के आरक्षण कायम राहिले आहे.

# भूलतज्ज्ञ तुम्हीच आणा, लगेच शस्त्रक्रिया करू

## कमला नेहरू रुग्णालयाचा अजब कारभार चव्हाट्यावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या शासकीय रुग्णालयांमध्ये गरीब आणि गरजू रुग्ण उपचारांसाठी येतात. मात्र, कर्मचाऱ्यांकडून उद्धटपणे उत्तरे दिली जात असल्याचा अनुभव रुग्णांना अनेकदा येतो. रुग्णांशी नीट बोलण्याच्या सूचना अनेकदा देऊनही कर्मचाऱ्यांच्या वागणुकीत फरक पडत नसल्याचे वारंवार निदर्शनास येते. असाच अनुभव कमला नेहरू रुग्णालयात रुग्णाच्या नातेवाइकांना नुकताच आला.

कमला नेहरू रुग्णालयात एका महिलेची पायाची शस्त्रक्रिया पार पडणार होती. शस्त्रक्रियेसाठी रुग्णाची तयारी करण्यात आली. मात्र, भूलतज्ज्ञ उपलब्ध नसल्याने शस्त्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत रुग्णाच्या नातेवाइकांनी नाराजी व्यक्त केल्यावर, 'भूलतज्ज्ञ तुम्हीच आणा, लगेच शस्त्रक्रिया करू', असा



अजब सल्ला देण्यात आला. पायाला दुखापत झाल्याने उपचार घेण्यासाठी महिला कमला नेहरू रुग्णालयात दाखल झाली होती. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंगळवारी सकाळी शस्त्रक्रियेची तयारीही करण्यात आली होती.

मात्र, ऐनवेळी भूलतज्ज्ञ उपलब्ध न झाल्याने शस्त्रक्रिया होऊ शकणार नाही, अशी माहिती देण्यात आली. याबाबत विचारणा केल्यावर कर्मचाऱ्यांनी अजब सल्ला दिल्याचे रुग्णाच्या नातेवाइकांनी सांगितले. कर्मचाऱ्यांच्या अशा वागणुकीला कोण चाप लावणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

कमला नेहरू रुग्णालयात एकच भूलतज्ज्ञ आहेत. मंगळवारी रुग्णालयात एक शस्त्रक्रिया सुरू असल्याने भूलतज्ज्ञ तेथे उपस्थित होते. त्यामुळे दुसरी शस्त्रक्रिया त्यावेळी करणे शक्य नव्हते. मात्र, रुग्णालयातील कर्मचारीवर्गाने रुग्णाशी आणि नातेवाइकांशी उर्मट वर्तन करणे योग्य नाही. याबद्दल त्यांना समज दिली जाईल. तसेच, रुग्णाची शस्त्रक्रियाही तातडीने केली जाईल.

**- डॉ. नीना बोराडे,** आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका

# औंध येथील रस्ता रुंदीकरणाचा मार्ग होणार मोकळा

**पुणे :** औंधमधील मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणास अडथळा ठरणारे विशेष पोलिस महानिरीक्षक मोटार परिवहन विभागाचे कार्यालय स्थलांतरित करण्यास वेग येण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने पोलिस व महापालिका प्रशासनाकडून स्थलांतराच्या प्रक्रियेला गती दिली जात आहे. कार्यालय हटविल्यानंतर रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा होऊन वाहनचालकांची कोंडीतून सुटका होईल.

औंधमधील ब्रेमेन चौक ते राजीव गांधी पूलदरम्यानचा बहुतांश रस्ता ३६ मीटरचा झाला आहे. मात्र, औंध पोलिस चौकी व त्यासमोरील विशेष पोलिस महानिरीक्षक मोटार परिवहन कार्यालय व अन्य एका वास्तूचा रस्ता रुंदीकरणात अडथळा येत होता. कार्यालयांमुळे रस्ता अरुंद होऊन वाहतूक कोंडी होते.

ब्रेमेन चौकाकडून येणाऱ्या व पिंपरी-चिंचवडच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना कार्यालयांच्या अडथळ्यामुळे विरुद्ध दिशेच्या रस्त्यावरून जाण्याची वेळ येते. त्यामुळे यापूर्वी अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार व आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत पोलिस प्रशासनाला सूचना केल्या होत्या.

प्रश्न तातडीने सोडवून रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा करण्याची ताकीद उपमुख्यमंत्री पवार यांनी पोलिस प्रशासनास दिली होती. हा प्रश्न निवडणुकांमुळे पुन्हा प्रलंबित होता. अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी दोन महिन्यांपूर्वी विशेष पोलिस महानिरीक्षक मोटार परिवहन कार्यालयास भेट देऊन पोलिस व महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यानंतर कार्यालय स्थलांतरित करण्याच्या चर्चेला सुरुवात झाली होती.

# पंचकल्याण महोत्सवात "हर्षित" सुरांनी भरला रंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दुधगाव येथील भगवान पार्श्वनाथ नूतन जिनबिंब पंच कल्याण प्रतिष्ठा महामहोत्सवात संगीतकार आणि गायक हर्षित अभिराज यांनी आपल्या गायन कलेच्या माध्यमातून रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची सुरुवात हर्षित अभिराज यांनी "महोत्सव जैन धर्मका" या त्यांच्या लोकप्रिय गीतांनी रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात झाली. यानंतर त्यांनी सादर केलेल्या आया महोत्सव या गीतातून श्री. पार्श्वनाथ भगवान, पूज्य शांती सागर जी महाराज, पूज्य धर्म सागर जी आणि पूज्य विद्या सागर जी महाराज , भट्टारक जिनसेनजी आणि भट्टारक लक्ष्मीसेनजी यांना अभिवादन करून पार्श्वनाथांच्या बारशाला, आलाया उत्सव ही गाणी सादर केली गाडी घुंगराची या गाण्यांवर दुधगावकर रसिकांनी ताल धरला .

प्रसिद्ध संगीतकार रविन्द्र जैन यांना हिंसा पीडित विश्व राह , महावीर स्वामी तुम्हारा सहारा, घुंगरू की तरह , मंगल भवन, बाहुबली भगवान का मस्तकाभिषेक या गीतांच्या माध्यमातून हर्षित अभिराज यांनी वाहिलेली स्वरसुमनांजली विशेष. महोत्सव जैन धर्मका या अजरामर भक्ती गीताने या अविस्मरणीय कार्यक्रमाची सांगता झाली.



पुणे दुधगाव येथील भगवान पार्श्वनाथ नूतन जिनबिंब पंच कल्याण प्रतिष्ठा महामहोत्सवात संगीतकार आणि गायक हर्षित अभिराज यांनी आपल्या गायन कलेच्या माध्यमातून रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची सुरुवात हर्षित अभिराज यांनी "महोत्सव जैन धर्मका " या त्यांच्या लोकप्रिय गीतांनी रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात झाली.

# अनेक पुरस्कार प्राप्त ‘वंश’ लघुपटाला पुणेकरांची पसंती




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जी. ए. कुलकर्णी हे प्रतिभावान लेखक होते. त्यांच्या कथांचा भावार्थ समजणे अवघड असते. त्यांच्या ‘वंश’ या कथेवर साकारलेल्या लघुपटाद्वारे उत्तम वातावरण निर्मिती झाली असून पात्रांच्या भावना प्रेक्षकांपर्यंत सहजतेने पोहोचत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी केले.

जी. ए. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सावी आर्ट्स् आणि वाईड विंग्ज मीडियातर्फे दोन वर्षांपूर्वी ‘वंश’ या लघुपटाची निर्मिती करण्यात आली. या लघुपटाला देश-विदेशात अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून कान्स चित्रपट महोत्सवातही हा लघुपट प्रदर्शित करण्यात आला होता. बीएमसीसीमध्ये आयोजित चित्रपटाच्या प्रदर्शन सोहळ्यात डॉ. आगाशे बोलत होते. जी. ए. कुलकर्णी यांच्या भगिनी नंदा पैठणकर, प्रसिद्ध अभिनेते गिरीश कुलकर्णी, प्रसिद्ध दिग्दर्शक सुनील सुखथनकर तसेच लघुपटातील कलावंत डॉ. वरदा जाधव, सूरज सातव, मैत्रेयी दाते उपस्थित होते. पुणेकरांनी या लघुपटावर पसंतीची मोहोर उमटविली. ‘वंश’ हा लघुपट यू-ट्यूबवरही प्रदर्शित करण्यात आला आहे.

लघुपटाविषयी बोलताना नंदा पैठणकर म्हणाल्या, ‘वंश’ ही कथा समजायला आणि माध्यमांतर करायला खूप अवघड आहे. पण सर्व कलाकारांनी मेहनतीने भूमिका साकारून प्रसंग उठावदार केले आहेत.

निर्मितीविषयी बोलताना गणेश जाधव म्हणाले, जीएंचा वेगळा चाहता वाचकवर्ग देश-परदेशात आहे. परदेशातील चाहत्यांपर्यंत लघुपटाच्या माध्यमातून कथा पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

जी. ए. कुलकर्णी यांचे लिखाण जागतिक पातळीवरील आहे. अशा थोर लेखकाच्या साहित्यकृतीचे माध्यमांतर करणे फार जबाबदारीचे असते. तरुण कलाकार-तंत्रज्ञांनी अवघड जबाबदाऱ्या पेलून पार पाडणे यासारखे सुख नाही. नवनव्या प्रयोगातून सुसंस्कृत समाज घडण्यास मदत होते.

**—गिरीश कुलकर्णी,** प्रसिद्ध अभिनेते

# लक्ष्मण गायकवाड यांना ‘मसाप जीवनगौरव पुरस्कार’

**पुणे :** महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे (मसाप) देण्यात येणारा ज्येष्ठ भाषा अभ्यासक व लेखिका डॉ. अंजली



सोमण पुरस्कृत ‘मसाप जीवनगौरव पुरस्कार’ यंदा ज्येष्ठ लेखक ‘उचल्या’कार लक्ष्मण गायकवाड यांना जाहीर झाला आहे. तसेच, ‘डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार’ स्त्रीवादी चळवळीतील कार्यकर्त्या डॉ. गीताली वि. मं. यांना जाहीर झाला आहे. ‘मसाप’चे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी ही माहिती दिली. २५ हजार रुपये आणि सन्मानपत्र असे जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप असून, ११ हजार रुपये आणि सन्मानपत्र, असे कार्यकर्ता पुरस्काराचे स्वरूप आहे. हे पुरस्कार २७ मे रोजी ‘मसाप’च्या माधवराव पटवर्धन सभागृहात आयोजित १२०व्या वर्धापनदिन सोहळ्यात अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. याप्रसंगी मसापच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम, कार्यकारी विश्वस्त डॉ. पी. डी. पाटील, विश्वस्त यशवंतराव गडाख, उपाध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे, राजीव बर्वे आणि विद्याधर अनास्कर उपस्थित राहणार आहेत.

# किरकोळ वादातून खून; एकास जन्मठेप

**पुणे :** कंपनीत झालेल्या किरकोळ वादातून सहकाऱ्याचा खून करणाऱ्या तरुणाला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. आरोपीला २० हजार रुपयांचा दंड ठोठावला असून दंडाची रक्कम न भरल्यास एक महिना अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे.

सूरज सुनील फाळके (वय २७, रा. लक्ष्मीनगर, कोंढवा बुद्रुक) असे जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर, अमोल खडके असे खून झालेल्याचे नाव आहे. कोंढव्यातील एका खासगी कंपनीमध्ये आरोपी सूरज व अमोल दोघेही कामाला होते. कंपनीत काम करत असतानाच त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यानंतर २६ऑक्टोबर २०२१ रोजी अमोल कंपनीत झोपलेला असतानाच सूरजने त्याच्या डोक्यात सळईने वार केले.

या घटनेत अमोल गंभीर जखमी झाला. त्यास कंपनीतील इतर कर्मचाऱ्यांनी उपचारांसाठी तत्काळ रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. दरम्यान, कोंढवा पोलिसांनी सूरजविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करुन त्यास अटक केली.

# पर्यायी रस्त्यांच्या अभावी वाहतूक कोंडी

**पुणे :** विकास आराखड्यात दाखविण्यात आलेल्या रस्त्यांच्या जागा ताब्यात न येणे तसेच रुंदीकरणापूर्वीच अनेक मोठ्या इमारती उभे राहात असल्याने कोथरूड व परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. कोथरूडमधील विकास आराखड्यातील मिसिंग लिंक, बोगदे एकमेकांना जोडल्यास पर्यायी रस्ते उपलब्ध होऊन अन्य रस्त्यांवरील भार कमी होऊ शकतो. पण ही प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत आहे.

कोथरूडमध्ये विकास आराखड्यात रस्त्यांचे रुंदीकरण सुचविले आहे, पण भूसंपादनातील अडचणी दूर होत नसल्याने रस्ता पूर्ण होत नाही, अशी स्थिती आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही गेल्या महिन्यात महापालिकेत बैठक घेऊन मिसिंग लिंकचे रस्ते पूर्ण करण्याची सूचना प्रशासनाला केली आहे.

# व्यवसायिक मिलेट्स कार्यशाळेचे आयोजन

**पुणे :** आहार व आरोग्यविषयक जागरूकता वाढल्याने भरडधान्ये (मिलेट्स) आता ताटात दिसू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर भरडधान्यांवर प्रक्रिया करून विविध नावीन्यपूर्ण पदार्थ तयार करण्याविषयी मार्गदर्शन करणारी कार्यशाळा १० व ११ मे रोजी आयोजिली आहे. कार्यशाळेत मिलेट्स म्हणजे काय, महत्त्व, उपयुक्तता, सध्या असणारी गरज व मागणी, पोषक गुणधर्म याबाबत माहिती दिली जाणार आहे. पराठा, उपमा, लापशी, खीर, पीठ, लाडू, नमकीन, पुलाव, इडली, डोसा, कुकीज, ढोकळा, स्वीट व बर्फी, प्रोटिन पावडर, चिवडा इत्यादी मिलेट्सचे विविध पदार्थ शिकवण्यात येतील. मिलेट व्यवसायाला असणारे महत्त्व, पॅकिंग, ब्रॅण्डिंग, मशिनरी, प्रकल्प, उत्पादन व बाजार खर्च, विक्रीच्या पद्धती आदींबाबतही मार्गदर्शन होणार आहे.

# सरकारी इस्टिमेशन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**पुणे :** शासकीय कामांचे मूल्यनिर्धारण, इस्टिमेशन हे बांधकाम, स्थापत्य विभागातील, कॉन्ट्रॅक्टर, विद्यार्थ्यांना उपयुक्त असे प्रशिक्षण २४ मे रोजी आयोजिले आहे. यात पीडब्ल्यूडी, एसएसआर, रेट, नियमावली, टेस्टिंग, मेजरमेन्ट शीट, रेट तपासणी, चार्ट, इस्टीमेशन सॉफ्टवेअर व इस्टीमेशन बनविणे, तयार करणे, समाज मंदिर, सभा मंडप, शाळा, अंगणवाडी, सुरक्षा भिंत आशा प्रकारचे कामे व इस्टीमेशन आदींबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

# शासकीय निविदा प्रक्रियेतील अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण

**पुणे :** महानिविदा संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध/फ्लॅश करणे याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणारे खास अधिकाऱ्यांसाठी आयोजित केलेले प्रशिक्षण १८ मे रोजी आयोजिले आहे. प्रशिक्षणात विविध संकेतस्थळांचा समावेश केला आहे. शासकीय निविदा प्रक्रियेत सहभागी असणारे अधिकारी, ग्रामसेवक, संगणक ऑपरेटर, सरकारी कंत्राटदार, स्थापत्य अभियंते व इतर संबंधित अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण उपयुक्त आहे.

## ऑफलाईन गेम खेळताना भांडण; भावाचा नाहक बळी

**पिंपरी :** नवा व्यापार (ऑफलाईन गेम) खेळताना दोन मित्रांमध्ये भांडण झालं. त्यानंतर जाब विचारायला गेलेल्या अल्पवयीन भावाचा यात नाहक बळी गेला. पिंपरी चिंचवडमधील नेहरूनगर येथे असलेल्या विजय प्रभा हाउसिंग सोसायटीत ही धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी १९ वर्षीय सोहेब शेखला अटक करण्यात आली आहे. १६ वर्षीय गणेश कुऱ्हाडेचा भाऊ कार्तिक आणि सोहेब हे एका मित्राच्या टेरेसवर खेळत होते. कॅरम खेळून झाल्यावर त्यांनी नवा व्यापार खेळायला सुरुवात केली. मात्र खेळता-खेळता वादाला तोंड फुटले, मग सोहेबने कार्तिकला मारहाण केली. या घटनेत गणेशच्या डोक्याला जबर मार लागला. त्याला तातडीनं रुग्णालयात हलविण्याचे प्रयत्न ही झाले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. खरं तर गणेशचा आणि आरोपी सोहेबचा काहीच वाद नव्हता, मात्र भावाला केलेल्या मारहाणीचा त्याने जाब विचारला अन त्याचा यात नाहक बळी गेला आहे. याप्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस चौकीचे पोलीस निरीक्षक श्री. कुंभार हे पुढील तपास करीत आहेत.



## ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशाचा जल्लोष

**मोरवाडी :** भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशस्वी कारवाईनंतर पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीतर्फे जल्लोष करण्यात आला. भाजपा मध्यवर्ती कार्यालय, मोरवाडी येथे कार्यकर्त्यांनी एकत्र येत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्याने ७ मे रोजी पहाटे ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवले. या कारवाईत लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीन यांसारख्या दहशतवादी संघटनांच्या प्रशिक्षण केंद्रांसह नऊ ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले. बहावलपूर, मुरीदके, सियालकोट, भिमबर, कोटली आणि मुझफ्फराबाद या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने एकत्रितपणे ही मोहीम यशस्वी केली. या यशस्वी कारवाईनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपा कार्यकर्त्यांनी शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मोरवाडी येथील कार्यालयात एकत्र येत आनंदोत्सव साजरा केला. विधानपरिषद आमदार उमाताई खापरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी ‘भारत माता की जय’ आणि ‘भारतीय लष्कराचा विजय असो’ अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.



## पालिका भवनात यशस्वी ‘मॉक ड्रिल’

**चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशाकीय भवनात धमाक्यांचा आवाज.. सर्वत्र धुरांचे लोळ.. सर्व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणाचे फोन खणाणले... लगेच सर्वत्र सायरनचा आवाज...यावेळी उपस्थित दोन हजार नागरिक व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण....सर्वत्र धावाधाव सुरु... काहीतरी आपत्ती जनक घटना घडली म्हणून सुरक्षा यंत्रणेने तत्काळ चक्रे फिरवली...आणि अग्निशमन विभागाची वाहने त्वरीत पोहोचली आणि प्रशासकीय भवनात असलेल्या २ हजारांहून अधिक कर्मचारी, नागरिकांना इमारतीबाहेर काढण्यात आले. या घटनेत ८ पुरुष व २ महिला जखमी झाल्या त्यांना ॲम्ब्युलन्सच्या मदतीने महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल केले. अवघ्या १५ मिनिटात भयावह परिस्थिती आटोक्यात आणली गेली पहलगाम हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या कठोर भूमिकेमुळे त्या पार्श्वभूमीवर देशभरात सुरक्षेच्या दृष्टीने मॉकड्रिल घेण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्रालयाने दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर युद्धजन्य परिस्थितीमध्ये शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम ठेवण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी आदेश जितेंद्र डूडी यांच्या सूचनेनुसार तसेच आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार आणि प्रभारी आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय भवनात सायंकाळी ४ वाजता मॉकड्रिलचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

## विद्यार्थ्यांनी निसर्ग वाचवण्यासाठी घेतली शपथ

**रावेत :** पर्यावरण संरक्षणासाठी यापुढील काळात हरित इमारती बांधणे आवश्यक आहे. हरित इमारत बांधकाम जमीन, सामग्री, ऊर्जा, पाण्याचा कार्यक्षम वापर करते. तसेच यात ऊर्जा कार्यक्षमता वाढ, पाण्याचा पुनर्वापर केला जातो. त्यामुळे हरित इमारती या पर्यावरणपूरक असतात. वास्तू रचनाकार आणि स्थापत्य अभियंता यांनी हरित इमारती बांधणीवर भर दिला पाहिजे असे मत स्प्राउट कन्सुलन्सीच्या संचालक नम्रता धामणकर यांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय), इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल (आयजीबीसी) यांच्या संयुक्त विद्यामानें “इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलचे उद्दिष्टे आणि हरित इमारत” या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते.



## गांधीजी हे अद्भुत गारुड!’ – डॉ. विश्वंभर चौधरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** ‘लौकिकार्थाने आकर्षक व्यक्तिमत्त्व नसतानाही आपल्या नैतिक आचरणाने भारून टाकणारे गांधीजी हे अद्भुत गारुड होते!’ असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी यांनी बुधवार, दिनांक ०७ मे २०२५ रोजी श्री दत्त मंदिर चौक, मोहननगर, चिंचवड येथे केले. जय भवानी तरुण मंडळ आयोजित सहा दिवसीय शिव – फुले – शाहू – आंबेडकर – लोकमान्य व्याख्यानमालेत ‘राष्ट्रपिता महात्मा गांधी : सत्य – अहिंसेचे पुजारी’ या विषयावरील पहिले पुष्प गुंफताना डॉ. विश्वंभर चौधरी बोलत होते. गांधीवादी ज्येष्ठ कार्यकर्ते प्रा. बी. आर. माडगूळकर अध्यक्षस्थानी होते; तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, कष्टकरी महासंघाचे अध्यक्ष काशिनाथ नखाते, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रकाश जाधव, दत्ता धामणस्कर, प्रा. अनिल पावटे, दत्ता गायकवाड, मुख्य संयोजक मारुती भापकर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

दीपप्रज्वलन आणि शिवाजीमहाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून व्याख्यानमालेचा प्रारंभ करण्यात आला. प्रास्ताविकातून मारुती भापकर यांनी पहलगाम येथील मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप २८ नागरिकांना श्रद्धांजली वाहून, ‘नागरिकांना महापुरुषांच्या विचारांचा वारसा जावा या उद्देशातून पंचवीस वर्षांहून अधिक काळ शिव – फुले – शाहू – आंबेडकर – लोकमान्य व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते.

आमचे पक्ष, संघटना, विचारधारा वेगवेगळ्या असतील, वैचारिक मतभेद असतील मात्र पहलगाम येथील दहशतवादाला प्रत्युत्तर म्हणून जी कारवाई आमच्या शूरवीर भारतीय सैनिकांनी पाकिस्तानातील दहशतवादी स्थळ उद्ध्वस्त करून केली. अशा विशिष्ट परिस्थितीत आम्ही सर्व भारतीय एक आहोत, या भावनेने केंद्र सरकार व भारतीय सैनिकांबरोबर ठामपणे उभे राहणार!’ अशी भूमिका भापकर यांनी मांडली.

# नवीन पाणी कनेक्शनला 'ब्रेक'

## दोन महिने स्थगितीचा निर्णय

### पाणी पुरवठा विभागामार्फत होणार तपासणी...

- महानगरपालिकेच्या पाईप लाईनवर थेट पंप लावून पाणी खेचणाऱ्या विरोधात कारवाई होणार,
- कारवाई नंतर पाणी खेचताना दिसल्यास नळ कनेक्शन बंद करणार,
- बांधकाम साईट्स, कार वॉशिंग सेंटर, यांची तपासणी होणार आहे.
- सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या माध्यमातून निर्मित पाण्याचा वापर न करणाऱ्या मॉल व सोसायट्यावर कारवाई होणार,
- पिण्याच्या पाण्याने गाडी व रस्ते धुणाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात येणार आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी चिंचवड :** शहरात गेल्या काही आठवड्यापासून नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढत आहे तर दुसरीकडे संभाव्य पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे दरम्यान सद्यस्थितीत जुलै पर्यंत पुरेल एवढाच पाणी साठा धरणात उपलब्ध आहे. शहरातील बोअरवेलचे पाणी देखील आटले आहे. त्यात टँकरचे दरही दिवसेंदिवस वाढत आहेत. सोसायट्यामधील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा देखील बंद आहेत, अनधिकृत नळ कनेक्शन वाढले आहेत. शुद्ध पाण्याचा गाड्या धुण्यासाठी वापर केला जात आहे. या सर्व गोष्टीना आला आला घालण्यासाठी आणि नागरिकांना पावसाळ्यापर्यंत शुद्ध पाणी देण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने महत्वाच्या उपाय योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या २०११ साली १७ लाख होती तीच आज ३५ लाख झाली आहे. परंतु पाणी पुरवठा फक्त ३५ % ने वाढला आहे. तरी देखील महापालिकेच्या वतीने नागरिकांना वर्षभर सुरळीत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. परंतु अनधिकृत पाणी वापरामुळे उन्हाळ्याच्या दिवसात पाणीपुरवठा अडथळा निर्माण होतो यासाठी महापालिकेच्या वतीने महत्वाच्या उपाय योजना आखण्यात आल्या आहेत. यामध्ये पंपाद्वारे थेट लाईन वरील पाणी खेचण्यास बंदी व असे आढळल्यास कारवाई, अनधिकृत कनेक्शन वर कडक कारवाई, रेन वॉटर हार्वेस्टिंगची देखभाल करणे, नवीन पाणी पुरवठा कनेक्शन साठी पुढील दोन महिने स्थगिती, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नसणाऱ्या व्यापारी वसाहती मधील पाणी पुरवठा थांबविण्याची शक्यता, गाड्या, रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.



“ शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाणी नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून महापालिकेला सहकार्य करावे

**-प्रभारी आयुक्त प्रदीप जांभळे पाटील,**



“ उन्हाळा असेपर्यंत आणि पावसाळा सुरु होईपर्यंत नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा. अनधिकृत पद्धतीने पाणी वापरत पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांविरोधात महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत कडक कारवाई करण्यात येईल..

**-अजय सूर्यवंशी,** सहशहर अभियंता

### हे करा...

- सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यात यावी
- तेच पाणी उद्यानात ठिबक सिंचनाद्वारे द्यावे
- रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था दरवर्षी तपासावी,
- पाण्याच्या टाक्यांचे गळती तपासावी,
- सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नसणाऱ्या जुन्या सोसायट्यांमध्ये ग्रे वॉटर प्लॅंट बसवावा
- हॉटेल, मॉल, शाळा यांनी नळाला Aerator बसवावा त्यामुळे पाण्याची ५० टक्के बचत होते.
- सोसायटी धारकांनी सोसायटीमधील पाण्याचे ऑडीट करावे.
- अनधिकृत नळ जोडणी व पाण्याच्या गैरवापराची माहिती पालिकेला द्यावी
- पाण्याचा टँकर खरेदी पाण्याची गुणवत्ता तपासावी

### हे करू नका..

- पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करू नका,
- सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बंद ठेऊ नका,
- अनधिकृत नळ कनेक्शन घेऊ नका,
- वीज पंपाद्वारे थेट लाईनवरील पाणी खेचू नका,
- गाड्या धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये.

## सांगवीतील उद्यानातील असुविधेबाबत नाराजी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगवी :** सांगवी परिसरातील शिवसृष्टी उद्यान (तानाजीराव शितोळे उद्यान), छत्रपती शिवाजी महाराज उद्यान आणि सावतामाळी या उद्यानांना आमदार शंकर जगताप यांनीमहापालिकेच्या उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत भेट दिली. उद्यानातील तुटलेले झोके, पाण्याअभावी सुकलेली झाडे, उद्यान परिसरात दारुड्याचा वावर असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे आमदार जगताप यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

यावेळी माजी महापौर माई ढोरे, माजी नगरसेविका शारदा सोनवणे, माजी नगरसेवक संतोष कांबळे, प्रशांत शितोळे, सामाजिक कार्यकर्ते जवाहर ढोरे, सारिका भंडलकर, माजी सिनेट सदस्य संतोष ढोरे, गणेश सहकारी बॅंक संचालक प्रमोद ठाकर, हेमंत निगुडकर, महानगर बँक संचालक नितीन खोडदे, शारूख सय्यद, अमोल गायकवाड, वैभव ढोरे, विशाल सोमवंशी, प्रदीप झांजुर्णे, अमित गवळी, योगेश मोहारे, विनायक शिंदे, सुजित पोंगडे, गणेश ढोरे आदी उपस्थितीत होते.

उद्यान विभागाच्या कामाबाबत नाराजी व्यक्त करीत आमदार जगताप यांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. त्याचा रोष पाहून उपस्थित पदाधिकारी, माजी नगरसेवक, नागरिक आवक झाले. यानंतर तरी उद्यान विभागाच्या कामकाजात योग्य ती सुधारणा होईल अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

“ शाळांना सुटी आहे. मोठया संख्येने बाल गोपाळ उद्यानात खेळण्यासाठी आणि बागडण्यासाठी येतात. मुलांना सुरक्षितपणे खेळण्यासाठी तातडीने खेळण्याची दुरुस्ती करा. नादुरुस्त आणि खराब खेळण्यामुळे अपघात होऊ शकतो, त्यामुळे ती खेळणी काढून टाका. पाण्याअभावी झाडे व हिरवळ सुकणार नाही याची दक्षता घ्या. सुरक्षारक्षक नेमून उद्यान परिसरात दारुड्याचा बंदोबस्त करा.

**— आमदार जगताप**

## माजी नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** महापालिकेचे भाजपचे माजी नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, लोणावळा येथील माजी नगरसेविका कल्पना आखाडे, माजी नगरसेविका सिंधुताई परदेशी, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव राजेश वाघोले, ठाकरे गटाचे मावळ तालुका संघटक मदन शेडगे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते, महाराष्ट्र राज्याचे उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले.

मुंबई येथे झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्याला खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शिवसेना मावळ तालुकाप्रमुख राजूभाऊ खांडभोर, युवासेना उपजिल्हा प्रमुख दत्ताशेठ केदारी, शिवसेना मावळ उपतालुका प्रमुख राम सावंत, शिवसेना लोणावळा शहरप्रमुख संजय भोईर, शिवसेना देहूगाव शहरप्रमुख सुनील हगवणे, शीलाताई भोंडवे, शिवसेना महिला शहर संघटिका शुभांगी काळंगे उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्य आणि त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत. या सर्वांना पक्षात मान, सन्मान दिला जाईल. आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होतील. त्यादृष्टीने शिवसेना कामाला लागली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला शिवसेना पूर्ण ताकदीनिशी सामोरे जाणार आहे.



# भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांबाबत “नो कॉम्प्रमाईज”

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** “भूमिपुत्रांचा स्वाभिमान आणि न्याय हक्कांसाठी संघर्ष” हेच माझ्या राजकीय व सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासन टीपी स्कीम लादण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये टीपी स्कीम होवू देणार नाही, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी ग्रामस्थ, भूमिपुत्रांना दिला आहे.



टाळगाव चिखली येथे श्री गणेश मंदिरामध्ये आज श्री भैरवनाथ टीपी स्कीम विरोधी कृती समितीच्या पुढाकाराने सर्व ग्रामस्थ, आजी-माजी पदाधिकारी, भूमिपुत्रांची बैठक घेण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने स्थानिक आमदार महेश लांडगे यांना मागणीचे निवेदन देण्यात आले.

पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या हक्काच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला.

त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. त्यावेळीही आम्ही आंदोलन उभा केले होते. 1997 मध्ये ग्रामस्थांचा विरोध असताना गावांचा समावेश महानगरपालिका हद्दीत करण्यात आला. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी बोलून दावल्या.

“ चिखली आणि चऱ्होलीसह समाविष्ट गावांमध्ये 2014 पासून विकासकामे आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. “समाविष्ट गावांचा विकास” या मुद्यावर या भागातील भारतीय जनता पार्टी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भूमिपुत्रांनी कायम साथ दिली आहे. राज्यात भाजपा महायुतीचे सरकार आहे. प्रशासकीय राजवटीचा आधार घेऊ प्रशासन TP Scheme लादण्याचा प्रयत्न करीत असेल, तर ते कदापि होवू देणार नाही. संपूर्ण शहरासाठीचा महानगरपालिकेचा विकास आराखडा अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे स्वतंत्र TP Scheme ची आवश्यकता नाही, अशी आमची ठाम भूमिका आहे.


**— महेश लांडगे,** आमदार

संपादकीय विशेष

# या ताकदीची दखल घ्या!

७ मे या दिवसाची भारतच नव्हे तर जग आवर्जून नोंद घेत राहील कारण याच दिवशी पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या भ्याड हल्ल्याला तीव्र स्वरुपाचे प्रत्युत्तर दिले गेले. निरपराध पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या, जीवे मारताना धर्म विचारणाऱ्या पाशवी वृत्तीला मिळालेली ही सणसणीत चपराक म्हणायला हवी. पहलगाममधील घटनेनंतर भारत या हल्ल्याचा बदला कधी घेणार, हा प्रश्न विचारला जात होता. मात्र एकीकडे सर्वसामान्य जनता बहुचर्चित मॉकड्रीलच्या तयारीत असताना भारताने एअर स्ट्राईक केला. याला 'ऑपरेशन सिंदूर' असे भावस्पर्शी नाव दिले गेले. यापूर्वी आपण उरी हल्ला पाहिला आहे. मात्र त्या आणि ताज्या हल्ल्यामधील गुणात्मक फरक जाणून घेणे तसेच त्या अनुषंगाने अन्य बाबींवर चर्चा करणे गरजेचे आहे.

खरे तर भारत हा अत्यंत संयमी, जबाबदार देश आहे. अगदी इतिहास काळापासून पाहिले तरी आपण कधीच कोणावर प्रथम हल्ला केलेला नाही, हे दिसते. आताही आपण तसे करत नाही. त्यामुळेच भारताने केलेल्या ताज्या हल्ल्याचे स्वरुप धोका असणारी ठिकाणे आधीच उद्ध्वस्त करणे या स्वरुपाचा आहे. स्वाभाविकच संयुक्त राष्ट्र समुहानेही याला मान्यता दिली आहे. कारण याच मुद्द्यांच्या आधारे इस्रायलने हमास, लेबनॉन, इराणवर अनेकदा हल्ले केले होते. याच मुद्याच्या आधारे अमेरिकेने इराकमध्ये आपले सैन्य घुसवले होते. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानमधील या भागातील मदरशांमध्ये दहशतवाद्यांची भरती प्रक्रिया आणि प्रशिक्षण होत असल्याचे माहिती असल्यामुळे ही वस्तीस्थाने नामशेष करण्याची आपली कृती समर्थनीय ठरते. तेथे प्रशिक्षण घेणारे दहशतवादी पुढे सीमा ओलांडून भारतात घुसतात आणि नरसंहार घडवून आणतात. त्यांना संपवण्यामागे आपल्यापुढील धोका कमी करणे हाच स्पष्ट हेतू दिसतो.



हे करताना आपल्याकडून कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन वा भंग झालेला नाही, कारण हा हल्ला कोणत्याही देशावर नसून तेथे शरण घेणाऱ्या दहशतवादी संघटनांवर आहे. असे असतानाही पाकिस्तानकडून सडेतोड उत्तर देण्याची धमकी देण्यात आली आणि काही आगळीक झाली तर मात्र तो आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग असेल, असे सांगितले गेले. पाकिस्तानने आपल्यावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला तर अर्थातच त्यांना तो भारताच्या लष्करी तळांवर करावा लागेल. येथील सर्वसामान्य नागरिकांवर करावा लागेल. असे केले तर पाकिस्तानकडून युद्धाच्या हेतूने पाऊल टाकले गेल्याचे म्हणता येईल. हा निश्चितच आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग असेल आणि भारताला प्रचंड ताकदीने त्यांना प्रतिकार करण्याचा अधिकार असेल. त्यामुळेच पाकिस्तानपुढील प्रश्न आता अधिक जटील बनले आहेत, यात शंका नाही.

हे लक्षात घेऊनच पाकिस्तानने आक्रस्ताळेपणा करण्यास सुरूवात केल्याचे दिसले. भारताने केलेल्या ताज्या हल्ल्यात आपले काही नागरिक, महिला, लहान मुले मारले गेल्याचे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तसा तो सातत्याने होत राहील. कारण भारतावर हल्ला करण्याचे कारण पुढे करायचे तर आपल्याकडे तसे काहीही नाही. आपल्याकडे दहशतवाद्यांची प्रशिक्षणस्थळे नाहीत. भारत कधीही इतर देशांमध्ये दहशतवादी पाठवत नाही. त्यामुळे पाकिस्तान इथे नेमके काय उद्ध्वस्त करणार? हा प्रश्न आहे. याचे कारण शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायापुढे आपले सामान्य नागरिक मारले गेल्याचा कांगावा केला जाईल. पण त्यांचा हा प्रयत्न केविलवाणा म्हणाला लागेल. त्याला यश वा जगाकडून समर्थन, सहानुभूती मिळणार नाही. हवे ते करुन आता आपण मोकळे झालो आहोत. दहशतवाद्यांची नऊ प्रशिक्षणस्थळे उद्ध्वस्त केली आहेत. त्यात अनेक दहशतवाद्यांचा खात्मा झाला आहे. हा दुष्ट शक्तींना दिलेला सज्जड दम वा इशाराच आहे. तुम्ही पीओकेमध्येच नव्हे तर पाकिस्तानात कुठेही लपला तरी आम्ही तुम्हाला शोधून मारु, असेच या ताज्या हल्ल्याने आपण सांगितले आहे.

या हल्ल्यामध्ये अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले गेल्यामुळे येथे सुरू असणारी प्रशिक्षणाची साखळी भंग पावली असून भारतात येणाऱ्या दहशतवादी शक्ती कमी वा नाहिशा होतील. स्वाभाविकच हा हल्ला आपल्याला काही वर्षे पुढे नेणारा ठरेल. मदरशांमधून लहान मुले, तरुणांना जिहादकडे आकर्षित केले जाते. त्यांना वेगवेगळ्या प्रकारची स्वप्ने दाखवली जातात. याच मदरशांमधून त्यांना मूलतत्त्वावादाचे धडे दिले जातात. आधी उल्लेख केल्याप्रमाणे यातून जगातील अनेक दहशतवादी संघटनांना कार्यकर्ते पुरवण्याचे काम होते. परिणामी, यापुढेही भारतीय यंत्रणांना बारीक लक्ष ठेवावे लागेल.

अलिकडे हमासमध्येदेखील याच मदरशांमधून प्रशिक्षण घेतलेले दहशतवादी गेल्याचे बोलले जाते. म्हणूनच त्यांच्या ठिकाणांवर हल्ला करुन आपण भविष्यात भारताला असणारे धोकेच नव्हे तर, जगाला असणारे दहशतवादाचे धोकेही कमी केले आहेत. जगात धार्मिक मूलतत्त्ववादाने प्रभावित दहशतवादाचा धोका असणाऱ्या प्रत्येक देशाला आपण संरक्षित केले आहे.

अर्थात शत्रूला कधीही कमी समजायचे नसते. ताकद नसली तरी पाकिस्तान फणा काढणारच नाही, असे समजून चालणार नाही. आपले एक क्षेपणास्त्र त्यांचे नुकसान घडवू शकत असेल तर त्यांचे एक क्षेपणात्र आपलेही मोठे नुकसान करु शकते. त्यामुळे हल्ला रोखण्यासाठी भारत कोणती पावले उचलतो, कोणती सिद्धता करतो हे आता पहावे लागेल. माझ्या मते, कितीही वल्गना केल्या जात असल्या तरी पाकिस्तान प्रत्युत्तर देईल, असे वाटत नाही, कारण त्यांचा कोणताही हल्ला रोखण्यासाठी आपल्याकडे पुरेशी यंत्रणा आहे. त्यांची क्षेपणास्त्रे रोखणारी अर्ली वॉर्निंग सिस्टीम आपल्याकडे आहे. त्याचप्रमाणे एस 400 ही अँटी मिसाईल सिस्टीम आहे, जी अशा प्रकारच्या मिसाईल तसेच लढाऊ विमानांना पूर्णपणे निष्प्रभ करु शकते. मुळात आपण सामान्य नागरिकांना लक्ष्य केले वा भारतीय लष्करावर हल्ला करत क्षेपणास्त्र डागले तर भारताकडून खात्रीने प्रत्युत्तर मिळेल, हे ते जाणतात. तेव्हा कोणीही भारताला थांबवू शकणार नाही, कारण आता संघर्षाचे स्वरुप दहशतवाद विरुद्ध भारत असे आहे. मात्र पाकिस्तानकडून भारतातील नागरी वस्त्यांवर हल्ले झाले तर संघर्षाचे स्वरुपही बदलेल. ते युद्धाचे पहिले पाऊल समजले जाईल. तेव्हा पाकिस्तान याचा नक्कीच विचार करेल.

# देशाला उत्पादक हब बनवण्यास कंपन्या तयार

आर्थिक रा

प्रा. सुखदेव बखळे

जगातील अनेक देशांनी चीनमध्ये गुंतवणूक केली होती. या कंपन्या चीनमधून उत्पादन करून जगभर निर्यात करत होत्या; परंतु कोरोनाकाळात चीनवर निर्बंध आले. पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्यामुळे उत्पादनासाठी या कंपन्यांनी व्हिएतनामसह अन्य देशांची निवड केली. ट्रम्प यांच्या टॅरिफ घोषणेनंतर कंपन्या आता तो देश सोडण्याचा विचार करत आहेत. आणखी कंपन्या भारतात उत्पादन सुरू करण्याचा विचार करत आहेत किंवा त्यांचे उत्पादन वाढवण्याचा विचार करत आहेत. अलीकडेच बातमी आली आहे की 'ॲपल' आता भारतात आयफोननिर्मितीचा विस्तार करण्याच्या विचारात आहे. त्यामागे एक कारण आहे. चीन आणि व्हिएतनामच्या तुलनेत भारतात ट्रम्प शुल्क खूपच कमी आहे. अशा परिस्थितीमध्ये भारत अमेरिकेची मागणी पूर्ण करू शकेल, असे 'ॲपल'ला वाटते. त्याचबरोबर इतर देशांना पुरवठ्यासाठी चीनचा वापर केला जाऊ शकतो. दुसरीकडे, 'गूगल'ची मूळ कंपनी 'अल्फाबेट इंक'देखील याच धोरणावर काम करण्याचा विचार करत आहे. 'गूगल पिक्सेल'ने स्मार्टफोन्सच्या जागतिक उत्पादनाचा काही भाग व्हिएतनाममधून भारतात हस्तांतरित करण्यासाठी तिच्या भारतीय करार निर्मात्या 'डिक्सन टेक्नॉलॉजीज' आणि 'फॉक्सकॉन' यांच्याशी चर्चा केली आहे. हा भाग अमेरिकेची मागणी पूर्ण करेल. सुमारे पंधरवड्यापूर्वी याबाबत चर्चेची पहिली फेरी झाली. हा बदल अल्फाबेटच्या सोर्सिंगला असलेला धोका कमी करण्याच्या धोरणाचा एक भाग आहे कारण अमेरिकेने 'पिक्सेल'चा प्राथमिक उत्पादन आधार असलेल्या व्हिएतनामवर उच्च शुल्क आकारण्याची धमकी दिली आहे.

आता कंपनीने भारतामध्ये एनक्लोजर, चार्जर, फिंगरप्रिंट सेन्सर आणि बॅटरी यासारखे काही घटक स्थानिक पातळीवर तयार करण्यासाठी निर्मात्यांसोबत योजना तयार केल्या आहेत. सध्या भारतात उत्पादित पिक्सेल फोनचे बहुतांश घटक आयात केले जातात. कोविडमुळे चीनी पुरवठा साखळीत आलेल्या व्यत्ययांमुळे व्हिएतनामला 'चायना प्लस वन' धोरणाचा अधिक फायदा झाला आहे, कारण व्हिएतनाममधून भारतात उत्पादनाचे हस्तांतरण हा एक नवीन ट्रेंड असेल. 'चायना प्लस वन' धोरणाचा सर्वात मोठा फायदा व्हिएतनामला मिळाला. 'चायना प्लस वन' धोरणाअंतर्गत चीनबाहेर उत्पादन सुरू करत असलेल्या कंपन्यांमुळे व्हिएतनाम आणि

**कोरोनाकाळात पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने अनेक कंपन्यांनी चीनऐवजी व्हिएतनामची निवड केली. चीनमधून या कंपन्या व्हिएतनामसह अन्य देशांमध्ये गेल्या. त्यांनी व्हिएतनामला प्रॉडक्शन हब बनवले. आता चार वर्षांनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी जशास तसे कर धोरण जाहीर केल्यामुळे अमेरिका, दक्षिण कोरियातील या कंपन्या कमी कर असलेल्या देशांच्या शोधात आहे. त्यांच्या दृष्टीने भारत हा चांगला पर्याय आहे.**

भारताला विशिष फायदा झाला आहे. दोन्ही ठिकाणी कमी कामगार खर्च आणि अनुकूल व्यवसाय वातावरण यासारखे फायदे होतात. व्हिएतनाम गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता आणण्यात भारतापेक्षा अधिक यशस्वी ठरला आहे. नीती आयोगाने काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार 'चायना प्लस वन' धोरण स्वीकारण्यात भारताला आतापर्यंत मर्यादित यश मिळाले आहे तर व्हिएतनाम, थायलंड, कंबोडिया आणि मलेशिया हे मोठे लाभार्थी बनले आहेत. त्यात म्हटले आहे की स्वस्त मजूर, सरलीकृत कर कायदे, कमी दर आणि मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करण्यात सक्रियता या वैशिष्ट्यांमुळे हे घडले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले होते की व्हिएतनामला चीनशी सीमा सामायिक करण्यासारखे काही फायदे मिळाले आहेत.

व्हिएतनाम काही काळापासून चीनचा शेजारी देश असल्याचा लाभ घेत आहे. 20 टक्के कॉर्पोरेट कर दर आणि निर्यात-केंद्रित आर्थिक विकास मॉडेलमुळे व्हिएतनाम 'चायना प्लस वन' धोरणाचा एक प्रमुख लाभार्थी म्हणून उदयास आला आहे. दुसरीकडे, केंद्रीय अर्थसंकल्पात अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याच्या प्रयत्नात भारताने विदेशी कंपन्यांसाठी कॉर्पोरेट कर दर 40 टक्क्यांवरून 35 टक्क्यांवर आणला. त्यातच ट्रम्प यांनी व्हिएतनामवर जादा शुल्क लादल्याने संतुलन भारताच्या बाजूने झुकू शकते. अमेरिकेने व्हिएतनामवर 46 टक्के तर भारतावर 26 टक्के शुल्क लादले आहे. दर 90 दिवसांसाठी रद्द करण्यात आले आहेत; परंतु व्हिएतनाम आणि अमेरिकेने व्यापार करारासाठी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. अर्थात भारतापेक्षा व्हिएतनामला ट्रम्पकडून चांगला करार मिळण्याची शक्यता नाही. कारण चीनमधील निर्यात व्हिएतनाममार्गे सूकर केली जात असल्याचा अमेरिकेला संशय आहे. चीन अनेक वस्तू व्हिएतनाममध्ये डम्प करते आणि तिथून अमेरिकेला पाठवल्या जातात. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात व्हिएतनामला चीनवरील शुल्काचा फायदा झाला. तथापि, व्हिएतनामशी अमेरिकेची व्यापार तूट 2018 च्या पातळीपेक्षा तिप्पट आहे. अमेरिकेचा कर टाळण्यासाठी चीनने व्हिएतनामचा वापर सुरू केल्याचे मानले जाते. व्हिएतनाम हा अमेरिकेला अप्रत्यक्ष साखर निर्यातीचा प्रमुख स्त्रोतदेखील मानला जातो. 'लोवी इन्स्टिट्यूट' या स्वतंत्र थिंक टँकच्या अलीकडील अहवालात त्याचा उल्लेख आहे. यामध्ये व्हिएतनामी बंदरांमधून चीनी उत्पादनांचा मार्ग बदलून निव्वळ दर चुकवणे समाविष्ट आहे.

अलिकडच्या वर्षांमध्ये अमेरिकेला वाढणारी व्हिएतनामची निर्यात आणि चीनकडून होणारी वाढती आयात यांच्यामधील परस्परसंबंध स्पष्टपणे दिसून येतो. अमेरिकेचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी 'मेड इन व्हिएतनाम' लेबलसह चिनी वस्तू अमेरिकेत पाठवल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. अल्फाबेट ही कदाचित एकमेव कंपनी नाही, जी अर्धवट उत्पादन भारतात हलवत आहे. कोरियन इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक सॅमसंगचा व्हिएतनाममध्ये मोठा आधार आहे. इलेक्ट्रॉनिक्सव्यतिरिक्त व्हिएतनाम हा अमेरिकेला पोशाख आणि फुटवेअरचा प्रमुख निर्यातदार आहे. त्यामुळे या प्रदेशांमध्येही भारत उत्पादन बदलांची अपेक्षा करू शकतो. 2023 मध्ये एकूण पादत्राणे आयातीपैकी अमेरिकेला सुमारे एक तृतीयांश आयात व्हिएतनाममधून आली, असे 'फुटवेअर डिस्ट्रिब्युटर्स अँड रिटेलर्स ऑफ अमेरिका' या उद्योग व्यापार गटाच्या माहितीत म्हटले आहे. 'सीएनबीसी'च्या अहवालानुसार, नायके चीन आणि व्हिएतनाममध्ये सुमारे 25 टक्के फुटवेअर बनवते. फर्निचर उद्योगानेही व्हिएतनामवरील अवलंबित्व वाढवले आहे. 2023 मध्ये अमेरिकेची फर्निचरची 26.5 टक्के आयात या देशातून आली.सध्या भारतात उत्पादित केल्या जात असलेल्या 'पिक्सेल' फोनचे बहुतांश घटक आयात केले जातात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हिएतनामवर 46 टक्के तर भारतावर 26 टक्के शुल्क लागू करण्याची घोषणा केली होती. ट्रम्प यांनी 90 दिवसांसाठी नवे शुल्क स्थगित केले, तरी दहा टक्के बेसलाइन टॅरिफ कायम आहे. चीनला या 90 दिवसांच्या सवलतीतून वगळण्यात आले असून सर्वाधिक टॅरीफ दराचा सामना करावा लागतो.

सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत कराराचा पहिला भाग पूर्ण करण्यासाठी भारताने अमेरिकेसोबत वाटाघाटी वाढवल्या आहेत. त्यांना 2030 पर्यंत द्विपक्षीय व्यापार 190 अब्ज डॉलरवरून 500 अब्ज डॉलरपर्यंत वाढवायचा आहे. व्यापार करारामुळे 'अल्फाबेट' आणि 'ॲपल' सारख्या कंपन्यांना अमेरिकेत निर्यात करण्यासाठी भारतात उत्पादन करणे अधिक आकर्षक होईल. 'डिक्सॉन' आणि 'फॉक्सकॉन' फक्त स्थानिक बाजारपेठेसाठी दरमहा 43 हजार ते 45 हजार पिक्सेल स्मार्टफोन भारतात बनवत आहेत. 'अल्फाबेट'ला ड्युटी इफेक्ट कमी करायचा होता आणि त्याचे स्मार्टफोन 'ॲपल'च्या 'आयफोन्स' आणि 'सॅमसंग'च्या प्रीमियम गॅलक्सी मॉडेल्सशी स्पर्धा करु शकण्याजोगे बनवायचे होते. भारत स्मार्टफोन्सवर एकूण 16.5 टक्के आयात शुल्क आकारतो. स्वदेशी 'डिक्सन' नवीनतम मॉडेल्ससह भारतात उत्पादित पिक्सेल फोनपैकी सुमारे 65-70 टक्के उत्पादन करते, तर 'फॉक्सकॉन' जुन्या मॉडेल्सवर अधिक लक्ष केंद्रित करते. 'फॉक्सकॉन'ने गेल्या ऑगस्टमध्ये आपल्या तामिळनाडू युनिटमध्ये 'पिक्सेल'चे उत्पादन सुरू केले. 'डिक्सन'ने डिसेंबरमध्ये नोएडा प्लांटमध्ये तैवानच्या कॉम्पल इलेक्ट्रॉनिक्सच्या सहकार्याने 'पिक्सेल' उत्पादन सुरू केले.

'अल्फाबेट'ने भारताला 'पिक्सेल स्मार्टफोन'साठी जागतिक उत्पादन केंद्र बनवण्याची योजना आखली होती. भारताशिवाय व्हिएतनाम आणि चीनमध्येही 'पिक्सेल' स्मार्टफोन तयार केले जातात. मात्र मीडिया रिपोर्टसनुसार 'गूगल'ने चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी 'फॉक्सकॉन' आणि 'कॉम्पल'च्या माध्यमातून व्हिएतनाममध्ये 'पिक्सेल'चे उत्पादन सुरू केले आहे. 'अल्फाबेट' भारतातून अमेरिकेत होणारी निर्यात हळूहळू वाढवेल आणि इतर देशांना पुरवल्या जाणाऱ्या पुरवठ्याचेही मूल्यांकन करेल. भारतीय स्मार्टफोन मार्केटमध्ये 'पिक्सेल'चा वाटा सुपर प्रीमियम किंमतीमुळे कमी आहे. गेल्या वर्षी डिव्हाइस ऑफलाइन विकण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यात सुधारणा झाली आहे. एकंदरीत, अनेक कंपन्या आता कर वाचवून निर्यात वाढवण्यासाठी भारताचा विचार करू शकतात.

सुप्रभात

## खेचाखेची

### काटकसर

एक मुलगा लग्नासाठी पुण्यात मुलगी पाहायला जातो.

**मुलगा** : मला ना, काटकसर करणारी मुलगी हवी आहे.

.

.

.

**मुलगी** : मी साखरेच्या बिस्किटांवरची साखर काढून चहाला वापरते.

## वेगळं काही

सौदी अरेबियातल्या नेफुड वाळवंटात ८५ हजार वर्ष जुन्या जीवाश्माचा शोध लागला. हे जीवाश्म म्हणजे मानवी बोट आहे. त्याची लांबी ३.२ सेंटीमीटर आहे. इंग्लंडमधल्या यॉर्क विद्यापीठातल्या पुरातत्त्व विभागाचे संशोधक रॉबिन इंग्लिस यांच्या मते हा शोध अत्यंत महत्त्वाचा आहे. ऑस्ट्रेलियात ८० हजार वर्ष जुने मानवी दात सापडले होते. तसंच ६५ हजार वर्षांपूर्वीचं मानवी अवशेषही सापडले होते. आता ८५ हजार वर्षं जुनं बोट सापडल्याने हा शोध पुढे जात आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रारंभीच्या काळात माणूस आफ्रिका खंडातून बाहेर पडून जगात सगळीकडे पोहोचला होता हे सौदी अरेबियामध्ये सापडलेल्या बोटावरून सिद्ध होत आहे.

## ट्रेंडी

### चलती एंबेलिश्ड हिल्सची

दररोजच्या फॅशनमध्ये पादत्राणांचं महत्त्व वेगळं सांगायला नको. पेहरावानुसार पादत्राणं निवडली जातात. पण सध्या काही खास प्रकारच्या पादत्राणांची चलती आहे. ही पादत्राणं तुमच्या संग्रहात असायलाच हवीत. ✻ स्टायलिश आणि क्लासी लूकसाठी तुम्ही पॉईंटेड टोजवाले शूज कॅरी करू शकता. पार्टी किंवा ऑफिस अशा दोन्ही ठिकाणी ते चालून जातील. पार्टीसाठी एंबेलिश्ड शूजचा पर्याय आहे. पादत्राणांचा हा प्रकार वेस्टर्न आऊटफिटवर जास्त उठून दिसतो. ✻ शॉर्ट अँड लाँग ग्लॅडिएटर सँडल्सचा ट्रेंडही परत अला आहे. यंदा या पादत्राणांची चलती असेल. तुमच्याकडील जुने ग्लॅडिएटर्स वापरता येतील किंवा नव्या स्टाईलचे विकतही घेता येतील. फ्लोरल प्रिंट ग्लॅडिएटर्स हा प्रकारही ट्राय करता येईल. केप्री, डेनिम्स, नी लेंथ स्कर्ट यावर ही पादत्राणं शोभून दिसतील. ✻ ऑक्सफर्ड शूजचे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत. ब्राईट रंगांपासून ब्राऊन, ब्लॅक, टॅन अशा रंगांमध्येही ते उपलब्ध आहेत. ✻ पादत्राणांचा आरामदायी पर्याय शोधत असाल तर क्रिस-क्रॉस सँडल्स निवडता येतील. ऑफिस किंवा कॅज्युअल ऑकेजनसाठी या सँडल्स चालून जातील. ✻ यंदा एंबेलिश्ड हिल्सवाल्या पादत्राणांची चलती असेल. पीप टोज, पॉईंटेड हिल्स, स्लीप ऑन्स अशा प्रत्येक प्रकाराच्या हिल्समध्ये हा ट्रेंड पहायला मिळेल.




## राशीभविष्य

- **मेष** : कामं मनासारखी होतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. व्यवसायात उत्तम स्थिती राहील.
- **वृषभ** : उधार, उसनवारीमुळे अडचणी येतील. कर्जाचा भार वाढेल. कुलदेवतेची उपासना करायला हवी.
- **मिथुन** : प्रकृतीच्या तक्रारी संभवतात. नोकरीत इतरांकडून प्रशंसा होईल. आर्थिक प्रश्नातून मार्ग निघेल.
- **कर्क** : व्यवहारात नुकसान संभवतं. कर्ज प्रकरणं रखडतील. वास्तुदोष असेल तर वेळीच उपाय करावेत.
- **सिंह** : नोकरीत उत्तम संधी लाभतील. मोठी गुंतवणूक लाभदायक ठरेल. चैनीवर अधिक खर्च होईल.
- **कन्या** : प्रियजनांचा सहवास लाभेल. कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **तूळ** : मनासारख्या घटना घडतील. व्यवसायात नव्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **वृश्चिक** : कोर्ट प्रकरणात दिलासा मिळेल. गर्दीच्या ठिकाणी जाणं शक्यतो टाळावं. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : आवाका ओळखून व्यवहार करावे. वैवाहिक जीवनात मतभेद संभवतात. शनिची उपासना करावी.
- **मकर** : नोकरीच्या प्रयत्नात यश मिळेल. ओळखीतून मोठी कामं होतील. विद्यार्थ्यांची उत्तम प्रगती होईल.
- **कुंभ** : भाग्योदयाच्या दिशेने वाटचाल होईल. कलाकारांचा उत्साह वाढेल. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **मीन** : आर्थिक स्थिती उत्तम राहील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा. बेरोजगारांना दिलासा मिळेल.

## सल्ला मोलाचा

### पळवा दुर्गंधीची समस्या

उन्हाळ्यात खूप घाम येतो घाम केसांच्या मुळाशी साठत असेल तर केसांना उर्ग दर्प येऊ लागतो. काही नैसर्गिक घटकांचा वापर करुन केसांची दुर्गंधी घालवता येते.

✻ **लसणाचं तेल** – अर्धा कप खोबरेल तेल तीन-चार लसणाच्या पाकळ्या टाकून उकळावं. कोमट झाल्यावर त्यात कापसाचा बोळा बुडवावा आणि त्याने डोक्याला मसाज करावा. वीस मिनिटांनी धुवून टाकावं.

✻ **मध आणि दालचिनी** – पाव कप उकळत्या पाण्यात अर्धा चमचा दालचिनी पावडर मिसळा आणि थोडा वेळ झाकून ठेवा. पाणी थंड झालं की त्यात चमचाभर मध मिसळा. आता हे मिश्रण ४५ मिनिटांपर्यंत डोक्याला लावून ठेवा. सगळे केस कव्हर व्हायला हवेत. त्यानंतर शॅम्पूने धुवून टाका.

✻ **ऑलिव्ह ऑईल** – केस धुण्यापूर्वी ऑलिव्ह ऑईलचा मसाज गुणकारी ठरतो.

✻ **कोरफड** – केस धुवून त्यावर कोरफडीचा गर लावावा. काही वेळाने धुवून टाकावा.

✻ **ॲपल सायडर व्हिनेगर** – कपभर पाण्यामध्ये अर्धा चमचा ॲपल सायडर व्हिनेगर मिसळावं. या मिश्रणाने केस स्वच्छ करावे. त्यानंतर केसांवरुन थंड पाणी घ्यावं.

## दिनविशेष

### ९ मे

- १९३६ : इटलीने इथिओपिया देश बळकावला.
- १९४६ : अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंची चौथ्यांदा निवड.
- २०१३ : जम्मूमधील कारागृहात कैद्यांच्या हल्ल्यात जखमी झालेला पाकिस्तानी कैदी समाउल्लाह याचा मृत्यू झाला.
- २०१७ : नयना पुजारी बलात्कार आणि खूनप्रकरणी तिन्ही आरोपींना फाशी सुनावली गेली.

## महत्त्वपूर्ण काही

### हॅम रेडिओ म्हणजे काय?

'हॅम' ही बिनतारी संदेश पाठवण्याच्या आणि प्राप्त करण्याच्या कामी येणारी अत्यंत साधी सरळ यंत्रणा आहे. साध्या, कमी खर्चाच्या उपकरणांचा वापर करून हॅम रेडिओ तयार करता येतो. घरातील रेडिओप्रमाणेच हॅम रेडिओलाही सिग्नल प्राप्त होतात. फरक इतकाच की घरातल्या रेडिओला दुसऱ्या रेडिओ केंद्राकडून सिग्नल्स मिळतात तर हॅम रेडिओला दुसऱ्या हॅम रेडिओकडून सिग्नल्स मिळतात. म्हणूनच घरातूनच रेडिओ केंद्र चालवणं शक्य होतं.

एकदा हॅम रेडिओ संच सुरू झाला की तुम्ही त्यावर एखादी वाहिनी लावू शकता. त्या वाहिनीवर असणाऱ्या प्रत्येकाला संदेश पाठवू शकता तसंच त्यांच्याकडून संदेश प्राप्त करू शकता. जगभरात विविध ठिकाणी हॅम रेडिओ सुरू असतात. तुम्ही या रेडिओ केंद्रांशी संपर्क साधू शकता. अंतराळात जाणारे यात्री हॅम रेडिओ सोबत नेतात. यामुळे त्यांना एकमेकांशी संपर्क साधता येतो. हॅम रेडिओचा परवाना मिळवण्यासाठी परीक्षा द्यावी लागते. हा परवाना मिळाल्यानंतर तुम्ही हॅम रेडिओ केंद्र सुरू करू शकता. ही परीक्षा कोणीही देऊ शकतं. ती फारशी क्लिष्ट नसते. त्यामुळे या सुट्टीमध्ये तुम्हीही हॅम रेडिओचा प्रयोग करु शकता.

## आरोग्यमंत्र

### गुणकारी 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'

'होलिस्टिक डेंटिस्ट्री' हा दातांवरच्या उपचारपद्धतींचा एक प्रकार आहे. या उपचारपद्धतीत दातांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेतली जाते. या पद्धतीविषयी...



✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री' ही नावाप्रमाणे तोंडाच्या संपूर्ण आरोग्याची काळजी घेणारी उपचारपद्धती आहे. सर्वसामान्य उपचारपद्धतीत हिरड्या आणि दात यांच्या आरोग्यावर भर दिलेला असतो. हिरड्यांशी संबंधित विकारांचा संबंध हृदयविकार, मधुमेह आणि गरोदरपणा अशा विकारांशी असल्याचं बऱ्याच संशोधनांमधून समोर आलं आहे. तोंडाचं आरोग्य टिकवून ठेवलं तर व्यक्ती निरोगी राहू शकते, असं दंततज्ज्ञ मानतात. 'होलिस्टिक डेंटिस्ट्री' याची अंमलबजावणी करते. ✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'मुळे तोंडाचं आरोग्य सुधारतं. या उपचारपद्धतीमुळे दातांशी संबंधित छुप्या आजारांची माहिती मिळू शकते. ✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'त 'सेरेक रेस्टोरेशन्स' ही उपचारपद्धती वापरली जाते. ही उपचारपद्धती दातांमधले खड्डे बुजवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पारंपरिक उपचारपद्धतीपेक्षा अधिक उपयुक्त, टिकाऊ आहे. यामुळे दातांची संरचना बळकट होते. ✻ या उपचारपद्धतीत विषारी रसायनं तसंच घटकांचा वापर केला जात नाही. सर्वसाधारण उपचारपद्धतीत विषारी रसायनांचा वापर केला जातो. याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. उदाहरण द्यायचं झालं तर दातांमध्ये भरण्यात येणाऱ्या चांदीत पाऱ्याचं प्रमाण ५० टक्के असतं.

## पंचांग

**शुक्रवार, ९ मे २०२५**

विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
वैशाख शु. १२, नक्षत्र : हस्त
चंद्रराशी : कन्या, योग : वज्र
सूर्योदय: ६.०९, सूर्यास्त: ७.०२

## फॉरवर्डस

**वह बेवफा हो गए वफा करके**
**अपना कसूर ढूंढने में लगी हूँ**
**कहाँ कमी रह गई,**
**जो ऐसी सजा दे गए।**

## वाचा तर खरं

दोस्तांनो, बंद लॅपटॉपचा वापर करूनही तुम्ही मोबाईल चार्ज करू शकता. यासाठी माय कॉम्प्युटर-फाईल मॅनेजर-प्रॉपर्टीज या ऑप्शनमध्ये जा. मग कंट्रोल पॅनेल-होम डिव्हाइस मॅनेजरची निवड करा. आता तुम्हाला वेगवेगळे ऑप्शन्स दिसतील. त्यातल्या युनिव्हर्सल सिरियल बस कंट्रोलर्स हा पर्याय निवडा. आता यूएसबी रूट हबवर क्लिक करा. आता प्रॉपर्टीज-पॉवर मॅनेजमेंटमध्ये जा. आता अलाउ द कॉम्प्युटर टू टर्न ऑफ धीस डिव्हाइस टू सेव्ह द पॉवर हा ऑप्शन डिसेबल करा. आता लॅपटॉप बंद असेल तरी तुम्ही फोन चार्ज करू शकता.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

### मालेगाव स्फोट प्रकरणाची सुनावणी लांबणीवर

**मुंबई :** मालेगावमध्ये २००८ साली झालेल्या स्फोटाच्या खटल्याचा निकाल तब्बल १७ वर्षांनी गुरूवारी लागण्याची शक्यता होती. १९ एप्रिलला मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एनआयए कोर्टाचे न्यायाधीश एल के लाहोटी यांनी या खटल्याची सुनावणी पूर्ण करत आपला निकाल राखून ठेवला होता. त्यानंतर गुरुवारी या प्रकरणाची सुनावणी पार पडली. १७ वर्षांपूर्वी मालेगावमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल पुढे ढकलण्यात आला आहे. १ लाख पेक्षा जास्त आरोपपत्र पान असल्याने वेळ लागणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### भारत-पाकिस्तानचे एनएसए संपर्कात

**नवी दिल्ली :** एकीकडे भारताने पाकिस्तानातील दहशतवादाविरोधात लष्करी कारवाया सुरू केलेल्या असताना, त्यांनी राजनैतिक मार्गही खुले ठेवले आहेत. म्हणजेच, दोन्ही देशांमधील तणाव आणि संघर्ष कमी होण्याकरता भारताने पाकिस्तानबरोबर संपर्क ठेवला आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, पाकिस्तानचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार लेफ्टनंट जनरल असीम मलिक एकमेकांच्या संपर्कात असल्याचं वृत्त माध्यमांनी दिलं आहे. म्हणजेच, दोन्ही देशांदरम्यान तणाव असला तरीही देशातील संघर्ष कमी करण्याकरता राजनैतिक मार्ग खुले असल्याचंही वृत्तात म्हटलं आहे.

# आता 'वॉटर अटॅक'

## बगलिहारसह सलालचे दरवाजे उघडले आधी सिंदूर आता पूर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतातील निष्पाप लोकांचा बळी घेणा-या दहशतवाद्यांना आश्रय देणा-या पाकिस्तानला धडा शिकण्यासाठी भारताने पुन्हा एकदा चिनाबचा आधार घेण्याचा निर्णय घेतला आहे. बगलिहार आणि सलाल धरणाचे दरवाजे गुरूवार उघडण्यात आले आहेत. यामुळे आता पाकिस्तानमधील वेगवेगळ्या भागात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

सीमावर्ती भागातील त्यांच्या लष्करी कारवायांवरही याचा परिणाम झाला आहे. गेल्या काही दिवसांत भारताने पाकवर पाणी हल्ला करण्याची ही दुसरी वेळ आहे.

रविवारी याआधी भारत सरकारने चिनाब नदीच्या पाण्याचा प्रवाह थांबवला होता, ज्यामुळे पाकिस्तानमध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती आणि त्यांचे विविध जलविद्युत प्रकल्प बंद करण्यात आले होते. मात्र, भारताने दुस-या दिवशी पाणी सोडले.

ऑपरेशन सिंदूरमुळे निराश झालेल्या पाकिस्तानने मंगळवारी रात्रीपासून भारताच्या सीमावर्ती भागात गोळीबार सुरू केला आहे. या गोळीबारात एक जवान शहीद झाला असून १४ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

या हल्ल्यात जवळपास १०० नागरिक जखमी झाले आहेत. संबंधित सूत्रांनी सांगितले की, काल रात्री रियासीच्या दोडा-किश्तवारमध्ये मुसळधार पाऊस पडला. यामुळेच, बगलियार आणि सलाल धरणातील पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यासाठी बांधलेले दोन अतिरिक्त दरवाजे उघडण्यात आले आहेत. यामुळे रियासीच्या खाली अखनूरमध्ये पाण्याची पातळी २० फुटांपेक्षा जास्त वाढली आहे.

### पाकिस्तानात पाणीच पाणी

● यामुळे अखनूरच्या खाली असलेल्या पाकिस्तानी भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. याची अद्याप पुष्टी झालेली नसली तरी, सूत्रांनी सांगितले की चिनाब पाणलोट क्षेत्रात असलेल्या गढखल आणि परगवाल सेक्टरमधील काही पाकिस्तानी चौक्या पाण्याखाली गेल्या आहेत. सिंधू पाणी करारांतर्गत, चिनाब नदीचे पाणी रोखण्यापूर्वी किंवा त्यावर बांधलेल्या धरणांमधून अचानक पाणी सोडण्यापूर्वी पाकिस्तानला माहिती देण्यात येत होती. आता हा करार स्थगित करण्यात आला आहे, त्यामुळे आता त्याची माहिती पाकला दिली जाणार नाही. आता भारत जेव्हा हवे, तेव्हा पाकिस्तानमध्ये दुष्काळ आणि पूर परिस्थिती निर्माण करू शकतो.

# यादवीला सुरूवात; बलुच आर्मीने पाकचे झेंडे उतरवले



## पाक पुन्हा फाळणीच्या उंबरठ्यावर बलुच लोकांनी केला आनंदोत्सव साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इस्लामाबाद :** पाकिस्तान पुन्हा फाळणीच्या उंबरठ्यावर आहे. पाकिस्तानचे दोन तुकडे होण्याची शक्यता दाट आहे. भारताला डिवचल्याचे गंभीर परिणाम पाकड्यांना भोगावे लागत आहे. अणुबॉम्ब ठेवलेल्या शहरांवर ड्रोन हल्ले झाल्याने पाकिस्तानमध्ये हाहाकार उडाला आहे. तर दुसरीकडे बलुचिस्तान पाकिस्तानच्या जोखडातून मुक्त होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानचे झेंडा उतरवण्यात आले आहेत.

बलुचिस्तानमध्ये बंडाचे वारे वेगाने वाहत आहे. बलुचिस्तानमधील अनेक भूभाग बलुच आर्मीच्या ताब्यात आला. त्यामुळे एकीकडे आज झालेले १२ दहशतवादी हल्ले आणि त्यातच बलुचिस्तानमध्ये सुरू असलेली गडबड यावरून स्वतंत्र बलुचिस्तानची लवकरच घोषणा होण्याची दाट शक्यता आहे. बलुचिस्तानमध्ये पूर्वीपासूनच पाकिस्तानला कडाडून विरोध होता. पण जबरदस्तीने हा भाग पाकिस्तानमध्ये सामावून घेण्यात आला. तेव्हापासून पाकिस्तानविरोधात येथील लोकांचा स्वातंत्र्य लढा सुरू आहे. बलुचिस्तानमध्ये पाकिस्तान लष्कराने स्थानिक जनतेवर अमानुष अत्याचार केले आहेत. महिलांवर बलात्कार केले आहेत. अनेक बलुच नेत्यांना ठार केले आहे. त्याचा बदला हे लोक घेत आहेत. भारताने काल पाकिस्तानमध्ये घुसून हल्ला केल्यानंतर बलुच लोकांनी आनंदोत्सव साजरा केला. दोन वर्षांपासून सार्वजनिक ठिकाणांहून पाकिस्तानचे झेंडे उतरवण्याची मोहीम सुरू होती. पण गेल्या दोन दिवसांपासून त्यात मोठी वाढ झाली आहे. अनेक सार्वजनिक ठिकाणांहून पाकिस्तानचे झेंडे उतरवले गेले आहेत. या वर्षाच्या सुरूवातीलाच बलुचबहुल भागातील शाळा, सरकारी दवाखाने, सरकारी कार्यालयात सुद्धा पाकिस्तानचा झेंडा फडकवला जात नसल्याची माहिती जमीयत उलेमा-ए-इस्लाम(एफ) पक्षाचे ज्येष्ठ नेते मौलाना अब्दुल गफूर हैदरी यांनी दिली होती.

### मंगोचर शहर ताब्यात

● बलुचिस्तानमध्ये बलुच लिबरेशन आर्मीच्या कारवायांमध्ये मोठी वाढ झाली आहे. ३ मे रोजी, बीएलएने पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील कालात जिल्ह्यातील मंगोचर हे शहर ताब्यात घेतले आहे. बीएलएने सरकारी इमारती आणि लष्करी ठिकाणांवर हल्ले करून त्यावर नियंत्रण मिळवले. बीएलएचच्या 'डेथ स्क्वॉड' ने शहरात अनेक ठिकाणी चेकपॉइंट्स उभारले आहेत.

# लढाऊ विमानासाठी जपानचे निमंत्रण

## चीनच्या जे-३६ ला टक्कर देण्यासाठी प्रस्ताव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताला बुलेट ट्रेनचे तंत्रज्ञान पुरविणा-या जपानने चक्क सहाव्या पिढीचे जेट फायटर तयार करण्यासाठी भारताला निमंत्रण दिले आहे. हा आंतरराष्ट्रीय प्रस्ताव जपानने भारताला चीनचे जेट फायटर जे-३६ ला टक्कर देण्यासाठी दिला आहे. भारताने रशियाकडे सुखोईची लेटेस्ट पाचव्या पिढीच्या विमानासाठी विचारणा केली होती. परंतू देखभालीसह तंत्रज्ञान स्ट्रान्सफर करण्यास रशिया तयार नसल्याने हा प्रस्ताव बारळगला आहे.

६ व्या पिढीचे लढाऊ जेट विमान विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नात सामील होण्यासाठी जपानने भारताला आमंत्रण दिले आहे. या पावलामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशातील लष्करी गतिशीलता पुन्हा एकदा सक्रीय होणार असून चीनच्या संभाव्य वाढत्या कुरापतींना शह देण्यासाठीचे हे पाऊल असल्याचे म्हटले जात आहे. या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांत भारत सामील होतो की नाही यावर अद्यापही भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

भारताकडे पाचव्या पिढीचेही फायटर जेट सध्या नाही. सध्या भारताकडे फ्रान्सने दिलेली राफेल विमाने आहेत. राफेल हे चौथ्या पिढीचे विमान आहे. परंतू रडारवर जराही न दिसणा-या पाचव्या पिढीच्या फायटर विमानांची भारतीय वायु सेनेला तातडीने गरज आहे. ग्लोबल कॉम्बॅट एअर प्रोग्रॅमअंतर्गत जपानने भारतात पुढे सहाव्या पिढीच्या विमानाला विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नात सामील होण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. जपान, युनायटेड किंगडम, भारत, इटली सारखे देश मिळून साल २०३५ पर्यंत सहाव्या पिढीचे फायटर जेट तयार करणार आहेत.

# पाकिस्तानी शेअर बाजारात 'आपटी'बॉम्ब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताने पाकमधील ९ ठिकाणी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत हवाई हल्ले केले. भारताने केलेल्या कारवाईनंतर पाकिस्तानी शेअर बाजारात आपटी बॉम्ब फुटला आहे. शेअर बाजारात इतकी घसरण झाली की अखेर ट्रेडींग थांबवावे लागले. गुरुवारी शेअर बाजाराचे कामकाज सुरू होताच प्रमुख निर्देशांकात तब्बल ७ हजार अंकांची घसरण पाहायला मिळाली.

बुधवारी भारताने केलेल्या हवाई हल्ल्याचे वृत्तामुळे पाकिस्तानी शेअर बाजार घसरला होता. गुरुवारीही घसरणीचे सत्र सुरूच राहिले. गुरुवारी शेअर बाजारात जवळपास ६ टक्के घसरण झालेली पाहायला मिळाली. ज्यामुळे अखेर ट्रेडींग बंद करावे लागले.

२२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पहलगाम इथे दहशतवादी हल्ला केला होता. या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचे बळी गेले होते. या घटनेपासूनच पाकिस्तानी शेअर बाजारात घसरणीला सुरुवात झाली होती. जवळपास १५ दिवसांत पाकिस्तानी शेअर बाजारातील प्रमुख निर्देशांक १५ हजार अंकांनी गडगडला आहे. २२ एप्रिल रोजी हा निर्देशांक १,१८,४३० अंकांवर होता, तो आता १,०३,०६० पर्यंत खाली घसरला आहे.

पाकिस्तानची आर्थिक अवस्था अत्यंत बिकट असून तिथे महागाई प्रचंड वाढलेली आहे. तिथल्या जनतेमध्ये वाढत्या महागाईमुळे असंतोष आहे. असं असतानाही पाकिस्तानने दहशतवादाला पोसणे सुरूच ठेवले आहे. अखेर भारताला पाकिस्तानमध्ये पोसले जात असलेल्या दहशतवाद्यांवर कठोर प्रहार करावा लागला. यामुळे पाकिस्तानी शेअर बाजारात घबराटीचे वातावरण असून, घसरणीमुळे पाकिस्तानी गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले आहे.

### तेलंगण सीमेवर ५ जवान शहीद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** छत्तीसगड- तेलंगण सीमेवरील करेगुट्टा येथील नक्षलविरोधी मोहिमेदरम्यान पाच जवान शहीद झाले. वाझेड येथे नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोट घडवला आणि यात पाच जवान शहीद झाले. यानंतर सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली असून या चकमकीत ८ नक्षलींचा खात्मा करण्यात आला आहे. गडचिरोलीपासून जवळपास ५० किलोमीटर अंतरावर असलेली आणि छत्तीसगड- तेलंगण सीमेवरील करेगुट्टा पर्वतरांग म्हणजे नक्षलवाद्यांचे आश्रयस्थान असून, २१ एप्रिलपासून सुरक्षा दलांनी नक्षलींचे हे तळ उद्ध्वस्त करण्यासाठी मोहीम सुरू केली आहे.

पान १ वरून

### पुन्हा कुरापती काढाल तर...

सुरक्षा रडार प्रणालीला लक्ष्य केले. लाहोरमध्ये हवाई सुरक्षा रडार प्रणालीला निष्क्रीय करण्यात आले. पाकिस्तानने सीमेवर विनाकारण गोळीबार वाढवला आहे.

२२ एप्रिलचा पहलगाम हल्ला हा एस्कलेशन होता, तिथून हल्ला सुरू केला. त्याचे उत्तर बुधवारी भारताने दिले. रेझिस्टन्स फ्रंटचा या हल्ल्यात समावेश होता. लश्कर ए तोयबाशी हा गट निगडीत आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा समितीमध्ये पहलगाम हल्ल्यासंदर्भात एक निवेदन प्रसिद्ध करण्याचं ठरवलं जात होतं त्यावेळी टीआरएफ या दहशतवादी संघटनेचा निवेदनात उल्लेख करण्यास पाकिस्तानने विरोध केला होता. टीआरएफने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती, त्यानंतरही पाकिस्तानने या संघटनेचे नाव निवेदनात घेण्यास विरोध केला होता.

पाकिस्तानी संरक्षण मंत्री आणि माजी परराष्ट्रमंत्री या दोघांनीही पाकिस्तानचे दहशतवादी संघटनांसोबत काय संबंध आहेत हे सांगितले आहे. अनेक देशांत झालेल्या दहशतवादाचे धागेदोरे पाकिस्तापर्यंत आलेले आहेत. अनेक दहशतवादी संघटना आणि त्यांचे म्होरके हे पाकिस्तानात आहेत.

भारताने विविध दहशतवादी हल्ल्यांचे पुरावे दिले आहेत आणि पाकिस्तानला कारवाई करण्यास सांगितली होती. मुंबई दहशतवादी हल्ल्यात एका दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात आलं होतं. पठाणकोटमध्ये संयुक्त चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्यामध्येही पाकिस्तानला बरीच माहिती, परावे दिले होते. मात्र पाकिस्तानने त्यावर काहीही केले नाही.

भूतकाळातील अनुभव लक्षात घेता आम्हाला कळाले आहे की पाकिस्तान काहीही करणार नाही आणि उगाच वेळकाढूपणा करत राहील. पाकिस्तान आपली कृत्ये लपवण्याचा आणि दहशतवाद्यांना पाठीशी घालण्याचे काम करत राहील.

हल्ल्यात सर्वसामान्य माणसे दगावली असतील दहशतवाद्यांच्या अंत्यविधीमध्ये लष्कराचे अधिकारी कसे ? हल्ल्यात मारले गेलेले हे दहशतवादीच होते.

भारताने फक्त धार्मिक स्थळेच लक्ष्य केल्याचा आरोप केला आहे, तो आरोप खोटा आहे. पाकिस्तान धार्मिक स्थळांचा माथी भडकावण्यासाठी प्रयत्न करत आहे. काल पाकिस्तानने जम्मू कश्मीरमधील शीख समुदायाच्या घरांवर आणि धार्मिक स्थळांवर हल्ला केला होता. १६ सामान्य नागरीक दगावले आहेत.

धैर्य आणि सहनशीलता ६५ वर्ष आम्ही इतके प्रवृत्त केल्यानंतरही हा करार पाळत आलो आहोत.

पाकिस्तानचा जन्म होताच 'खोटं' बोलणं सुरू झालं. ७५ वर्षांपासून ही यात्रा सुरू आहे.

उद्या आयएमएफ बोर्डाची बैठक आहे. त्या बैठकीत आपले कार्यकारी संचालक भारताची भूमिका मांडतील. बोर्ड जो निर्णय घ्यायचा तो घेईल. गेल्या तीन दशकांत आयएमएफने कितीवेळा पाकिस्तानला बेलआऊट पॅकेज दिले आहे ते सगळ्यांना माहिती आहे. मात्र या पैशातून किती कार्यक्रम यशस्वी झाले हे देखील सगळ्यांना माहिती आहे.

अनेक देशांच्या प्रमुखांनी पंतप्रधानांशी संवाद साधला आहे.

### आत्तापर्यंत १०० दहशतवाद्यांचा खात्मा

अजूनही सुरू असल्याने तांत्रिक तपशील किंवा पुढील टप्प्यांची माहिती सध्या उघड केली जाणार नाही. "हे सुरू असलेले ऑपरेशन असल्यामुळे, अधिकाऱ्यांना बैठकीस बोलावले गेले नाही," असेही रिजिजूंनी स्पष्ट केले.

एमआयएमचे अध्यक्ष आणि खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले, "सरकारकडे पाकिस्तानला सामोरे जाण्याची आणि काश्मिरी जनतेला जवळ घेण्याची सुवर्णसंधी आहे." त्यांनी पुढे सुचवले की, "पुंछ हल्ल्यात ज्यांनी आपले प्राण गमावले त्यांना 'दहशतवाद पीडित' म्हणून घोषित केले जावे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी घर व आर्थिक मदत द्यावी. या कारवाईत भावलपूर आणि मुरिदके हे दोन प्रमुख दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले, हे महत्त्वाचे यश आहे," असेही ओवैसी यांनी नमूद केले. काही आंतरराष्ट्रीय माध्यमांनी भटिंडामध्ये राफेल कोसळल्याचा दावा केला असून, भारतीय हवाई दलाने या अफवांचे त्वरित खंडन करावे, असेही ते म्हणाले.

फेक न्यूजपासून सावध रहा

"देशात व देशाबाहेरून अनेक खोट्या बातम्या पसरवल्या जात आहेत. त्यामुळे सर्व पक्षांनी आणि नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा," असे आवाहन रिजिजूंनी केले.

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर

ही कारवाई जम्मू-काश्मीरमधील पाहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली. भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पीओके मधील अंतर्गत भागांमधील दहशतवादी छावण्यांवर सकाळी जोरदार हल्ले चढवले. ऑपरेशन सिंदूरमध्ये बुधवारी पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी ठिकाणांवर अचूक हल्ले करण्यात आले आणि त्यामध्ये १०० दहशतवादी ठार करण्यात आले.

### सिंदूरला आंतरराष्ट्रीय प्रतिसाद

ऑफिसच्या दारातून आत जाताना ही घटना ऐकली. मला वाटतं, भूतकाळाच्या काही घटनांवरून लोकांना काहीतरी होणार असल्याची कल्पना होती. ते बराच काळ लढत आहेत, कित्येक दशके आणि शतके. मला आशा आहे की हे लवकरच संपेल."

चीन- चीनच्या परराष्ट्र मंत्रालयानं भारताच्या सैन्य कारवाईबद्दल खेद व्यक्त केला. "भारताच्या सैन्य कारवाईमुळं आम्हाला खेद वाटतो. आम्ही सद्य परिस्थितीवर चिंता व्यक्त करतो. भारत आणि पाकिस्तान हे एकमेकांचे शेजारी आहेत आणि नेहमीच राहतील. दोन्ही देश चीनचेही शेजारी आहेत. चीन सर्व प्रकारच्या दहशतवादाचा विरोध करतो. आम्ही दोन्ही पक्षांना शांतता आणि स्थैर्यासाठी काम करण्याचं, संयम राखण्याचं आणि परिस्थिती गुंतागुंतीची होईल अशी कारवाई टाळण्याचं आवाहन करतो," असं मंत्रालयानं म्हटलं.

इस्रायल-भारतातील इस्रायलचे राजदूत रियुवेन अझार यांनी 'एक्स'वर लिहिलं, "इस्रायल भारताच्या आत्मसंरक्षणाच्या हक्काचे समर्थन करतो. दहशतवाद्यांना हे कळलं पाहिजे की, निरपराध लोकांविरुद्ध केलेल्या त्यांच्या जघन्य गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी त्यांना लपण्याची जागा मिळणार नाही." भारताच्या या कारवाईनं आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा सुरू झाली असून, यामुळं भारत-पाकिस्तान संबंधांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### पाकचा ड्रोन मिसाईल हल्ला उधळला

ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माध्यमातून हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता.

मात्र भारताच्या रशियन बनावटीच्या एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली आणि इंटिग्रेटेड काउंटर यूएएस ग्रिडने सर्व ड्रोन आणि मिसाइल निष्क्रीय केले. पाकिस्तानने स्वतःच्या निवेदनात कबूल केलं की लाहोरजवळ एक ड्रोन कोसळला आणि इतर १२ ड्रोन गुजरनवाला, चकवाल, बहावलपूर, कराची, चोर, रावळपिंडी आणि अटॉक जवळ नष्ट झाले. यात लाहोरमध्ये ४ जवान जखमी, तर सिंधमधील मियानो भागात एका नागरिकाचा मृत्यू झाला.

लाहोरमध्ये स्फोटांची मालिका

गुरुवारी लाहोरमध्ये जोरदार स्फोट झाले. हे स्फोट वॉल्टन विमानतळाजवळ ऐकू आले. भारतीय लष्कराने लाहोरमधील एचक्यू-९ हवाई संरक्षण प्रणालीच्या युनिट्सना लक्ष्य केलं, जी चीनच्या मदतीने विकसित करण्यात आली होती. या हल्ल्यामुळे लाहोरमधील पाक लष्कराची हवाई सुरक्षा व्यवस्था कोलमडली, असं सूत्रांनी सांगितलं.

### 'सुदर्शन'ने पाकला रोखले

हल्ले करण्याचा प्रयत्न केला आहे. संरक्षण मंत्रालयाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ७ आणि ८ मे च्या रात्री पाकिस्तानने उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी आस्थापनांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अवंतीपोरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना आणि भुज यांचा समावेश आहे. मात्र, भारताची हवाई संरक्षण यंत्रणा एस-४०० आणि इस्रायली हार्पी ड्रोनने पाकिस्तानी क्षेपणास्त्रे आणि ड्रोन नष्ट केले.

एस-४०० ही सध्या जगातील सर्वात शक्तिशाली हवाई संरक्षण प्रणाली असून त्याला "सुदर्शन चक्र" असेही नाव देण्यात आले आहे. भारताने आपला सर्वात महत्त्वाचा संरक्षण भागीदार रशियाकडून ही प्रणाली खरेदी केली आहे. एस-४०० यंत्रणा ४०० किलोमीटर अंतरावरील धोके रोखण्यास सक्षम आहे. त्याचबरोबर ६०० किलोमीटर अंतरापर्यंतच्या लक्ष्यांचाही मागोवा घेऊ शकतो. भारताने आतापर्यंत अशा चार यंत्रणा तैनात केल्या आहेत. जम्मू-काश्मीर आणि पंजाबच्या सुरक्षेसाठी पठाणकोटमध्ये एक स्क्वाड्रन तैनात आहे. दुसर् या मध्ये राजस्थान आणि गुजरातच्या मोक्याच्या भागांचा समावेश आहे.

### कुपवाडमध्ये गोळीबार;...

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानकडून मध्यरात्रीनंतर करनाह भागात नागरिकांच्या भागात निशाणा बनविण्यात आला. पाकिस्तानकडून मोर्टार दागण्यात आले. भारतीय सशस्त्र दलाने गोळीबाराला सडेतोड उत्तर दिलं आहे. आतापर्यंत या गोळीबारात कोणत्याही मृत्यूची माहिती मिळू शकलेली नाही. ऑपरेशन सिंदूरंतर पाकिस्तानी सैनिकांनी गोळीबार सुरू केला होता, ज्यानंतर बुधवारी करनाहकडून अधिकांश नागरिकांना सुरक्षित भागात हलविण्यात आले होते. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर लॉन्च केलं आणि पाकिस्तानात तब्बल १०० किलोमीटर आतपर्यंत दहशतवाद्यांनी अनेक ठिकाणं उद्ध्वस्त केली. भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या सीमेमध्ये न घुसताही जैश-ए-मोहम्मद आणि लश्कर-ए-तैयबा सारख्या दहशतवादी संघटनेची तळं उद्ध्वस्त केली. भारताच्या या स्ट्राइकमुळे दहशतवाद्यांचं कंबरडं मोडलं आहे. दहशतवादी ठिकाणांवर कारवाईमुळे पाकिस्तान अस्वस्थ झाला आहे आणि एलओसीवर गोळीबर करीत आहे.

### कंदहारचा मास्टरमाईंड अझहरचा खात्मा

की भारताच्या हल्ल्यात त्यांचे अनेक लोक मारले गेले.

पहलगाम हल्ल्याचा बदला मंगळवारी आणि बुधवारी रात्री भारतीय सैन्याने घेतला. या हल्ल्यात पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी अड्ड्यांवर लष्कराने हल्ला करून ते उद्धवस्त केले. यात आतापर्यंत यामध्ये १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले असल्याचे सांगण्यात येत आहे. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी गुरुवारी, ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे, असे म्हणत पाकिस्तानविरुद्ध आणखी मोठी कारवाई होणार असल्याचा सूचक इशारा दिला आहे.

आयसी-८१४ अपहरण करण्यात रऊफ अझहरने महत्त्वाची भूमिका बजावली होती. यानंतर, अल-कायदाचा प्रमुख कार्यकर्ता उमर सईद शेख याला सोडण्यास भाग पाडण्यात आले. त्यानंतर अल-कायदाचा दहशतवादी उमर सईद शेख याने वॉल स्ट्रीट जर्नलसाठी काम करणाऱ्या अमेरिकन-ज्यू पत्रकार डॅनियल पर्लचे अपहरण करून हत्या केली. २००२ मध्ये पर्लच्या हत्येने जगाला धक्का बसला.

### पुण्यातून सीमावर्ती राज्यातील उड्डाणे रद्द

देशातील २६ विमानतळ १० मेपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय ४३० हून अधिक उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून भारताने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ज्या प्रवाशांचे यादरम्यान तिकीट बुकिंग होते, त्यांना रिफंड देण्यात येणार आहे. तर प्रवासी पुढील दिवसात बुकिंग करू शकतात, अशी माहिती विमान कंपन्यांकडून देण्यात आली आहे.

### सीमा सील, क्षेपणास्त्रे सज्ज


लढाऊ विमाने गस्त घालत असल्याने जोधपूर, किशनगढ आणि बिकानेर विमानतळांवरून उड्डाणे ९ मे पर्यंत स्थगित करण्यात आली आहेत. क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आल्याचे वृत्त आहे. सुखोई-३० एमकेआय जेट्स गंगानगर ते कच्छच्या रणापर्यंत हवाई गस्त घालत आहेत. बिकानेर, श्री गंगानगर, जैसलमेर आणि बारमेर जिल्ह्यातील शाळा बंद करण्यात आल्या आहेत आणि चालू परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. पोलिस आणि रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

# महिलेने नाही म्हटले तर त्याचा अर्थ नाहीच

## मुंबई उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** "महिलेने एकावेळी लैंगिक संबंधांना संमती दिली याचा अर्थ तिने कायमस्वरुपी अशा प्रकारच्या संबंधा संमती दिली असा होत नाही. भारतीय पुरावा कायद्यातील कलम ५३ अ नुसार, एका महिलेचे चारित्र्य किंवा तिच्या जगण्यातील नैतिकता ही तिचे किती जणांबरोबर लैंगिक संबंध होते, यावरुन ठरवता येत नाही. तिचे अनेकांबरोबर कथित अनैतिक संबंध आहेत म्हणून तिची लैंगिक संबंधांना संमती गृहीत धरता येणार नाही. महिलेने शरीर संबंधास नकार दिला याचा अर्थ नाहीच असा होतो," असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींना सत्र न्यायालयाने ठोठावलेली शिक्षा कायम ठेवली. यासंदर्भातील वृत्त माध्यमांनी दिले आहे.




पतीपासून विभक्त राहणारी महिला शब्बीर शेख याच्या भाड्याच्या खोलीत राहत होती. तिचे शब्बीरचा भाऊ वासिमबरोबर प्रेमसंबंध होते; पण काही दिवसानंतर महिला आपल्या दुसऱ्या मित्रासोबत 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहू लागली होती.

५ नोव्हेंबर २०१४ रोजी महिला ही खोलीत तिचे मित्र दिनेश आणि राकेश यांच्यासोबत होती. यावेळी वासिम याच्यासह शब्बीर शेख याचा भाऊ मकसूद कादिर, एक अल्पवयीन मुलगा खोलीत आले. त्यांनी तिघांना मारहाण केली. त्यांना जबदरस्तीने सिगारेट ओढायला लावली. मद्यही पाजले. पीडित महिलेसह तिच्या दोन मित्रांना नग्न केले. त्यांचे आक्षेपार्ह फोटो-व्हिडीओ काढले. राकेश घटनास्थळावरुन पळून गेला. आरोपींनी दिनेशला लोखंडी रॉडने मारहाण करून रेल्वे ट्रॅकवर ढकलण्याचा प्रयत्न केला; पण तोही पळून जाण्यात यशस्वी झाला. त्यानंतर आरोपींनी पीडित महिलेला जवळच्या जंगलात नेले. तेथे वासिम, कादिर व अल्पवयीन आरोपीने तिच्यावर सामूहिक बलात्कार केला .

मारहाण आणि बलात्कार प्रकरणी महिलेने फिर्याद दिली. सत्र न्यायालयात या प्रकणाची सुनावणी झाली. न्यायालयाने दोषींना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा दिली होती. दोषींनी निकालास उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती एम.डब्ल्यू. चांदवानी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

पीडित महिलेचे वासिमशी पूर्वी संबंध होते; पण नंतर ती दुसऱ्या व्यक्तीसोबत 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहू लागली होती, असा युक्तीवाद आरोपींच्या वकिलांनी केला. यावर खंडपीठाने स्पष्ट केले की, "पीडित महिला आपल्या पतीपासून वेगळी राहत होती. घटस्फोट न देताच ती दिनेशसोबत राहू लागली होती. वासिम दिनेशबद्दल असूया बाळगत होता. पीडित महिलेने केवळ स्वतःसोबतच शरीरसंबंध ठेवावा, अशी त्याची भूमिका होती, तिच्या संमतीशिवाय कोणताही शारीरिक संबंध लादणे हे गुन्हाच ठरतो."

### बलात्कार महिलेच्या शारीरिक, मानसिक स्वातंत्र्यावर घाला

● जबरदस्तीने, भीती दाखवून किंवा फसवून स्त्रीवर लैंगिक अत्याचार करणे म्हणजे तिच्या संमतीविरुद्ध बलात्कार. बलात्कार हा केवळ लैंगिक गुन्हा नाही. महिलेच्या शरीरावर, मनावर आणि गोपनीयतेवर केलेला हल्ला ठरतो. हा गुन्हा अत्यंत लज्जास्पद आणि समाजातील गंभीर अपराध आहे. तो महिलेला शारीरिक, मानसिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्यावर घाला करणारा आक्रमक गुन्हा आहे, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

# उत्तरकाशीजवळ हेलिकॉप्टर कोसळले, ६ जण ठार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यातील गंगनानीजवळ गुरुवारी सकाळी हेलिकॉप्टर कोसळले. या दुर्घटनेत ६ यात्रेकरूंचा मृत्यू झाला. या हेलिकॉप्टरमधून सुमारे सात जण प्रवास करत होते. त्यापैकी ६ जणांचा मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी झाला आहे. मृतांमध्ये मुंबईतील ४ आणि आंध्र प्रदेशमधील एकाचा समावेश आहे. घटनास्थळी बचावकार्य सुरु आहे.

उत्तरकाशीतील गंगनानीजवळ झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात काही लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. ही दुःखद घटना आहे. मदत आणि बचावकार्यासाठी एसडीआरएफ आणि जिल्हा प्रशासनाची पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली, असे उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. या अपघाताची चौकशी करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. या संदर्भात, आपण अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात असून येथील परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

या हेलिकॉप्टरने डेहराडूनमधील सहस्त्रधारा हेलिपॅडवरून उड्डाण केले होते. ते यमुनोत्री मंदिराजवळील खरसाली हेलिपॅडकडे जात असताना ही दुर्घटना घडली. या अपघातात पायलट कॅप्टन रॉबिन सिंह (गुजरात) यांचा मृत्यू झाला आहे. यातील जखमी प्रवाशांना उपचारासाठी एअरलिफ्ट करून ऋषिकेश येथील एम्समध्ये नेण्यात आले.

अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही, असे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. ज्या ठिकाणी हा अपघात झाला ते ठिकाण एका गावाजवळील डोंगराच्या कडेला २००-२५० मीटर खाली दरीत आहे. एसडीआरएफ, लष्कर आणि पोलिसांकडून बचावकार्य सुरू आहे.

### मृतांमध्ये मुंबईतील चार यात्रेकरूंचा समावेश

● मृतांमध्ये मुंबईतील चार यात्रेकरूंचा समावेश आहे. कला सोनी (६१), विजया रेड्डी (५७), रुची अग्रवाल (५६) आणि राधा अग्रवाल (७९) अशी त्यांची नावे आहेत. तर आंध्र प्रदेशातील वेदवती कुमारी (४८) यांचाही या अपघातात मृत्यू झाला आहे. तर आंध्र प्रदेशमधील भास्कर (५१) हे गंभीर जखमी झाले आहेत.

# बलोच बंडखोरांचाही पाकला धक्का

## पाकी सैनिकांचे वाहन उडवले, १४ ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताची भूमिका पाकिस्तानविरोधात आक्रमक आहे. मंगळवार आणि बुधवारी रात्री भारताने पाकव्याप्त काश्मीरबरोबरच पाकिस्तानातही जोरदार हवाई हल्ले केले आहेत. या हवाई हल्ल्यात जवळपास ९० दहशतवादी ठार झाल्याची माहिती आहे. एवढेच नव्हे तर मुरीडके ते बहावलपूर पर्यंत लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मदचे तळ उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. दरम्यान, पाकिस्तानला अंतर्गत पातळीवरही धक्का बसला आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीच्या (बीएलएफ) बंडखोरांनी बोलन खोऱ्यात पाकिस्तानी सैनिकांना घेऊन जाणारे वाहन रिमोट बॉम्बने उडवले. या स्फोटात गाडी उडवण्यात आली आणि विमानातील सर्व १२ पाकिस्तानी सैनिक मारले गेले.

याशिवाय बलुच बंडखोरांनी पाकिस्तानच्या बॉम्बशोधक पथकाला लक्ष्य करून आयईडी स्फोटही केला, ज्यात दोन जवान शहीद झाले. अशा प्रकारे बलोच हल्ल्यात एका दिवसात १४ पाकिस्तानी सुरक्षा जवान ठार झाले आहेत. भारताकडून सीमेवर तणाव आणि हवाई हल्ले होत असताना पाकिस्तानला हा धक्का बसला आहे. पहिला हल्ला बलोच लिबरेशन आर्मीने बोलन खोऱ्यातील शोरकंद भागात केला होता. या हल्ल्यात मिशनवर कारमधून निघालेले १२ जवान ठार झाले. त्यांचे नेतृत्व स्पेशल ऑपरेशन कमांडर तारिक इम्रान यांनी केले. याशिवाय सुभेदार उमर फारूक यांचाही या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

बीएलएने केलेला रिमोट बॉम्बस्फोट इतका शक्तिशाली होता की, गाडी उडून गेली. दुसरा हल्ला बीएलएने कच्छमधील कुलग तिग्रान येथे केला. येथेही बीएलएबंडखोरांनी आयईडी उडवले. बुधवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या हल्ल्यात बॉम्बशोधक पथकाचे दोन जवान शहीद झाले असून ते पाकिस्तानी लष्कराशी संबंधित होते. अशाप्रकारे पाकिस्तानी लष्कराने एका दिवसात बीएलएशी झालेल्या लढाईत आपले १४ जवान गमावले आहेत. या हल्ल्यांनंतर बलोच लिबरेशन आर्मीचे प्रवक्ते जियानंद बलोच यांचे वक्तव्यही समोर आले आहे.

# काँग्रेसच्या माजी आमदाराला फिल्मी स्टाईल अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पांढरे शुभ्र कडक इस्त्री केलेले कपडे, लक्झरी कार, मागं-पुढं कार्यकर्त्यांची गर्दी असा एकंदर आमदाराचा रुबाब असतो. मात्र कायद्यापुढे आमदार कसा असतो, यातं चित्र पाहायचं असेल तर हरियाणातील एक व्हिडीओ तुम्हाला पाहावा लागेल. ज्यात ईडीच्या अधिकाऱ्यांनी आमदाराचा अवस्था गल्लीतल्या गुंडासारखी केली आहे. काँग्रेसचे माजी आमदार धर्म सिंह छौक्कर यांच्यासोबत हा सगळा प्रकार घडला आहे.

धर्म सिंह छौक्कर यांना ईडीने १५०० कोटी रुपयाच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अटक केली आहे. मागील अनेक दिवसांपासून ईडी त्यांचा शोध घेत होती. अखेर एका हॉटेलमध्ये लपलेले असताना ईडीने त्यांना फिल्मी स्टाईलने पकडलं आहे. या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजी आमदार धर्म सिंह छौक्कर दिल्लीतील एका हॉटेलमध्ये बसले होते. ईडीला ही माहिती मिळाल्यानंतर अधिकारी तिथे पोहोचले. ईडीच्या अधिकाऱ्यांना पाहून छौक्कर पळून जाऊ लागले. यादरम्यान, ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना पाठलाग करून पकडले. पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या माजी आमदाराला अधिकाऱ्यांना जमिनीवर पाडलं. जमिनीवर पडलेल्या छौक्कर यांनी उठण्यास मज्जाव केला त्यावेळी ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना कॉलर धरून उठवलं. यात त्यांचा शर्ट देखील फाटला. ईडीच्या अधिकाऱ्यांनी एका माजी आमदाराची अवस्था केविलवाणी केली.




**कीव** युक्रेनमधील कीव येथे रशियाने ड्रोन हल्ला केल्यानंतर मोठा स्फोट झाला.

# पाकचा खोटारडेपणा महिला पत्रकाराने पकडला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** पहलगाम इथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर राबवलं. भारताने केलेल्या हल्ल्यात ९ ठिकाणांना लक्ष्य करण्यात आलं होतं. हा हल्ला दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी केला असून यामध्ये सामान्यांना किंवा पाकिस्तानच्या सैन्य तळांना लक्ष्य करण्यात आले नाही असे स्पष्टपणे सांगितलं होतं. भारताच्या या कारवाईमुळे अपेक्षेनुसार पाकिस्तानने थयथयाट करणे सुरू केले असून, भारतावर बेछूट आरोप करण्यासही सुरूवात केली आहे. पाकिस्तानचा हा खोटारडेपणा एका महिला पत्रकाराने पकडला असून तो जगासमोर आणण्याचे काम केले आहे.

याल्दा हकीम या स्काय न्यूजच्या अँकर असून त्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर दोन पाकिस्तानी मंत्र्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ आणि पाकिस्तानी माहिती प्रसारण मंत्री अताउल्लाह तरार या दोघांच्या याल्दा हिने मुलाखती घेतल्या आहेत. या दोन्ही मुलाखती स्फोटक ठरल्या असून त्यातूनच पाकिस्तानचा खरा चेहरा उघडकीस आला आहे.



भारताने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर याल्दा हकीम हिने पाकिस्तानी माहिती प्रसारण मंत्री अताउल्लाह तरार याची मुलाखत घेतली होती. याल्दा हकीम हिने तरार याला अत्यंत शांतपणे काही प्रश्न विचारले ज्यांची उत्तरं देताना खान याची तंतरली होती. भारताने जैश-ए-मोहम्मद, लश्कर-ए-तैयबा, आणि हिजबुल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवलं होतं. पाकिस्तानी मंत्री तरार याने या कारवाईबद्दल बोलताना म्हटले की भारत पाकिस्तानातील सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करत आहे. याल्दा हकीमने हा दावा सप्रमाण खोडून काढला, तोदेखील चर्चा सुरू असताना. याल्दाने तरार याला थांबवत म्हटले की, भारतीय सैन्याने हे स्पष्टपणे सांगितलं आहे की त्यांनी फक्त दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले असून पाकिस्तानी सैन्याच्या तळांना त्यांनी कोणत्याही प्रकारे लक्ष्य केलेले नाही. यावर तरारने म्हटले की पाकिस्तानात दहशतवाद्यांचे अड्डे नाहीत आणि स्वत: पाकिस्तान हाच दहशतवादाचा पीडीत आहे. दहशतवादाविरोधात उभ्या ठाकलेल्या देशांमध्ये पाकिस्तान हा आघाडीवर असल्याचेही तरार याने म्हटले.

याल्दाने तरार याला तिथेच थांबवत उलटा प्रश्न विचारला. तिने म्हटले की काही दिवसांपूर्वी पाकिस्तानी संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांची मुलाखत घेतली होती. यामध्ये त्यांनी जाहीरपणे सांगितले होते की, पाकिस्तान अनेक दशके दहशतवाद्यांना पोसतो आहे. दहशतवाद्यांना गुप्त कारवायांसाठी पाकिस्तान पोसत असल्याचे त्यांनी म्हटले होते.

## दिल्लीत गोळीबार केल्याप्रकरणी ३ जणांना अटक

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या बाहेरील मंगोलपुरी भागात वैयक्तिक शत्रुत्वातून गोळीबार केल्याच्या आरोपाखाली गुरुवारी तीन जणांना अटक करण्यात आली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. मंगोलपुरी येथील एच ब्लॉकजवळ गोळीबार झाल्याचा फोन आला, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे आणि घटनेत वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. "तक्रारदार अल्पवयीन असून, त्याने तक्रार केली की घटनास्थळी काही लोक दुचाकीवरून आले होते. त्यापैकी एकाने हवेत गोळीबार केला. घटनास्थळावरून एक रिकामा गोळीबार जप्त करण्यात आला," असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

## बिजनोरमध्ये मोटारसायकल आणि कारची धडक

**बिजनोर (उत्तरप्रदेश) :** उत्तर प्रदेशातील बिजनोर जिल्ह्यात गुरुवारी मोटारसायकल आणि कारची समोरासमोर धडक झाल्याने तीन जणांचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. फुलसंडा गावाजवळील कोतवाली रस्त्यावर सकाळी हा अपघात झाला, असे त्यांनी सांगितले. नेहतौर स्टेशन हाऊस ऑफिसर (एसएचओ) यांनी सांगितले की, अपघातात नूर शाह (६०), सईद (५०) आणि नूर आलम (२३) यांचा मृत्यू झाला.

## नवविवाहित जोडपे मृतावस्थेत आढळले

**इरोड (तामिळनाडू) :** गोबिचेट्टीपलयम जवळील एका विहिरीत एका नवविवाहित जोडप्याचे मृतदेह आढळले आणि त्यांचे मृतदेह तरंगत होते, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. पुडुकोथुकाडू गावातील बांधकाम कामगार २३ वर्षीय सक्तीवेल आणि इंडियामपलयम येथील १९ वर्षीय प्रियदर्शिनी एकमेकांवर प्रेम करत होते आणि पालकांच्या संमतीने त्यांनी सुमारे ७ महिन्यांपूर्वी लग्न केले. बुधवारी रात्री प्रियदर्शिनी तिच्या पतीसोबत गावातील एका उत्सवात सहभागी होण्यासाठी इंडियाम्पलायम येथील तिच्या माहेरी गेली होती.




व्हॅटिकन येथील सेंट पीटर्स बॅसिलिका येथे नवीन पोपच्या निवडीसाठी साजरा करण्यात येणाऱ्या पवित्र मासचे अध्यक्षपद कार्डिनल्स कॉलेजचे डीन कार्डिनल जिओव्हानी बॅटिस्टा रे यांच्याकडे असताना स्विस गार्ड उभा असताना.

## झारखंडमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा



**रांची :** झारखंडच्या काही भागात १० मे पासून उष्णतेच्या लाटेसाठी आयएमडीने 'पिवळा' इशारा (सावध रहा) जारी केला आहे, असे एका अधिकाऱ्याने गुरुवारी सांगितले. पुढील पाच दिवसांत पारा पाच अंश सेल्सिअसने वाढू शकतो, असे त्यांनी सांगितले. "आठ जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे, ज्यामध्ये बहुतेक संथाल परगणा प्रदेशातील आहेत. १० मे रोजी देवघर, जामतारा, दुमका, पाकूर, गोड्डा, साहिबगंज या सहा जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा मिळू शकतो, तर ११ मे ते १४ मे दरम्यान गिरिडीह आणि धनबाद हे आणखी दोन जिल्हे या यादीत जोडले जाण्याची शक्यता आहे," असे रांची हवामान केंद्राचे उपसंचालक अभिषेक आनंद यांनी सांगितले.

## बांगलादेश सीमेवर सोन्याच्या बिस्किटांसह एकाला अटक



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा येथील भारत-बांगलादेश सीमेवर एका व्यक्तीला ३३.५३ लाख रुपयांच्या सोन्याच्या बिस्किटांसह अटक करण्यात आली, अशी माहिती बीएसएफने गुरुवारी दिली. अचूक गुप्त माहितीच्या आधारे, बीएसएफ साउथ बंगाल फ्रंटियरच्या १४३ बटालियनच्या कर्मचाऱ्यांनी बुधवारी बिठारी सीमा चौकीवर एका मोटारसायकलस्वाराला अडवले, असे त्यात म्हटले आहे. दुचाकीच्या इंजिनमागे लपवलेले ३३५ ग्रॅम वजनाचे तीन सोन्याचे बिस्किट सापडले, असेही त्यात म्हटले आहे.

# बुलेटस्वारांवर कारवाईचा बडगा

## बारामतीत ५८ गाड्यांच्या सायलेंसरवर बुलडोझर चढवला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** शहर शांत, सुंदर आणि कायम सुरक्षित राहावं या उद्देशाने बारामती वाहतूक शाखेने अखेर शहरात ध्वनीप्रदूषणाचा कहर करणाऱ्या 'फटाका सायलेंसर'वाल्या बुलेटस्वारांवर कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. वारंवार सूचना, दंडात्मक कारवाया याला केराची टोपली दाखवणाऱ्या टवाळखोरांना चाप लावत आतापर्यंत तब्बल ५८ बुलेट गाड्यांचे फटाका सायलेंसर जागेवरच काढून बुलडोझर चढवला आहे. या मोहिमेमुळे शहरातील गल्लीपासून मुख्य रस्त्यांपर्यंत 'धडधड' करणाऱ्या बुलेटस्वारांना चांगलाच दणका बसला आहे.

ही विशेष मोहीम उपक्रमशील पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत आहे. गेल्या वर्षभरात ५६ कारवाया करण्यात आल्या होत्या, तर यावर्षी सुरुवातीपासूनच पोलिसांनी गती वाढवत ५८ कारवाया करत ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांना एकूण १११ चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. एकूण ५८ बुलेटस्वारांचे सायलेन्सर वर बुलडोजर कारवाई करण्यात आली आहे. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राठोड, वाहतूक पोलीस निरीक्षक यादव आणि पोलीस जवान उपस्थित होते.



फॅशन, स्टाईल आणि अटेंशन मिळवण्यासाठी अनेक तरुण मूळ बुलेट गाड्यांमध्ये बेकायदेशीर बदल करून 'फटाका सायलेंसर' लावतात. हे सायलेंसर इतका मोठा आवाज करतात की लहान मूल रडू लागतं, वृद्धांचा थरकाप उडतो, आणि आजारी रुग्णांची झोप उडते. महाविद्यालय परिसर, हॉस्पिटलजवळ, सिग्नलच्या रांगेत या गाड्यांचा आवाज म्हणजे एक 'ध्वनी दहशत' बनली होती. पोलिसांनी अनेक वेळा सूचनाही केल्या, पण कायद्याचा धाक राहिलेला नाही हे पाहून मोटार वाहन कायद्यातील कलम १९८ अंतर्गत थेट कारवाईचा निर्णय घेतला. वाहतूक पोलिसांच्या या मोहिमेचे सर्व स्तरांतून मोठे कौतुक होत आहे. सोशल मीडियावरही नागरिकांकडून समाधान व्यक्त होताना दिसत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक सुभाष काळे, पोलीस जवान प्रदीप काळे, रूपाली जमदाडे, सुधाकर जाधव ,प्रशांत चव्हाण, अशोक झगडे, रेश्मा काळे, सीमा घुले, स्वाती काजळे, माया निगडे, सीमा साबळे ,अजिंक्य कदम आणि गृह रक्षक दलाचे जवान अमन मंडले, रोहित शिंदे, अभिषेक टेके यांनी केली.

"कायदा हा आपल्या संरक्षणासाठी आहे. शहर शांत ठेवायचं असेल तर कायदा पाळणं गरजेचं आहे.जो कायदा मोडेल त्यावर कारवाई निश्चित आहे".
**-सुदर्शन राठोड,** उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती)

"मोठ्या आवाजाचे सायलेन्सर आपल्या परिसरात असतील तर तत्काळ ९९२३६३०६५२ या क्रमांकावर व्हाट्सअप द्वारे अथवा मेसेज करून कळवावे. अशा हुल्लडबाजांवर वर कारवाई करण्यात येईल".
**-चंद्रशेखर यादव,** पोलीस निरीक्षक




## सरकारी नोकरीच्या आमिषाने ३३ लाखांची फसवणूक

**शिरूर :** सरकारी नोकरी लावून देतो असे आमिष दाखवत तब्बल ३३ लाख ४६ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या महिलेचा पर्दाफाश करत शिरूर पोलिसांनी तिला अटक केली आहे. आरोपी महिलेला न्यायालयाने ८ मे २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी फिर्यादी विकास भिमराव नागरगोजे (रा. जोशीवाडी, शिरूर) यांनी शिरूर पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, निशा लक्ष्मण शिंदे (रा. इंदापूर, जि. पुणे) हिने ऑगस्ट २०२३ पासून फिर्यादी व त्यांच्या ओळखीतील लोकांना सरकारी नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. "वरपर्यंत ओळखी आहेत" असे सांगून, फिर्यादी यांच्याकडून २३.४६ लाख रुपये बँकेतून आणि १० लाख रुपये रोख स्वरूपात असे एकूण मिळून ३३.४६ लाख रुपये उकळले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादी यांनी शिरूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन तत्काळ तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शिवाजी बनकर व महिला पोलीस अंमलदार स्नेहल होळकर यांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे निशा शिंदे ही इंदापुर येथे असल्याचे शोधून काढले. त्यावर पोलिसांनी इंदापुर येथे धाड टाकून निशा शिंदे हिला अटक केली. तिला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिची ८ मे २०२५ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

## दारु विक्रेत्याकडून पोलीस पाटलाला धमकी

**शिक्रापूर :** आरणगाव, ता. शिरुर येथील रवींद्र मखर हा इसम गावातील आलेगाव पागा रस्त्याचे लगत हॉटेल मातोश्री मध्ये बेकायदेशीपणे दारु विक्री करत असताना पोलिसांनी केलेल्या कारवाई बाबत वर्तमान पत्रात आलेली बातमी मा. पोलीस पाटील संतोष लेंडे यांनी गावातील ग्रुपवर टाकल्याने रवींद्र मखर याने संतोष लेंडे यांना शिवीगाळ, दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिली, याबाबत संतोष निवृत्ती लेंडे (४५ वर्षे रा. आरणगाव ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीसात तक्रार दिल्याने पोलिसांनी रवींद्र ज्ञानोबा मखर (४० वर्षे रा. आरणगाव ता. शिरुर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## वाळू तस्करी प्रकरणी गुन्हा दाखल



**दौंड :** लिंगाळी रोड (ता. दौंड) ग्रामपंचायत हद्दीतून रात्रीच्या सुमारास बेकायदेशीरपणे वाळू वाहतूक करणाऱ्या उरुळी कांचन (ता. हवेली) येथील एका इसमावर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास लिंगाळी रोड (ता. दौंड) परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे. अमोल रामदास कानकाटे (वय ३७, रा. उरूळी कांचन, ता. हवेली) असे अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. त्याच्याकडून पोलिसांनी अंदाजे ४ ब्रास वाळू (किंमत २० हजार) व वाळू वाहतूक करणारा एक ट्रक (किंमत १० लाख रुपये) असा १० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे ट्रकचा मागील क्रमांक नसल्याचेही पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार पंकज देवकाते (वय २८) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## बारावीत कमी गुण मिळाल्याने विद्यार्थीनीची आत्महत्या

**दौंड :** बारावीच्या परीक्षेत कमी गुण मिळाल्याने पिलाणवाडी (ता. दौंड) येथील एका १७ वर्षीय



विद्यार्थिनीने राहत्या घरात साडीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सोमवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हि घटना उघडकीस आली. हर्षदा बबन पवार (वय १७) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. बारावीचा निकाल सोमवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास जाहीर झाला. निकाल जाहीर झाल्यानंतर नैराश्याच्या भावनेतून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज परिसरातून व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी हर्षदाचे वडील बबन महादेव पवार यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हर्षदा शाळेत हुशार मुलगी होती. ती पुणे येथे शिक्षण घेत होती. इयत्ता दहावीला तिला ८७ टक्के गुण होते. बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये तिला ५५ टक्के गुण मिळाले होते. त्यामुळे ती खूप नाराज होती. तिचे आईवडील, राहु बेट परिसरात रोजंदारीवर काम करणारे, घटनेच्या वेळी कामावर बाहेर होते.

# शिक्रापूर तळेगाव रस्त्यावर कंटेनरचा थरार

## बेधुंद कंटेनर चालकाने दोन दुचाक्या चिरडल्या एक ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर चाकण रस्त्यावर एका कंटेनरने वीस हून अधिक वाहनांचा अपघात केल्याची घटना ताजी असताना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास बेधुंद अवस्थेत आलेल्या कंटेनर चालकाने दोन दुचाकींना धडक दिल्याने झालेल्या अपघातात एका ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून दिलीप सुभाष खोचरे असे मृत इसमाचे तर श्रीराम बाबुराव सांगळे असे पोलिसांनी अटक केल्या मद्यपी कंटेनर चालकाचे नाव आहे.

तळेगाव ढमढेरे येथे हनुमंत भुजबळ हे त्यांच्या पत्नीसह त्यांच्या दुचाकीहून शिक्रापूर बाजूने येत असताना पाठीमागून भरधाव वेगाने मद्यधुंद अवस्थेत आलेल्या कंटेनरने भुजबळ यांच्या दुचाकीला धडक देत समोरील दुचाकीला जोरात धडक देत कंटेनर भरधाव वेगाने तसाच पुढे गेला, पुढे एका फुलांच्या दुकानात कंटेनर जात असताना नागरिकांनी त्या कंटेनर चालकाला अडवत येथे उपस्थित कृष्णा गंभिरे या युवकाने शिताफीने कंटेनरची चावी काढून घेतली, सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार किशोर तेलंग, अमोल चव्हाण, संदीप कारंडे, पोलीस शिपाई ललित चक्रनारायण, योगेश आव्हाड यांनी घटनास्थळी धाव घेत संतप्त जमावातून कंटेनर चालकाला ताब्यात घेतले, सदर भीषण अपघातात हनुमंत संभाजी भुजबळ (३७ वर्षे) व अश्विनी हनुमंत भुजबळ (३३ वर्षे, दोघे रा. माळीमळा तळेगाव ढमढेरे ता. शिरुर) हे गंभीर जखमी झाले असून दिलीप सुभाष खोचरे उर्फ खोचरे मामा (६८ वर्षे रा. बजरंगवाडी शिक्रापूर ता. शिरुर) यांचा मृत्यू झाला असून याबाबत हनुमंत संभाजी भुजबळ (३७ वर्षे रा. माळीमळा तळेगाव ढमढेरे ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी श्रीराम बाबुराव सांगळे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार किशोर तेलंग हे करत आहे.




### सुदैवाने अनर्थ टळला

● तळेगाव ढमढेरे येथे ज्या ठिकाणी अपघात झाला तेथे महाविद्यालय असून अनेक विद्यार्थी येथे असतात मात्र नुकत्याच शाळा व महाविद्यालय यांना सुट्टी लागल्याने येथे गर्दी नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

### परिसरात हळहळ व्यक्त

● शिक्रापूर सह परिसरात वीस वर्षांपूर्वी सर्वप्रथम शुध्द पिण्याच्या पाण्याचे जार विक्रीचा व्यवसाय दिलीप खोचरे उर्फ खोचरे मामा यांनी सुरु केला होता तो अद्यापही सुरु असताना पाण्याचे वाटप साठी गेलेले असताना अपघातात दुर्घटना घडल्याने शिक्रापूर सह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नीरा बसस्थानकाचा दुरध्वनी दोन महिन्यांपासून बंद




## तक्रार करूनही बीएसएनएल दाद देईना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा बसस्थानकाचा दुरध्वनी गेल्या दोन महिन्यांपासून बंद पडला आहे. याबाबत बीएसएनएलच्या नीरा येथील कार्यालयात तक्रार करण्यात आली आहे. प्रवाशांनी बसेसची चौकशी करण्यासाठी नीरा बसस्थानकांत दुरध्वनी केला तर दुरध्वनी लागत नाही. परिणामी, नीरा बसस्थानकांत बसेसच्या वेळापत्रकाबाबत चौकशी कशी करायची असा प्रश्न निर्माण झाला आहे.

नीरा येथील बीएसएनएलच्या कार्यालयात गेल्या दीड महिन्यांपुर्वी लेखी तक्रार करूनही नीरा बसस्थानकातील बंद असलेला दुरध्वनी दुरूस्त केला जात नाही. त्यामुळे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसेसच्या वेळापत्रकाची माहिती घेण्यास अडचणी निर्माण होत आहे. परिणामी प्रवाशांची मोठी कुचंबणा होत आहे.

याबाबत नीरा बसस्थानकाचे वाहतुक नियंत्रक प्रमोद सोनवणे म्हणाले की, गेल्या दोन महिन्यांपासून नीरा बसस्थानकातील दुरध्वनी बंद असून तो सुरू करावा याबाबत बीएसएनएलच्या नीरा येथील कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा तक्रारी अर्ज दिला आहे. मात्र, आज अखेरपर्यंत दुरध्वनी सुरू केला नाही.

# बारामतीच्या मुलींची गोल्डन कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** दि. १ ते ४ मे रोजी क्राईस्ट अकॅडमी मुंबई या ठिकाणी राष्ट्रीय पिंच्याक सिलाट खेलो इंडिया उमन्स लीग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत भारतातील एकूण ३५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धा स्पोर्ट्स अथोरेटी ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने झाल्या. या स्पर्धेसाठी इंडियन पिंच्याक सिलाट असोसिएशनचे अध्यक्ष किशोर येवले, साईचे ऑब्झरवर प्रमोद सिंगडे, शीतल कचरे, शिवसेना महिला आघाडी अध्यक्ष नवी मुंबई, तारिख भाई व आदिल इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत बारामतीच्या योद्धा स्पोर्ट्स क्लबच्या ४ मुलींची निवड राष्ट्रीय खेलो इंडिया स्पर्धेसाठी झाली होती. यामध्ये वैष्णवी गुळवे व यशश्री माने यांनी गंडा या प्रकारात गोल्ड मेडल मिळवून १०,००० रुपयाची खेलो इंडियची स्कॉलरशिप मिळवली. तर श्रेया गरजे या खेळाडूने फाईट (टँडिंग) या प्रकरत हरियाणा व मध्यप्रदेश आणि दिल्ली च्या खेळाडूला हरवून रजत पदक मिळवून आपल्या नावे ६००० रुपयांची स्कॉलरशीप मिळवली. आर्य बोडरे या खेळाडूने अतिशय चांगली कामगिरी केली. या सर्व खेळाडूंनी साहेबराव ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली बारामतीत योद्धा स्पोर्ट्स क्लब अकॅडमी या ठिकाणी गेली ४ वर्ष प्रॅक्टिस केली. या सर्व खेळाडूंना सूर्यनगरीतील सर्वच पालकांनी अतिशय मदत केली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल सूर्यनगरीतील अक्षय थोरात - योद्धा युवा प्रतिष्ठान अध्यक्ष, प्रवीण माने - अनंत युवा प्रतिष्ठान अध्यक्ष, अक्षय जगताप, अनंत भोसले, किशोर गरजे, सुरेश बोडरे, चंद्रकांत माने, राहुल गुळवे इत्यादीनी कौतुक केले. व योद्धा स्पोर्ट्स क्लबला लागेल ती मदत करण्याचे आश्वसन दिले. योद्धा स्पोर्ट्स क्लब गेली १२ वर्ष बारामती वा सूर्यनगरी परिसरात मुलांना ट्रेनिंग देण्याचे काम करत आहे.




# विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावी परीक्षेचा निकाल विज्ञान शाखेत ९९.६२%, वाणिज्य शाखेत ९७.७२% तर कला शाखेत ८५.७९% लागला आहे.

विज्ञान शाखेतील यशस्वी विद्यार्थी : पवार संजना सुधाकर हिने ९०.६७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. मोकाशी ओम परमेश्वर याने ८९.५०% गुणांसह द्वितीय तर काळे वैष्णवी अनिल व शिर्के सुयोग सहदेव यांनी ८७.५०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. विशेष उल्लेखनीय म्हणजे यादव गायत्री सर्जेराव व थोरात प्रेम नंदकुमार यांनी आयटी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून पुणे बोर्डात प्रथम क्रमांक मिळवला.

वाणिज्य शाखेतील यशस्वी विद्यार्थी : मानेदेशमुख शतावरी सुदर्शन हिने ९४.५०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. मोरे साक्षी बाळासो हिने ९३.८३% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर शाहीर नेहा हेमंत व मलगुंडे स्नेहा बाळासो यांनी ९०.३३% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. शहागडकर नंदिनी शंकर हिने बुक किपिंग आणि अकाउंटन्सी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून पुणे बोर्डात प्रथम क्रमांक मिळवला.

कला शाखेतील यशस्वी विद्यार्थी : दळवी आदिती गणेश हिने ९३.६७% गुणांसह प्रथम, सोनवणे समृद्धी कुंडलिक हिने ८९.६७% गुणांसह द्वितीय, तर खरात प्राजक्ता शरद हिने ८७.८३% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार साहेब, उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार, उपाध्यक्ष अँड. अशोक प्रभुणे, सचिव अँड. नीलिमा गुजर, खजिनदार युगेंद्र पवार, सौ. सुप्रिया सुळे, सौ. सुनेत्रा पवार, डॉ. राजीव शहा, मंदार सिकची, किरण गुजर, कर्नल श्रीष कंबोज, प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ. अंकुश खोत तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.



## तळेगाव ढमढेरेत ऑपरेशन सिंदूरनंतर जल्लोष

**शिक्रापूर :** भारतीय लष्कर सैन्य दलाने सिंदूर मिशन अंतर्गत केलेल्या हल्ल्यामध्ये पाकिस्तान मधील नऊ दहशतवादी ठिकाणे उध्वस्त केल्याच्या धाडसी कार्याचा शिरुर तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने तिरंगा फडकवत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. तळेगाव ढमढेरे येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने भारतीय लष्कर सैन्य दलाने सिंदूर मिशन अंतर्गत केलेल्या हल्ल्यामध्ये पाकिस्तान मधील नऊ दहशतवादी ठिकाणे उध्वस्त केल्याने हातामध्ये तिरंगा घेऊन तिरंगा फडकवत, भारत माता कि जयच्या जयघोषात एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला, याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे शिरुर तालुकाध्यक्ष जयेश शिंदे, क्रीडा आघाडीचे जिल्हाध्यक्ष रवींद्र ढमढेरे, शिवसेना ओबीसी प्रमुख कैलास नरके, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य नवनाथ भुजबळ, ज्येष्ठ नेते कैलासदादा नरके, संतोष ढमढेरे, रजनीकांत भुजबळ, प्रशांत चौधरी, दादा जगताप, अजिंक्य भुजबळ, सुमित नरके, बाबू पाटील ढमढेरे, सचिन गोरे, सुनील भुजबळ, संजय शिंदे, ओबीसी सचिव शंकर भुजबळ यांसह आदी उपस्थित होते. तर यावेळी बोलताना संपूर्ण भारतीय नागरिक सैन्य दलाच्या व नरेंद्र मोदी सरकारच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन जयेश शिंदे यांनी केले. तर भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य नवनाथ भुजबळ यांनी सर्वांचे आभार मानले.

## पुणे जिल्हा परिषदेच्या गट आणि गण रचनेबाबत स्पष्टता नाही

**पुणे :** जिल्हा परिषदेचा २०२२ मध्ये कार्यकाळ संपल्यानंतर नव्याने गटरचना करून आरक्षणही जाहीर करण्यात आले होते. मात्र, आता ही सर्व प्रक्रिया पुन्हा नव्याने होणार असल्याची शक्यता आहे. राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू केली होती. जिल्हा परिषद गटांचे आरक्षण जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर राज्य शासनाने जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या गट आणि गण यांची संख्या घटवून २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे पुणे जिल्हा परिषद गटांची संख्या ८२ वरून ७३ आणि पंचायत समिती गणांची संख्या १६४ वरून १४६ झाली होती. पुणे जिल्हा परिषदेत ८२ सदस्य निवडून जाणार की ७३ किंवा २०१७ प्रमाणे सदस्य संख्याही ७५ असणार याबाबत अधिकृतपणे प्रशासनाकडून कुठलीही माहिती देण्यात येत नाही. जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील २३ गावे पुणे महापालिकेत समाविष्ट झाल्याने, पुणे जिल्ह्यातील गट आणि गणांची संख्या कमी होणार असल्याचे निश्चित झाले होते. यानुसार जिल्हा परिषदेच्या २०१७ मधील ७५ गटांची संख्या दोनने कमी झाली आणि ती ७३ झाली होती. बारामती तालुक्यातील माळेगाव त्याचबरोबर वडगाव मावळ आणि देहू येथे नव्याने नगरपंचायतींची निर्मिती झाली, परिणामी अडीच लाख लोकसंख्या ग्रामीण क्षेत्रातून कमी झाल्याचा फटका बसून जिल्हा परिषदेचे दोन गट कमी झाले होते. आता यामध्ये ८२ सदस्य जिल्हा परिषदेवर जाणार की ७३, किंवा न्यायालयाच्या निर्देशानुसार २०१७ असलेली ७५ जिल्हा परिषद सदस्य संख्या राहणार हे शासनाच्या निवडणूक प्रक्रियेबाबतचा निर्णय जाहीर झाल्यानंतर स्पष्ट होणार आहे.

## नवीन इमारतीच्या केबल चोरी

**शिक्रापूर :** तळेगाव ढमढेरे, ता. शिरुर येथील जगताप वस्ती येथे अविनाश जगताप यांच्या नवीन दुमजली इमारतीचे बांधकाम सुरु असून इमारतीची संपूर्ण लाईट लाईट फिटिंगचे काम करण्यात आलेले असून फक्त बोर्ड लावणे शिल्लक असताना अविनाश हे त्यांच्या इमारतीच्या कामाची पाहणी करण्यासाठी गेलेले असताना त्यांना लाईट फिटिंग केलेल्या केबल नसल्याचे दिसून आल्याने त्यांनी पाहणी केली असता अज्ञात चोरट्याने इमारतीला केलेले लाईट फिटिंग खोलून त्यातील वेगवेगळ्या तब्बल चाळीस हजार रुपये किमतीच्या केबल चोरून नेल्याचे निदर्शनास आले आले, याबाबत अविनाश शंकर जगताप (२५ वर्षे रा. जगताप वस्ती तळेगाव ढमढेरे ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

## रांजणगाव पोलिसांची जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई

**रांजणगाव गणपती :** बाभुळसर खुर्द, ता. शिरूर येथे पत्त्या खेळणाऱ्यावर कारवाई करत पोलिसांनी रोख रकमेसह १२ लाख ५४ हजार ८०० रुपयांचा



मुद्देमाल केला जप्त केला आहे. याबाबत रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलिस हवालदार विलास सूर्यभान आंबेकर (वय ४२) यांनी फिर्याद दिली आहे. रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि ७ मे रोजी दुपारी ३ च्या सुमारास बाभुळसर खुर्द गावच्या हद्दीतील भांबर्डे ते करडे रोड लगत एका शेतातील झाडाखाली बाळू कृष्णाची बत्ते (वय ४२) रा. रांजणगाव गणपती, नवनाथ सूर्यकांत थीटे (वय ४३) रा. न्हावरे, संतोष बाजीराव वाळके (वय ४३) रा.करडे, अमोल मारुती गायकवाड (वय ३८) रा.करडे, नाना विक्रम पवार (रा. भांबर्डे), शशी वाळके (रा. बाभुळसर खुर्द, गोकुळ गव्हाणे (रा. न्हावरे) हे सर्वजण रमी जुगार पैशावरती खेळत असताना मिळून आले. त्यांच्याकडून २४ हजार ८०० रुपये रोख रक्कम तसेच जुगाराचे साहित्य, मोबाईल आणि वाहने असा एकूण १२ लाख ५४ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# आळंदीत भव्य रथोत्सव-दिपोत्सव

### ज्ञानेश्वरी पारायणास वाचकांची पसंती; कीर्तन, प्रवचन, चिंतन कथांना प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज ७५० व्या जन्मोत्सवी वर्षा निमित्त आळंदीत शुक्रवारी (दि. ९) सायंकाळी पाच ते साडे आठ या वेळात श्रींचा भव्य रथोत्सव आणि इंद्रायणी तिरी दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आला आहे. यात इंद्रायणी पूजन, इंद्रायणी आरती होणार आहे. ७५० मृदंग वादक, २१०० टाळकरी यांचे वादन होणार आहे. इंद्रायणी नदीचे दुतर्फा या निमित्त विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतिषबाजी होणार आहे. यावेळी इंद्रायणी पूजन, आरती आणि १५१ वेदमूर्तींचे वेदमंत्रजय घोषात मंगलमय वातावरणात दिपोत्सव सोहळा होत आहे. या दीपोत्सवात ७५०० महिला भाविक इंद्रायणीचे नदीपात्रात प्रज्वलित केलेले दिवे समर्पित करणार आहेत. या भव्य दिव्य सोहळ्यास पंचक्रोशीतील नागरिक, भाविक, वारकरी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

आळंदी अखंड हरिनाम सप्ताहात बुधवारी (दि. ७) सकाळी सहा वाजता एकनाथ महाराज कोष्टी यांचे नेतृत्वात ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यातील पाचव्या दिवशीची पारायण सेवा हजारो भाविकांच्या उपस्थितीत झाली. दुपारी दिड वाजता चैतन्य महाराज देगलूरकर यांची सुश्राव्य वाणीतून श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे चरित्र चिंतनातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. ज्ञानेश्वर महाराज जाधव आणि केशव महाराज उखळीकर यांची कीर्तन सेवा हरिनाम गजरात झाली. डॉ. नारायण महाराज जाधव यांनी सुश्राव्य प्रवचन सेवा हरिनाम गजरात झाली. रात्री संगीत भजन सेवेत तमिळनाडू येथील माऊली भक्त विठ्ठलदास महाराज गोविंदपुरम यांची भजन सेवा होत आहे.





### महाप्रसाद सेवा लक्षवेधी

● आळंदी आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मध्ये सलग सहा दिवस आमदार शंकरराव जगताप, उद्योजक विजयशेठ जगताप यांचे परिवार तर्फे भाविकांना अन्नदान महाप्रसाद सेवा रुजू होत आहे. हजारो भाविकांना अगदी वेळेवर चहा, नाष्टा, दोन वेळचे मिष्टान्न जेवण महाप्रसाद सेवा अगदी मुक्तहस्त सेवा रुजू झाली आहे. कोणत्याही प्रकारची कमतरता पडू न देता आळंदीचे वैभवात वाढ करणारी महाप्रसाद, अन्नदान सेवा जगताप परिवार तर्फे दिली जात आहे. भाविक, नागरिक यांनी या सेवेचे समाधान व्यक्त केले आहे. यासाठी पिंपळे गुरव येथील रामेश्वर महाराज यांचे नियंत्रणात २०० महिला पुरुष सेवारत कर्मचारी यांचे सेवारत हातून सेवा देत आहेत. ही सेवा देण्याची संधी आमदार शंकरराव जगताप यांच्यामुळे मिळाल्याचे रामेश्वर महाराज यांनी सांगितले. भाविक ही मोठ्या भक्तिमय वातावरण अन्नदान महाप्रसादाचा लाभ घेत आहेत. सुमारे २५ हजारावर भाविकांना रोज अन्नदान महाप्रसाद वाटप केले जात आहे. यासाठी आळंदी ग्रामस्थ देखील भाविकांनी वेळेत महाप्रसाद मिळेल याची दक्षता घेत सर्वांपर्यंत महाप्रसाद वाटप करीत आहेत. आळंदी ग्रामस्थांचे वतीने पहिल्या दिवसाची आणि काल्याचे महाप्रसादाची शनिवारी (दि. १०) व्यवस्था असून अन्नदान सेवा भक्तिमय वातावरणात रुजू केली जात आहे.

# निरेच्या पाण्यावर धनदांडग्यांचा डल्ला

### बारामतीत नीरा डावा कालव्यातील पाण्याचा बड्या शेतकऱ्यांना लाभ



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती तालुक्याच्या ग्रामीण भागात निरा डावा कालव्याचे आवर्तन सुरू आहे. परंतु, या कालव्याच्या पाण्याची चोरी मोठ्या प्रमाणावर होत आहे. या धनदांडग्या पाणीचोरांच्या पिकांना चांगलेच बाळसे आले असतानाच खऱ्या लाभधारक शेतकऱ्यांच्या पिकांचे मात्र अक्षरशः कोळसे होताना पाहायला मिळत आहे.

गरजेच्या ठिकाणी आवर्तनाची मागणी होत असताना जलसंपदा विभागाकडून पाण्याच्या चोरीमुळेच आवर्तन लांबणीवर पडत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पाणीचोरी रोखण्यासाठी सरकारनेच ठोस उपाययोजना करण्याची मागणी सर्वच स्तरांतून होते आहे.

बारामती व इंदापूर तालुक्यातील गावांतील शेतीसाठी निरा डाव्या कालव्याचे दुसरे उन्हाळी आवर्तन सुरू आहे. हे आवर्तन पाणीचोरीमुळे पुढे सरकता सरकेना झाले आहे. कालवा व वितरिकेच्या लगतच्या बहुतांश धनदांडग्या शेतकऱ्यांनी पाण्याच्या चोरीचा सपाटा लावला आहे.

जेव्हा कालवा सल्लागार समितीची बैठक झाली होती, तेव्हा या कालव्याच्या पाण्याचे योग्य नियोजन केले जाते. मात्र, प्रत्यक्षात उन्हाळ्यात आवर्तने सोडली जातात.

त्याचवेळी पाण्याची चोरी मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे खरे नियमितपणे पाणीपट्टी भरणारे लाभधारक शेतकरी हक्काच्या पाण्यापासून वंचित राहत आहेत. परिणामी, लाभधारक शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके पाण्याअभावी जळून जाताना दिसत आहेत. ही पाणीचोरी रोखताना जलसंपदा खात्याची मोठ्या प्रमाणावर दमछाक होते आहे.

या कालव्यारील अनेक वितरिकांना मागील पहिले आवर्तन सुटून ५५ ते ६० दिवस उलटले आहेत. या वितरिकांचे आवर्तन लांबणीवर गेल्यामुळे शेतातील पिके पाण्याअभावी जळून जाताना दिसत आहेत. शेतकऱ्यांनी एकरी ५० हजार ते एक लाख रुपये खर्च करून जगविण्यात आलेली उभी पिके नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपयांचे नुकसान सोसण्याशिवाय पर्यायच उरला नाही.

## शिक्रापुरात बावन्न वर्षांनी भेटले शालेय सवंगडी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील विद्याधाम प्रशाला येथे १९९२ ते १९७३ साली शिक्षण घेतलेल्या तत्कालीन माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच संपन्न झाला असून यामुळे तब्बल बावन्न वर्षांनी शालेय सवंगड्यांचा पुन्हा वर्ग भरल्याचे दिसून आले.

शिक्रापूर येथील विद्याधाम प्रशाला येथे १९९२ ते १९७३ साली शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच महाराष्ट्र राज्यपाणी वाटप कमिटीचे माजी सदस्य अरुणदादा करंजे यांच्या पुढाकाराने संपन्न झाला, यावेळी सरपंच रमेश गडदे, माजी नायब तहसीलदार नामदेव साळुंखे, माजी मुख्याध्यापक तिरसिंग धुमाळ, माजी गटविकास अधिकारी दौलतराव टेमगिरे, महाराष्ट्र राज्यपाणी वाटप कमिटीचे माजी सदस्य अरुणदादा करंजे, माजी शिक्षक बाबुराव साकोरे, सुर्यकांत शिर्के, महादेव बांगर यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान तब्बल बावन्न वर्षांनी तसेच पासष्टी ओलांडलेल्या सर्व मित्रांना एकत्र पाहून सर्वांच्या चेहऱ्यावर वेगळाच आंनद दिसत होता, तर यावेळी बारा दिवंगत सहकाऱ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, यावेळी सर्व माजी विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला तर सर्व जुने सहकाऱ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला, तर ज्येष्ठ झालेल्या माजी विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी मेळावा होते हे दुर्मिळ असल्याचे माजी मुख्याध्यापक तिरसिंग धुमाळ यांनी सांगितले, यावेळी माजी नायब तहसीलदार नामदेव साळुंखे यांनी सर्वांचे आभार मानले.

## अहिल्या त्रिशताब्दी यात्रा समारोह जेजुरीत साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त क्षत्रिय धनगर संघ इंदोरच्या वतीने अहिल्या विचार कर्मभूमी तें जन्मभूमी असा इंदोर (मध्यप्रदेश )तें जेजुरी (महाराष्ट्र )असा सहाशे किलोमीटरचा प्रवास करीत शेकडो खंडोबा भक्त जेजुरीच्या श्रीमंत सरदार सुभेदार मल्हारराव होळकर छत्री स्मृती मंदिर येथे अहिल्या कुलदैवत खंडोबा म्हाळसा चरणी दाखल झाले होते.

येथील खंडोबा मंदिर दर्शन आणि आपल्या वंशज असलेल्या होळकर स्मृती परिसरात होळकर घराण्याचे तृतीय वंशज युवराज यशवंतराव होळकर यांनी कुळधर्म कुलाचाराच्या जागरण गोंधळ धार्मिक संस्कृतीक कार्यक्रमात सहभाग दर्शवीत आपले पायही थिरकविले. मंगळवारी सायंकाळी युवराज आणि त्यांचे सहकारी सरदार मामा अमरजीत बारगळकर, अंकुश भांड दीपक वालेकर संजय कडू, यांनी जेजुरीगडावर जाऊन महाअभिषेक घातला. याप्रसंगी श्री मार्तंड देवसंस्थान विश्वस्त कमिटीच्या वतीने युवराज होळकर परिवाराचे स्वागत विश्वस्त डॉ राजेंद्र खेडेकर आणि माजी विश्वस्त प्रमुख डॉ प्रसाद खंडागळे यांनी, तर जेजुरी ग्रामस्थांच्या वतीने जेजुरीगड मानकरी इनामदार भाजपा शहर अध्यक्ष सचिन पेशवे यांनी छत्री मंदिर येथे युवराज आणि क्षत्रिय धनगर समाज संघ इंदोर यांचे स्वागत केले. तर धार्मिक विधीचे पौरोहित्य प्रसाद हरिश्चंद्रे गुरुजी यांनी केले. छत्री मंदिर येथे आणि होळकर वाड्यात अहिल्यादेवी आणि मल्हारराव होळकर यांना युवराजानी वदंन करत जागरण गोंधळही घातला.



# ओतूर येथे दोन बांग्लादेशी नागरिकांना अटक




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** ओतूर (ता. जुन्नर) पोलिस ठाणे हद्दीत ओतूर शहरात दोन बांगलादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्यास असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाल्याने दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनिटने त्यांना अटक केली. ही कारवाई बुधवारी (दि. ७) दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास ओतूरच्या जुन्या बसस्थानकाजवळ करण्यात आली. गुरुवारी (दि. ८) न्यायालयापुढे रिमांडसाठी हजर करण्यात आले.

अटक आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत. भारतातील नाव- ताजमिर मुस्तफा अन्सारी (वय २८ , रा. ओतूर, ता. जुन्नर, बांगलादेशातील नाव - मोहम्मद ताजमिर हुसेन मोहम्मद गुलाम मुस्तफा, रा. बोईकारी, ता. जि. सातखिरा) आणि भारतातील नाव- अलीमून गुलाम अन्सारी (वय २७ , रा. ओतूर, ता. जुन्नर, बांगलादेशातील नाव - आलिमून कादेर मोहम्मद गुलाम हुसेन, रा. बोईकारी, ता. जिल्हा सातखिरा) अशी आहेत. त्यांना ओतूर पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता तसेच त्यांच्याकडील कागदपत्रांची तपासणी केली असता ते बांगलादेशी नागरिक असल्याचे व भारतात घुसखोरी करून बेकादेशीररित्या राहत असल्याचे निष्पन्न झाले. या दोघांकडे त्यांचे बांगलादेशी पासपोर्ट तसेच भारतातील आधार कार्ड व इतर कागदपत्रे मिळून आली आहेत.

याबाबत ओतूर पोलीस स्टेशनचे पोलीस जवान रोहित बोंबले यांनी फिर्याद दिली आहे, दोन्ही बांगलादेशी नागरिकांवर परकीय नागरिक कायदा १९४६ कलम १४, पारपत्र अधिनियम १९६७ नियम ३ व ६, परकीय नागरिक आदेश १९५० चे कलम ३ (अ) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. त्यांना अटक करण्यात आली असून याबाबतचा तपास ओतूरचे सहायक पोलीस निरीक्षक लहू थाटे करीत आहेत.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र चौधर यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे, पोलीस हवालदार शरद जाधव, ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक लहू थाटे, पोलीस उपनिरीक्षक आमने, पोलीस हवालदार दिनेश साबळे, नामदेव बांबळे, महेश पठारे, संदीप लांडे, पालवे, पोलीस जवान रोहित बोंबले, संतोष भोसले, किशोर बर्डे, ज्योतीराम पवार, विशाल गोडसे यांचे पथकाने केली.



## असं आहे 'सॅन मरिनो'

सफर देशांची

'सॅन मरिनो' हा दक्षिण युरोपमधला एक देश आहे. सॅन मरिनो जगातला पाचव्या तर युरोपातला तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात लहान आकाराचा देश आहे. हा देश चारही बाजूंनी इटलीने वेढलेला आहे. या देशाची लोकसंख्या फक्त तीस हजार आहे. 'सिटी ऑफ सॅन मरिनो'ही या देशाची राजधानी. 'सॅन मरिनो' ही जगातली सर्वात जुनी लोकशाही असल्याचं म्हटलं जातं. हा स्वतंत्र देश असला तरी तो मोठ्या प्रमाणावर इटलीवर अवलंबून आहे.

पर्यटन हा इथला सर्वात मोठा उद्योग आहे. गंमत म्हणजे पोस्टाचे जुने स्टँप विकण्याचा व्यवसायही इथले बरेच लोक करतात. हा इथल्या लोकांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. युरो हेच सॅन मरिनोचं चलन आहे. या देशातले लोक इटालियन भाषा बोलतात. छोट्या आकाराचा हा देश निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. ॲपेनाइन पर्वतरांगा हे या देशाचं ठळक वैशिष्ट्य. सॅन मरिनोचा बराचसा भाग डोंगराळ आहे. सपाट भूभाग इथे जवळपास नाहीच. 'माँटे टिटॅनो' हे इथलं सर्वात उंच शिखर आहे.

सॅन मरिनोमध्ये विविध प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पहायला मिळतात. इथे शेतीही केली जाते. गहू, द्राक्ष, मका, ऑलिव्ह ही पिकं इथे घेतली जातात. काही लोक पशुपालनाचा व्यवसायही करतात. १९९२ मध्ये हा देश संयुक्त राष्ट्रांचा सदस्य बनला. इथे कुटुंबव्यवस्था अस्तित्वात आहे. इथे सुंदर शिल्पं पहायला मिळतात. या देशात २२० किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी इटलीवर आहे.



## एसीची गोष्ट

गंमत जंमत

छोट्या दोस्तांनो, चला... आपण एसी वापरताना काय काय लक्षात ठेवायचं ते बघू या.

ताई: ए गौरव, ऐक... तुला माहीत आहे का, आपण घरात एसी सुरू करतो तेव्हा काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात.

गौरव: का गं, काय होतं एसी सुरू केल्यावर?

ताई: अरे, एसी सुरू केला की खूप थंड हवा येते, बरोबर? पण ती थंड हवा अंगावर थेट आली तर सर्दी, खोकला किंवा अगदी तापही येऊ शकतो.

गौरव: मग हा त्रास टाळण्यासाठी काय करायचं?

ताई: बघ, काही सोप्या गोष्टी लक्षात ठेवायच्या. जसे की, थंड हवा थेट अंगावर येऊ द्यायची नाही. एसीमध्ये झोपताना पांघरूण घ्यायचं. झोपताना शरीर थोडं उबदार राहायला हवं. महत्त्वाचं म्हणजे एसीच्या गारव्याने खोलीतील वातावरण खूप थंड होऊ द्यायचे नाही. २४ ते २६ डिग्री तापमान ठेवलं की एकदम मस्त वाटतं.

गौरव: ताई, आणखी काय करायचं?

ताई: एसी सुरू ठेवून खूप काळ झोपायचं वा खोलीत बसायचं नाही. त्यासाठी टाइमर लावून ठेवता येतो. त्याने एसी ठराविक वेळेनंतर आपोआप बंद होतो. महत्त्वाचं म्हणजे खोलीमध्ये थोडी का होईना, पण फ्रेश हवा येत राहिली पाहिजे. म्हणून थोड्या थोड्या वेळाने खिडकी उघडली पाहिजे. खोलीत पाण्याचे भांडे भरुन ठेवायचे. यामुळे हवा कोरडी होत नाही. या उपायामुळे आपला नाक, घसा कोरडा पडत नाही.

गौरव: ओह! म्हणजे एसी मस्त आहे, पण त्याचा वापर नीट केला पाहिजे.

ताई: अगदी बरोबर! एसी म्हणजे थंडीची जादू आहे. पण ही जादू वापरताना थोडा शहाणपणा वापरावा लागतो इतकंच.

गौरव: ताई, यापुढे मी हे लक्षात ठेवेन. एसी सुरू असेल तेव्हा थेट हवेचा झोत अंगावर घेत झोपणार नाही. हलकेसे पांघरुण घेईन. उन्हात खेळून आल्याबरोबर लगेचच थंड खोलीत जाणार नाही.

## फळे खा, तंदुरुस्त राहा

स्टे फिट

मुलांनो, प्रत्येक हंगामात वेगवेगळी फळं मिळतात. फळांमध्ये भरपूर पोषणमूल्यं असतात. त्यामुळे बाहेरचं, जंकफूड खाण्यापेक्षा एखादं फळ जवळ ठेवणं कधीही चांगलं. प्रत्येक फळातले पोषक घटक वेगळे, त्यांचे उपयोगही वेगळे... तर अशाच काही फळांमधल्या पोषक घटकांची माहिती करून घेऊ.



✻ उन्हाळ्यात बाजारात जांभळं येतात. आंबटगोड जांभळं खायला खूप छान लागतात. जांभळामध्ये बरेच पोषक घटक असतात. या फळात लोह, पोटॅशियम आणि काही जीवनसत्त्वं असतात. जांभळात कॅलरीही खूप कमी असतात.

✻ पिअर हे फळ अनेक विकारांवर लाभदायी ठरतं. यातल्या जीवनसत्त्वांमुळे विविध जंतूंपासून शरीराचं रक्षण होतं. म्हणूनच याचं सेवन करायला हवं.

✻ लिची हे फळ तुम्हाला आवडत असेल. या फळाची साल लाल आणि गर पांढऱ्या रंगाचा असतो. लिचीमध्ये 'क' जीवनसत्त्व असतं.

✻ चेरी हे छोटंसं फळ असलं तरी ते खूप म्हणजे खूप गुणकारी आहे. यात कर्बोदकं, जीवनसत्त्वं, बीटा कॅरोटिन, कॅल्शियम असे बरेच घटक असतात.

✻ प्लम किंवा आलूबुखारा हे लाल रंगाचं फळ आहे. या फळातल्या विविध घटकांमुळे रक्त शुद्ध होतं. प्लम खाल्ल्याने रक्ताभिसरण सुधारतं.

## सामाजिक क्षेत्रात काम करा

कोण होणार?

मुलांनो, तुम्हाला समाजकार्यात रस असेल तर तुम्ही सामाजिक क्षेत्रात करिअर करू शकता. समाजकार्य म्हणजे फक्त एखाद्या सामाजिक संस्थेत काम करणं नाही, तर त्यापेक्षाही बरंच काही आहे. सामाजिक क्षेत्राशी संबंधित बरेच अभ्यासक्रमही आहेत. अशाच काही अभ्यासक्रमांची ओळख करून घेऊ.




✻ 'ह्युमन रिसोर्स अँड लेबर रिलेशन्स' या अभ्यासक्रमाला सध्या बरीच मागणी आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आयटी, बँकिंग अँड फायनान्स, मॅनेजमेंट कन्सल्टंसी, मॅन्युफॅक्चरिंग, टेलिकॉम, पब्लिक सेक्टर या क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकता.

✻ 'डेव्हलपमेंट स्टडीज' हा अभ्याक्रम पूर्ण करून तुम्ही बरंच काही करू शकता. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार २०३० पर्यंत जगातील ८५ टक्के लोकसंख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये रहाणारी असेल. त्यामुळे विकासकामं वेगाने होतील. पर्यावरण रक्षणाचा प्रश्नही आ वासून उभा राहील. अशा वेळी विकासाचे कार्यक्रम राबवणाऱ्या तज्ज्ञांच्या मागणीत बरीच वाढ होईल.

✻ 'सोशल आंत्रप्रेन्योर' या संकल्पनेत आपल्या उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून सामजिक कार्य करता येतं. त्यामुळे या विषयाचं ज्ञान तुम्हाला खूप पुढे घेऊन जाईल.

✻ हवामान बदल हा सध्याचा खूप मोठा प्रश्न आहे. म्हणूनच 'क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलिटी स्टडीज'ला मोठी मागणी आहे. शाश्वत विकास ही काळाची गरज आहे. पर्यावरण रक्षणाच्या नव्या कल्पना तुमच्याकडे असतील तर हा विषया निवडता येईल.

## आकाश निळे, कशामुळे ?

विचार करा

छोट्या दोस्तांनो, आकाश हा शब्द कानी पडताच आपल्या डोळ्यासमोर एक निळाई पसरते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, आकाश निळेच का आहे? अवकाशातून पृथ्वीवरील सर्व काही काळे दिसत असले तरी पृथ्वीवरून आकाश मात्र निळे का दिसते?

या प्रश्नाचे उत्तर खूप मनोरंजक आहे. तुम्हाला माहितीच आहे की, सूर्यप्रकाश पांढरा असतो. पण प्रत्यक्षात तो सात रंगांनी बनलेला असतो.



हे सात रंग म्हणजे जांभळा, निळा, हिरवा, पांढरा, पिवळा, नारिंगी आणि लाल...

यालाच आपण स्पेक्ट्रम म्हणतो. हा प्रकाश पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करतो तेव्हा हवेच्या रेणू आणि धुळीच्या कणांशी धडकतो आणि त्यातून प्रकाश पसरतो.


आकाशाचा रंग निळा असल्याचे मुख्य कारण 'रेलेज स्कॅटरिंग लॉ' मध्ये दडले आहे. या नियमानुसार, वेगवेगळ्या रंगांच्या प्रकाशाचे विकिरण त्यांच्या तरंगलांबीवर अवलंबून असते. म्हणजेच कमी तरंगलांबी असणारे रंग (निळे आणि जांभळे) जास्त पसरतात तर जास्त तरंगलांबी असणारे रंग (लाल आणि पिवळे) कमी पसरतात.

निळ्या रंगाची तरंगलांबी (सुमारे ४५०-४९५ नॅनोमीटर) म्हणजे खूपच कमी असल्याने ती वातावरणात असणाऱ्या नायट्रोजन आणि ऑक्सिजन रेणूंना धडकते आणि सर्व दिशांना विखुरते. म्हणूनच आपल्याला आकाश निळे दिसते.


मग एक प्रश्न उद्भवतो की, जांभळ्या रंगाची तरंगलांबी निळ्यापेक्षा कमी असली तरी मग आकाश जांभळे का दिसत नाही? मुलांनो, याचे कारण असे की, मानवी डोळे निळ्या रंगाबद्दल अधिक संवेदनशील असतात. डोळ्यांना जांभळा रंग कमी दिसतो. म्हणूनच जांभळ्या रंगाचे अधिक विखुरणे असू-नही आपल्याला आकाश निळेच दिसते.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी सूर्यकिरणांना वातावरणात जास्त अंतर पार करावे लागते. या दरम्यान निळा आणि कमी तरंगलांबी असणारा प्रकाश आधीच विखुरला जातो आणि फक्त लांब तरंगलांबी रंग (लाल, नारिंगी) आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचू शकतात. म्हणूनच सूर्य उगवतो आणि मावळतो तेव्हा आकाश लाल-केशरी दिसते.

### ठिपके जुळवा



### चित्र रंगवा



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणारी पहिली भारतीय बॅडमिंटनपटू कोण?

२) टेलेस्कोपचा शोध कोणी लावला?

३) जगातलं सर्वात मोठं प्राणीसंग्रहालय कोणतं?

४) जगातला सर्वात लहान आकाराचा पक्षी कोणता?

५) जगातला सर्वात मोठा समुद्र कोणता?

६) पर्ल हार्बर हे बेट कोणत्या महासागरात आहे?

७) चीनची राजधानी कोणती?

८) फिनलँडची राजधानी कोणती?

९) हवाना ही कोणत्या देशाची राजधानी आहे?

१०) पंचतंत्राचे मूळ लेखक कोण?

उत्तर : १) पी.व्ही. सिंधू २) गॅलिलिओ गॅलिली ३) बर्लिन झूओलॉजिकल गार्डन ४) हमिंग बर्ड ५) फिलिपाईन समुद्र ६) पॅसिफिक महासागर ७) बीजिंग ८) हेलसिंकी ९) क्युबा १०) विष्णू शर्मा

## कबड्डीविषयी...

खेळा आणि शिका

मित्रांनो, तुम्हाला कबड्डी हा खेळ आवडत असेल. यात खेळाडू शत्रूच्या क्षेत्रात प्रवेश करण्याचा, त्यांना स्पर्श करण्याचा आणि परत येण्याचा प्रयत्न करतो आणि एकाच श्वासात कबड्डी, कबड्डी म्हणतो. म्हणूनच यात चपळता, ताकद, रणनीती, टीमवर्क आणि श्वास रोखून ठेवण्याची क्षमता यांचे मिश्रण दिसून येते.

तर मित्रांनो, कबड्डीची सुरुवात आपल्या देशाच्या मातीपासून झाली. पूर्वी भारतातील खेड्यांमध्ये मुले आणि तरुण हा खेळ खेळत असत आणि तेही बूट, मैदान किंवा तांत्रिक नियमांशिवाय. आजही हा खेळ तमिळनाडू, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश सारख्या राज्यांमध्ये विशेष लोकप्रिय आहे.

हा खेळ आपल्या सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे. खेळाडू वारंवार कबड्डी-कबड्डी का म्हणतो, हा प्रश्न अनेकांना पडतो. कबड्डी हा शब्द 'काई-पिडी' पासून आला असून तमिळमध्ये त्याचा अर्थ 'हात धरणे' असा होतो. पण शब्द एकाच श्वासात म्हणत असताना 'कबड्डी' म्हटले जाते. श्वास तुटला तर खेळाडू बाहेर पडतो.

कबड्डीची पाळेमुळे अगदी महाभारतासारख्या प्राचीन कथांमध्येही आढळतात. अभिमन्यूच्या चक्रव्यूहात प्रवेशाची कहाणी काहीशी कबड्डीच्या छाप्यासारखी वाटते. एक योद्धा शत्रूच्या वर्तुळात प्रवेश करतो पण रणनीतीअभावी तो पळून जाऊ शकत नाही. म्हणजेच या खेळात केवळ ताकदच नाही तर मन आणि हुशारीची देखील महत्त्वाची भूमिका असते.



प्राचीन काळातील मानव कबड्डीचे तंत्र धोकादायक परिस्थितीत स्वतःचा बचाव करण्यासाठी किंवा हल्ला करण्यासाठी वापरत असलेल्या पद्धतींसारखेच आहे.

आता कबड्डी फक्त भारतापुरती मर्यादित राहिलेली नाही. या खेळाने इराण, दक्षिण कोरिया, जपान, केनिया आणि अगदी अमेरिकेतही आपले स्थान निर्माण केले आहे. भारत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करत असून हा खेळ देशाचा अभिमान बनला आहे.

### दोस्त हे मस्त

## देखणे फ्लेमिंगो


दोस्त हे मस्त ग्रेटर फ्लेमिंगो हा पक्षी भारतातल्या बऱ्याच ठिकाणी आढळतो. हे पक्षी विशिष्ट आवाज काढून एकमेकांना संदेश देतात. फ्लेमिंगोची उंची पाच फूटांपर्यंत असते. याचे पाय लांब आणि बारीक असतात. फ्लेमिंगोचं वैशिष्ट्य म्हणजे हा पक्षी चार ते पाच तास एका पायावर उभा राहू शकतो. याच स्थितीत तो झोपूही शकतो. छोटे मासे, किटक, शेवाळं हे या पक्ष्याचं अन्न आहे.



### स्टडी टिप्स

## घेऊ नका ताण...

छोट्यांनो, कोणत्याही गोष्टीचा ताण घेऊन काहीच होणार नाही. कोणत्याही परीक्षेचा ताण घेत असाल तर यामुळे तुम्ही नीट पेपर लिहू शकणार नाही.



म्हणूनच परीक्षेचा ताण येणार नाही यासाठी तुम्हालाच प्रयत्न करायला हवेत. ताण टाळण्यासाठी सुट्टीतही थोडाफार अभ्यास करा. पुस्तकं वाचण्याचा सराव ठेवा. आत्तापासून अभ्यासलेल्या विषयांची उजळणी करा. यामुळे ज्ञानात भर पडेल आणि ताण कमी होईल.

### खादाडी

## चीझी स्वीट कॉर्न

मुलांनो, कॉर्न म्हणजेच मक्यापासून विविध पदार्थ बनवता येतात. पिवळ्या रंगाचे स्वीट कॉर्न मस्त लागतात. यापासून तुम्ही छानशी 'चीझी स्वीट कॉर्न' ही रेसिपी बनवू शकता.




यासाठी अर्धा कप बारीक चिरलेला टोमॅटो, एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, अर्धा कप किसलेलं चीझ, मीठ, अर्धा चमचा मिरपूड आणि चमचाभर ऑलिव्ह ऑईल असं साहित्य घ्या. एका मायक्रोवेव्ह सेफ भांड्यात कॉर्न घ्या. त्यात टोमॅटो, चीझ, ऑलिव्ह ऑईल, मीठ, मिरपूड घालून नीट हलवून घ्या. आता हे भांडं मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. चीझ वितळेपर्यंत गरम करा. गरमागरम खा.

### योगा टाईम

## उंची वाढवणारं मेरुदंडासन

मुलांनो, तुम्हाला उंच व्हायचं आहे का? मग योगासनं करायला सुरुवात करा. लहान वयात योगा केल्याने तुमची उंची वाढू शकते. त्यातच काही योगासनं उंची वाढायला मदत करतात. असंच एक आसन म्हणजे मेरुदंडासन. हे आसन खूप सोपं आहे. यू ट्यूबवर व्हिडिओ बघून तुम्ही हे आसन करू शकता.









# चेन्नईने कोलकात्याला हरविले

## ब्रेव्हिसने ५२, शिवम दुबेचे ४५ रन्स; नूरच्या ४ विकेट; केकेआरच्या प्लेऑफची आशा कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोलकाता :** बुधवारी (७ मे) इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्सने कोलकाता नाईट रायडर्सला २ विकेट्सने पराभूत केले. ईडन गार्डन्सवर झालेल्या या सामन्यात चेन्नईने कोलकाताला पराभूत करत अखेर तिसऱ्या विजयाची नोंद केली आहे.

चेन्नईचे स्पर्धेतील हंगाम यापूर्वीच संपले आहे. पण या सामन्यातील विजयामुळे त्यांना २ गुण मिळाले असून आता ते १२ सामन्यांनंतर ६ गुणांवर पोहचले आहेत. पण तरी ते १० व्या स्थानीच कायम आहेत. मात्र आता कोलकातासमोरील आव्हान कठीण झाले आहे.

या सामन्यात कोलकाताने १८० धावांचे लक्ष्य चेन्नईसमोर ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग चेन्नईने १९.४ षटकात ८ विकेट्स गमावत १८३ धावा करत पूर्ण केला. चेन्नईकडून डेवाल्ड ब्रेव्हिसने अर्धशतक केले, तर पदार्पणवीर उर्विल पटेल आणि शिवम दुबेनेही महत्त्वपूर्ण खेळी केली.

या सामन्यात चेन्नईकडून आयुष म्हात्रे आणि डेवॉन कॉनवे ही नवीन सलामी जोडी मैदानात उतरली होती. पण दुसऱ्याच चेंडूवर आयुषला वैभव अरोराने शून्यावर माघारी धाडले. तर दुसऱ्या षटकात कॉनवेला मोईन अलीने शून्यावर त्रिफळाचीत केले.

पण तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या उर्विल पटेलने पहिल्या षटकापासूनच आक्रमक खेळण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे चेन्नईला सुरुवात आक्रमक मिळाली होती. मात्र त्याचाही अडथळा तिसऱ्या षटकात हर्षित राणाने दूर केला. त्याचा झेल वरुण चक्रवर्तीने दूर केला. उर्विलने ११ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३१ धावा केल्या.

आर अश्विनला या सामन्यात चौथ्या क्रमांकावर बढती मिळाली होती. पण तो ७ चेंडूत ८ धावा करून बाद झाला. त्याही हर्षितनेच अंगक्रिश रघुवंशीच्या हातून झेलबाद केले.

पाठोपाठ ६ व्या षटकात रवींद्र जडेजाही १० चेंडूत १९ धावा करून वरुण चक्रवर्तीविरुद्ध खेळताना त्रिफळाचीत झाला. त्यामुळे पॉवरप्लेच्या ६ षटकातच चेन्नईने ६० धावांवर ६ विकेट्स गमावल्या होत्या. पण नंतर डेवाल्ड ब्रेव्हिस आणि शिवम दुबे यांची जोडी जमली.

दुबेने एक बाजू सांभाळली असताना ब्रेव्हिसने आक्रमण केले. त्याने वादळी फटके मारताना अर्धशतक केले. पण अर्धशतकानंतर त्याला १३ व्या षटकात वरूण चक्रवर्तीने रिंकू सिंगच्या हातून झेलबाद केले. त्याने २५ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५० धावांची खेळी केली. त्याने शिवम दुबेसोबत ६७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारीही केली. या भागीदारीने चेन्नईला विजयाचा मार्ग सोपा करून दिला. त्यानंतर दुबेने जबाबदारी खांद्यावर घेतली, त्याला एमएस धोनीने साथ दिली.

## महाराष्ट्राचा रिलेमध्ये सुवर्ण धमाका; जलतरणात चार पदके



**पुणे :** महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी सलग तिसऱ्या दिवशी ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पदकांची लयलूट केली. महाराष्ट्राने मुलांच्या ४ बाय मेडले रिले स्पर्धेत सुवर्णपदकाचा धमाका केला. याचबरोबर धरीती अहिरवालने रौप्य, तर वेदान्त तांदळे व अलेफिया धंसुरा यांनी कांस्यपदके जिंकली. गया शहरातील 'बीआयपीएआरडी'च्या जलतरणात तलावावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अर्नव कडू, शुभम जोशी, वेदांत तांदळे व अथर्व संकपाळ या चौकडीने मुलांच्या ४ बाय मेडले रिले स्पर्धेत ३ मिनिटे ५७.८९ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाला गवसणी घातली. कर्नाटकच्या संघाने ३ मिनिटे ५९.०५ सेंकद वेळेसह रौप्य, तर आंध्र प्रदेशाच्या संघाने ४ मिनिटे ०२.५८ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. मुलींच्या ४०० मीटर मेडले प्रकारात महाराष्ट्राच्या धरिती अहिरवाल हिने ४ मिनिटे २०.६० सेंकद वेळेसह रौप्यपदकाची कमाई केली. तमिळनाडूच्या श्रीनिथी नटेसन हिने ५ मिनिटे १७.५७ सेंकद वेळेसह सुवर्णपदकावर मोहर उमटवली, तर तेलंगणाची श्री निथया सागी ५ मिनिटे २०.८१ सेंकद वेळेसह कांस्यपदकाची मानकरी ठरली. याचबरोबर मुलींच्या १०० मीटर फ्रिâस्टाईल प्रकारात महाराष्ट्राच्या अलेफिया धंसुरा हिने ५९.७४ सेंकद वेळेसह कांस्यपदक जिंकले. कर्नाटकची ऋजुला एस. हिने ५९.२९ सेंकद वेळेसह सुवर्ण, तर दिल्लीच्या तितिक्षा रावलने ५९.४८ सेंकद वेळेसह रौप्यपदक जिंकले. मुलांच्या १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात महाराष्ट्राच्या वेदान्त तांदळेला ५६.२९ सेंकद वेळेसह कांस्यपदक मिळाले. आसामचा जानंजॉय हझरिका ५५.५२ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाचा मानकरी ठरला, तर कर्नाटकच्या चिंतन शेट्टीला ५६.१४ सेंकद वेळेसह रौप्यपदक मिळाले.

## आकांक्षा म्हेत्रेला सुवर्ण, सिद्धेश घोरपडेला रौप्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्राला ७व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत मंगळवारी दोन पदके जिंकून देणाऱ्या आकांक्षा म्हेत्रेने बुधवारी सायकलिंग स्पर्धेत मुलींच्या स्प्रींट शर्यतीत सुवर्णपदक जिंकून देण्याचा पराक्रम केला. याचबरोबर मुलांच्या स्प्रींट प्रकारात सिद्धेश घोरपडेला रौप्यपदक मिळाले. सिद्धेशने मंगळवारी महाराष्ट्राला सायकलिंगमधील पहिले सुवर्णपदक जिंकून दिले होते.

राजधानी नवी दिल्लीतील यमुना वेलोड्रम इंदिरा गांधी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचा जयजयकार दुमदुमला. मुलींच्या २०० मीटर्स स्प्रींट शर्यतीत आकांक्षा म्हेत्रेने सुवर्णपदक जिंकले, तर केरळची अनाक्षीया थॉमस रौप्यपदकाची मानकरी ठरली. झारखंडच्या सबिना कुमारीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. मुलांच्या ३ हजार मीटर्स इंडिव्हिजल पुरसुईट सायकलिंगमध्ये महाराष्ट्राच्या सिद्धेश घोरपडेने ३ मिनिटे ३७.७७८ सेंकद वेळेसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. राजस्थानच्या सिताराम बेनिवलने ३ मिनिटे ३६.६०७ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाला गवसणी घातली.

## प्राची गायकवाड, वेदान्त वाघमारेचा 'सुवर्ण'वेध; नेमबाजीच्या थ्री पोझीशनमध्ये अचूक निशाणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** वेदान्त वाघमारे आणि प्राची गायवाड या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत नेमबाजीच्या ५० मीटर थ्री पोझीशन रायफल प्रकारात अचूक निशाणा साधताना सुवर्णपदकाला गवसणी घातली. खेलो इंडियाच्या इतिहासात ५० मीटर थ्री पोझीशन प्रकारात पदक जिंकणारा वेदान्त वाघमारे हा पहिला नेमबाज ठरला. त्यामुळे महाराष्ट्रासाठी हे ऐतिहासिक पदक ठरले.

नवी दिल्लीतील डॉ. कर्णी सिंग शुटींग रेंजवर महाराष्ट्रासाठी बुधवारी सोनियाचा दिवस ठरला. नेवाश्यासारख्या (जि. अहिल्यानगर) ग्रामिण भागातील वेदान्त वाघमारेने ५० मीटर थ्री पोझीशन रायफल प्रकारात मुलांच्या विभागात ४५२.५ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. हरयाणाचा रोहित कन्यान ४५१.९ गुणांसह रौप्यपदकाचा मानकरी ठरला. पंजाबच्या अमितोज सिंगला ४४०.१ गुणांसह कांस्यपदक मिळाले. नेवासा फाट्यावरील त्रिमूर्ती कॉलेजमध्ये शिकणारा वेदान्त वाघमारे सध्या पुण्यातील बालेवाडी येथे किरण खंदारे व बिबासवान गांगुली यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. त्याला तिसऱ्या प्रयत्नात खेलो इंडिया स्पर्धेत पदकाला गवसणी घालण्यात यश मिळाले. याआधीच्या दोन्ही स्पर्धेत वेदान्तने अंतिम फेरी गाठली होती. मात्र, दोन्ही वेळेस त्याला पदकाने हुलकाणी दिली होती. तिसऱ्या प्रयत्नात अखेर त्याचे पदक जिंकण्याचे स्वप्न सत्यात उतरले.

मुंबईच्या प्राची गायकवाड हिने ५० मीटर थ्री पोझीशन रायफल प्रकारात मुलींच्या विभागात ४५८.४ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकाला गवसणी घातली. कर्नाटकच्या टिलोट्टमा सेन हिला ४५५.६ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तिचीच राज्यसहकारी अनुष्का ठोकुर हिने ४४५.७ गुणांसह कांस्यपदक जिंकले. माटूंगा येथील गुरूनानक खालसा कॉलेजची विद्यार्थीनी असलेली मुंबईची प्राची गायकवाड ही अरूण वारेशी व बिबासवान गांगुली यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. खेलो इंडिया स्पेर्धेतील तिचे हे दुसरे पदक होय. गत चेन्नईतील स्पर्धेत प्राचीला कांस्यपदक मिळाले होते. यावेळी तिने आपल्या पदकाचा रंग हा सोनेरी करून दाखविला.

## दुसऱ्या कमिशनर्स करंडक क्रिकेट स्पर्धेचे १० मेपासून आयोजन

**पुणे :** एज इव्हेंट्स अँड एंटरटेनमेंट व बीव्हीसीआय यांच्या तर्फे दुसऱ्या कमिशनर्स करंडक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हि स्पर्धा पीवायसी हिंदू जिमखाना येथील क्रिकेट मैदानावर 10 व 11 मे 2025 या कालावधीत होणार आहे. स्पर्धेविषयी अधिक



माहिती देताना एज इव्हेंट्स अँड एंटरटेनमेंटचे संचालक अनिकेत सोमण यांनी सांगितले कि, या स्पर्धेच्या माध्यमातून अधिकाऱ्यांची तंदरुस्ती, खिलाडूवृत्ती या भावनेने, आणि आमची संघटना व सरकारी संस्था यांच्यातील संबंध अधिक दृढ व्हावेत, या हेतूने या मैत्रीपूर्ण कमिशनर्स करंडक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. विशेष म्हणजे प्रत्येक संघात 5 क्लास वन अधिकाऱ्यांचा समावेश असणार आहे. बीव्हीसीआय कार्याध्यक्ष रणजीत मोरे आणि सचिव सुधीर कुलकर्णी म्हणाले की, स्पर्धेत इन्कम टॅक्स टायगर्स(संघमालक सुहाना मसालेवाले), जीएसटी जायंट्स रिझोल्युशन((संघमालक इनसॉल्व्हवंसी ग्रुप), पीएमसी टायटन्स(वेंकटेश बिल्डकॉन), ग्रामीण चॅलेंजर्स(मालपाणी ग्रुप), पोलीस वॉरियर्स (रावेतकर ग्रुप), चॅरिटी लिजेंड्स(राईज), कस्टम्स सुपर किंग्ज(केदार जाधव) आणि गतविजेते रेल्वे रॉयल्स(आदित इन्फ्रा) हे 8 संघ सहभागी झाले आहेत. तसेच, हि स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघाला करंडक व आकर्षक अशी पारितोषिके देण्यात येणार आहे. याशिवाय सर्वोत्कृष्ट फलंदाज, सर्वोत्कृष्ट गोलंदाज, मालिकावीर, सामनावीर या खेळाडूंना करंडक अशी पारितोषिके देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिक, अष्टपैलु क्रिकेट ॲकॅडमी संघांनी उद्घाटनाचा दिवस गाजवला !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पोर्टर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित चौथ्या 'स्पोर्टर्सफिल्ड करंडक' अजिंक्यपद १२ वर्षाखालील २५-२५ षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिक आणि अष्टपैलु क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उद्घाटनाचा दिवस गाजवला.

सातारा रस्त्यावरील टेंभेकर फार्म्स ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत शाश्वत नागरगोजे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिक संघाने २२ यार्डस क्रिकेट ॲकॅडमीचा ७१ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिकने २५ षटकात १९८ धावांचे लक्ष्य उभे केले. अविष्कार पाटोळे (नाबाद ३९ धावा), आरव साळुंके (३३ धावा), इशान माळी (२३ धावा) आणि कार्तिक के. (२३ धावा) यांनी संघाचा डाव बांधला. याला उत्तर देताना २२ यार्डस क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १२७ धावांवर मर्यादित राहीला. शाश्वत नागरगोजे याने ९ धावांमध्ये ३ गडी तर, कार्तिक के. याने ७ धावांमध्ये २ गडी बाद करून संघाचा विजय साकार केला.

स्वयम नारकडे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे अष्टपैलु क्रिकेट ॲकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा १५ धावांनी पराभव केला. अष्टपैलु क्रिकेट ॲकॅडमीने प्रथम फलंदाजी करताना १४३ धावा धावफलकावर लावल्या.

यामध्ये स्वयम नारकडे याने ४७ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी ब संघाचा डाव १२८ धावांवर संपुष्टात आला. अष्टपैलु संघाच्या अनिश डाबळे याने २३ धावांमध्ये ३ गडी तर, स्वयम नारकडे आणि आयुष पालकर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाचा विजय निश्चित केला.

## गट्स अँड ग्लोरीचा फिनिक्स इलेव्हनवर दणदणीत विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** एचआर कॅपिटा सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने आयोजित पहिल्या छत्रपती करंडक मिश्र कॉर्पोरेट टी 20 क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत मिहिर ओक(2-14 व नाबाद 62) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर गट्स अँड ग्लोरी संघाने फिनिक्स इलेव्हन संघावर 10गडी राखून दणदणीत विजय मिळवला.

ब्रिलियंट्स क्रिकेट अकादमी व स्केल अप मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत आकाश पोळ (2-24) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर रियूनायटेड क्रिकेट क्लब संघाने सह्याद्री क्रिकेट क्लबचा 6गडी राखून पराभव केला.

अन्य लढतीत पराग चितळे(3-8)याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर फिटनेस क्रिकेट क्लब संघाने टायटन्स संघाचा 3गडी राखून पराभव केला.

## रोहित शर्मा कसोटीतून निवृत्त:इंग्लंड दौऱ्यात कर्णधारपदावरून काढून टाकल्याची चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर करून त्याच्या निवृत्तीची माहिती दिली. टी-२० मधून आधीच निवृत्त झालेला रोहित एकदिवसीय सामने खेळत राहील. बुधवारी संध्याकाळी असे वृत्त आले होते की इंग्लंड दौऱ्यावर त्याला कसोटी कर्णधारपदावरून काढून टाकले जाईल. त्यानंतर त्याने लाल चेंडू क्रिकेटला निरोप दिला.

रोहितने २०१३ मध्ये भारतासाठी कसोटी पदार्पण केले. २०२१ मध्ये तो प्लेइंग-११ मध्ये आपले स्थान पक्के करण्यात यशस्वी झाला आणि २०२२ मध्ये त्याला कर्णधारपदही मिळाले. भारतासाठी ६७ कसोटी सामन्यांमध्ये त्याने ४०.५७ च्या सरासरीने धावा केल्या, परंतु घराबाहेर त्याची सरासरी ३१.०१ पर्यंत घसरली.

ऑस्ट्रेलियामध्ये रोहितची सरासरी २४.३८ होती आणि दक्षिण आफ्रिकेत ती १६.६३ होती. तथापि, इंग्लंडमध्ये त्याने ४४.६६ च्या सरासरीने धावा केल्या. गेल्या दौऱ्यात त्याने सलामीला फलंदाजी करताना शतकही झळकावले आहे. रोहितच्या निवृत्तीनंतर, टीम इंडिया यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल यांना कसोटी संघात कायमस्वरूपी सलामीवीर म्हणून बसवण्यावर लक्ष केंद्रित करू शकते. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या कसोटी मालिकेतही रोहित फलंदाजीत खूपच खराब कामगिरी करत होता.

### महाराष्ट्राची जलतरणात पदकअष्टमी

## आदितीची ३ सुवर्णासह पदकपंचमी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्राच्या आदिती हेगडे हिचा सलग दुसऱ्या दिवशी ७व्या खेलो इंडिया स्पर्धेत डंका बघायला मिळाला. तिने सुवर्ण पदकांच्या हॅटट्रिकसह स्पर्धेत ५ पदकांचा पराक्रम केला. जलतरणात महाराष्ट्राने दुसऱ्या दिवशी पदकांची अष्टमी साजरी केली.

गया शहरातील बीआयपीएआरडीच्या जलतरणात तलावाचा परिसरात महाराष्ट्राचा जयजयकार दुमदुमला. ४०० मीटर फ्री स्टाईल व १०० मीटर बटरफ्लाय व रिले प्रकारात मुंबईच्या आदितीने ३ सुवर्णपदके जिंकून आपली हुकुमत गाजविली. रिले संघाने सुवर्ण, समृध्दी जाधव व अथर्वराज पाटीलने रौप्य, अर्णव कडू, श्लोक खोपडे व झारा बक्षीने कांस्य पदकांची कमाई करून दिवस गाजविला.

आदिती हेगडेने ४०० मीटर फ्रâीस्टाईल शर्यत ४.३२.८७ वेळेत पूर्ण करीत सुवर्ण कामगिरी केली. दिल्लीच्या तितिक्षा रावतला रौप्य तर कर्नाटकच्या श्री चरणीला कांस्य पदक मिळाली. अपेक्षेप्रमाणे १०० मीटर बटरफ्लाय प्रकारातही अव्वल स्थान गाठून आदितीने बाजी मारली. सुरूवातीपासून आघाडी घेत १.०४.७३ वेळेत शर्यत जिंकून स्पर्धेतील चौथ्या पदकावर तीने शिक्कामोर्तब केला. गत तामिळनाडू स्पर्धेतही पदकांचा चौकार झळकविण्याचा करिश्मा तीने घडविला होता. कर्नाटकची सुहासिनी घोश हिने रौप्यपदक जिंकले, तर महाराष्ट्राची झारा बक्षी कांस्यपदकाची मानकरी ठरली.

मुलींच्या २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात महाराष्ट्राच्या समृद्धी जाधव हिने २ मिनिटे ४९.२१ सेंकद वेळेसह रौप्यपदक जिंकले. तमिळनाडूच्या श्रीनिथी नाटेसन हिने २ मिनिटे ४४.४१ सेंकद वेळ नोंदवित सुवर्णपदकावर कब्जा केला, तर बंगालच्या पृथा देबनाथ हिला २ मिनिटे ४९.९५ सेंकद वेळेसह कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

#रा